सोलापूर तरुण भारत

आसमंत

# वंदावे गुरुपद...



**काळ बदलला, जगण्याची परिमाणे बदलली आणि शिक्षणाच्या व्याख्येत आमूलाग्र बदल झाला तरी गुरूची महती तसूभरही कमी झालेली नाही. उलटपक्षी दिवसामाजी ती वाढतानाच दिसत आहे. शिक्षण केवळ अर्थार्जनास पात्र बनवत नाही तर जीवनाच्या सर्वांगी बहराचे ते मूळ असते. हा पाया पक्का असेल तर प्रत्येक प्रत्येक टप्प्यात जगण्याचा निर्भेळ आनंद घेता येतो. म्हणूनच अशा गुरूचा सहवास मिळेल अत्यावश्यक ठरते.**

गुरूपोर्णिमा विशेष — वैष्णवी कुलकर्णी

आज आपल्याकडे अभावानेच गुरू-शिष्य परंपरेतील शिक्षण पद्धती अस्तित्वात दिसते. आपले घरदार सोडून, गुरुगृही निवास करत, गुरूच्या आज्ञेनुसार, त्याने सांगितलेल्या कसोट्यांवर खरे उतरत ज्ञान प्राप्त करणे आणि गुरूच्या मतांचा आदर राखत गृहस्थाश्रमात प्रवेश करून उत्तम प्रपंच करणे ही एकेकाळी भारतात नांदणारी संस्कृती होती. या संस्कृतीने अनेक गुरू पाहिले आणि गुरूंनी घडवलेल्या अनेक शिष्योत्तमांनी घडवलेला इतिहासही आपण पाहिला. आज काही मोजकी क्षेत्र वगळता हे चित्र अभावेच दिसते. गुरूच्या नावाखाली गैरफायदा घेणारे, श्रद्धेचा बाजार भरवून त्यावर पोळी भाजून घेणारे अनेक आहेत. असे असले तरी योग्य गुरू आणि योग्य शिष्य काय चमत्कार घडवून दाखवू शकतात हे सांगणारी काही उदाहरणेही आहेत. म्हणूनच आजच्या काळातही या परंपरेचे पाईक होण्याचा प्रयत्न होताना दिसतो.



आपल्या संस्कृतीत दान सर्वश्रेष्ठ मानले गेले आहे. गुरू विद्यादान करत असतो. आपले ज्ञान इतरांना देत असतो. ज्ञान दिल्याने वाढते असे म्हणतात. म्हणूनच त्याचे शिष्य हा ज्ञानरूपी वसा सांभाळून त्याचा वारसा पुढे चालवतात. जुन्या काळात गुरुकुल पद्धत अस्तित्वात होती. आज ऑनलाईन शिक्षण सुरू आहे. ज्ञानदानाचे कार्य कोणत्याही पद्धतीने सुरू असले तरी गुरू हा त्यातला समान धागा आहे. गुरू शिष्याचे व्यक्तिमत्त्व घडवतो. या जगात टिकून राहण्यासाठी सज्ज करतो. गुरू कधीही हातचे राखून ठेवत नाही. तो शिष्यावर भरभरून प्रेम करतो. शिष्याला आपले मूल मानतो. त्याच्यावर संस्कार करतो. तो अत्यंत निरपेक्ष वृत्तीने विद्यादानाचे पवित्र कर्तव्य करत असतो. शिष्याचे यश हीच त्याची गुरुदक्षिणा. शिष्याचे कौतुक झाले की तो भरून पावतो. म्हणूनच गुरुपौर्णिमेला गुरूचा महिमा सांगितला जातो.

गुरुपौर्णिमा म्हणजेच व्यासपौर्णिमा. या दिवसाचे महत्त्व मोठे, महतीही मोठी. गुरुपौर्णिमेला शिष्य गुरूला भेटायला जातात, त्यांचे आशीर्वाद घेतात. ही गुरुमाउलीही शिष्याच्या भेटीने आनंदते, सुखावते.

प्रत्येकाला गुरू वेगवेगळ्या रूपात भेटत असतो. वेगवेगळ्या विद्या शिकवत असतो. मात्र आपण कितीही 'टेकसॅव्ही' झालो किंवा ऑनलाईन वर्गांमध्ये रमलो तरी गुरूचे महत्त्व तसूभरही कमी होत नाही आणि होणारदेखील नाही. तसे पाहायला गेले तर विधात्याने प्रत्येकाला कोणत्या ना कोणत्या गुणांनी उपकृत केलेले असते. प्रत्येकाच्या अंगी काही दोष असतात तसेच बरेच गुणही असतात. नित्याच्या परिचयात पालकांना मुलांच्या अंगीचे हे गुण जाणवतातच असे नाही. मात्र पारखी नजर असणारा गुरू मुलामुलींमधील हे गुण तत्काळ ओळखतो आणि त्याला बाहेर काढण्याचे काम करतो. गुरू साम, दाम, दंड, भेद या सर्व प्रकारांचा वापर करत शिष्याला पारंगत करण्याचा प्रयत्न करतो. विशेष म्हणजे हे काम अत्यंत नि:स्वार्थी वृत्तीने होत असते. माणूस घडवण्यासाठी, दैवी देणगीचा यथोचित वापर होण्यासाठी, व्यक्तिमत्त्व बहरण्यासाठी याची नितांत आवश्यकता असते. शिष्य केवळ अनुसरणाने बरेच काही शिकत असतो. गुरूचा सहवास त्याला अनेक गोष्टींचे अप्रत्यक्ष धडे देत असतो. परिस्थितीविषयी अवगत करत असतो. त्याचे अनुभवाचे बोल न शिकवताही बरेच काही सांगून जात असतात. म्हणूनच प्रत्येकाला पुढे जाण्यासाठी एखाद्या गुरूची आवश्यकता असते. प्रापंचिक आणि पारमार्थिक अशा दोन्ही प्रकारच्या प्रवासात मिळणारी त्याची साथ प्रवासाला योग्य दिशा देणारी ठरते.

आज नानाविध अंगाने माहितीचे भांडार उपलब्ध होत असले, तरी ज्ञान मिळण्याची काही मोजकेच ठिकाणे आढळतात. गुरूचे चरण हे त्यातील एक विश्वसनीय ठिकाण आहे. आज एखाद्याकडे समग्र माहिती असते, पण त्याचा नेमका कुठे आणि कसा वापर करायचा, हे ज्ञान गुरूशिवाय मिळत नाही. साहित्य, कला, विज्ञान, तंत्रज्ञान कुठल्याही क्षेत्रातील सखोल ज्ञान मिळविण्यासाठी गुरूला पर्याय नाही. संपर्काची अनेक साधने आणि विद्याग्रहणाचे अनेक पर्याय समोर असले, तरी आजही गुरूचे स्थान अबाधित आहे. कारण गुरू कुठलेही ज्ञान आपल्यापर्यंत सोप्या शब्दात पोहोचवत असतो. ज्ञानावर त्याचे संस्कार झालेले असतात. एखाद्या विषयावर अभ्यास, मनन आणि चिंतन करून त्याने तो विषय समजून घेतलेला असतो. असा स्वत:ला समजलेला विषय दुसर्यापर्यंत पोहोचवताना तो आनंदी असतो. दुसऱ्याला हे ज्ञान देण्यामागे त्याची तळमळ असते. आपल्याला आकलन झालेल्या विषयावर विद्यार्थ्याने आणखी काम करावे, त्यावर अधिक संशोधन व्हावे आणि ज्योतीने ज्योत प्रज्वलित होत राहावी, ही सच्च्या गुरूची मनोधारणा असते. म्हणून शिष्य आपल्यापेक्षा मोठा व्हावा, त्याने त्रिखंडात कीर्ती मिळवावी या उद्देशाने तो काम करतो. शिष्याच्या प्रगतीवर त्याच्या या सकारात्मक भावनांचा परिणाम स्पष्ट दिसून येतो. म्हणूनच काळ बदलला तरी गुरूला पर्याय नाही. आपल्याकडील गुरू- परंपरा बहुआयामी आहे.

गुरूचे निवासस्थान, त्यातील शिष्याचा निवास आणि कठोर नियमांचे आचरण या सगळ्याच बाबी त्याच्या जडणघडणीसाठी आणि सामाजिक सलोख्याशी संबंधित आहेत. वडीलधार्यांबरोबर समवयस्कांमध्ये राहून इथे होणारे संस्कार मुलांना जगण्याच्या पद्धतींशी अवगत करायचे. आता आपण त्या वातावरणातून बाहेर आलो आहोत. मुले शाळेत शिकतात. मात्र असे असतानाही संस्कारांमध्ये बदल होणे अपेक्षित नाही. परिस्थितीच्या बदलत्या रेट्यामध्ये आजचे शिक्षण विद्यार्थी नव्हे तर परीक्षार्थी घडवत आहे. आता सगळ्याच घटांना एकसारख्या साच्यातून बाहेर काढले जातेय. सर्वांना एकाच तागडीत तोलू पाहतेय. अर्थातच याचे तोटेही समोर दिसत आहेत. पूर्वी अशी परिस्थिती नव्हती. गुरूची रत्नपारखी नजर प्रत्येकातील विशेष गुण चाणाक्षपणे हेरत असे. प्रत्येक मातीचा कस लक्षात घेऊनच त्याला पूरक साच्यात घडवले जात असे. म्हणूनच तयार होणार्या प्रत्येकाचा आकार वेगळा, रंग वेगळा, रूप वेगळे आणि अस्तित्व वेगळे असे. प्रत्येकाच्या अस्तित्वाला अर्थ देण्याचे काम असे विनासायास पार पडत असे. पण आता या संकल्पनेचे विकेंद्रीकरण झाले आहे.

(पान ४ वर)

# क्यूडेंगाची लस आली तरी...

**डेंग्यू, मलेरिया, फ्लू हे पूर्वी पावसाळ्यात डोके वर काढणारे आजार हल्ली वर्षभरात कधीही उद्भवतात. यांपैकी डेंग्यूच्या आजारावरील 'क्यूडेंगा' या लसीला नुकतीच भारतात मंजुरी मिळाली. त्यानिमित्ताने डेंग्यूच्या प्रादुर्भावाचा धोका आणि लसीकरण कार्यक्रम राबविताना विकेंद्रित दृष्टिकोनाची गरज अधोरेखित करणारा हा लेख...**

लक्ष्यवेध — विजय कुलकर्णी


एक मच्छर आदमी को...यशवंत (१९९६) चित्रपटातील नाना पाटेकरचा सुप्रसिद्ध संवाद. आता त्या संवादातील फिल्मीपणा जरी बाजूला ठेवला, तरी डासांमुळे उद्भवणाऱ्या आरोग्याच्या समस्या या भारतासाठी सर्वस्वी गंभीर अशाच. कारण, भारत हा उष्णकटिबंधीय प्रदेशातील देश असल्यामुळे डेंग्यूचा प्रादुर्भावही तुलनेने अधिक. म्हणूनच, जगातील एक तृतीयांश डेंग्यूचे रुग्ण हे एकट्या भारतात आढळतात. त्यामुळेच डेंग्यूवरील नवीन क्यूडेंगा ही लस लाखो भारतीयांना जीवनदान देणारी ठरू शकते. सर्वप्रथम डेंग्यूच्या प्रादुर्भावाची कारणे थोडक्यात समजून घेऊया...

डेंग्यूचा प्रादुर्भाव हा एडीस इजिप्ती नामक मादी डासाच्या दंशामुळे होतो. हे डास प्रामुख्याने साचलेल्या पाण्यात अंडी घालतात. घरामधील कुलर, कुंड्या, फ्रीजच्या खालील ट्रे किंवा घराबाहेर कचर्यात पडलेले डबे, नारळाच्या करवंट्या यांमध्ये साचलेले पाणी ही या डासांच्या उत्पत्तीसाठी अत्यंत पोषक ठिकाणे. डेंग्यूच्या तापाची लक्षणे हा डास चावल्यानंतर लगेचच नाही, तर साधारणपणे चार ते दहा दिवसांनी दिसू लागतात. यामध्ये तीव्र ताप, डोकेदुखी, सांधे आणि स्नायुदुखी आणि अंगावर पुरळ उठणे ही मुख्य लक्षणे आढळतात. त्यामुळे डेंग्यूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी घरात किंवा घराबाहेर पाणी साचू न देणे, स्वच्छता राखणे, पालिकेकडून वेळोवेळी होणारी धूरफवारणी हे काही खबरदारीचे उपाय. पण, आपल्याकडील स्वच्छतेबाबतची एकूणच अनास्था लक्षात घेता, भारतात डेंग्यूच्या रुग्णांची संख्या ही चिंताजनक आहे.

१९९६ साली डेंग्यूच्या साथीत तब्बल ५४५ रुग्णांना प्राण गमवावे लागले होते, तर अलीकडच्या आकडेवारीवर नजर टाकली असता; २०२४ साली एकूण २ लाख, ३३ हजार डेंग्यूच्या रुग्णांपैकी ३०० जण मृत्युमुखी पडले, २०२५ साली हीच रुग्णसंख्या घटून १ लाख, २२ हजारांवर आली असली; तरी १३० रुग्णांना प्राण गमवावे लागले. २०२६च्या प्रारंभी फेब्रुवारीपर्यंत डेंग्यूची रुग्णसंख्या सात हजारांपर्यंत पोहोचल्याचे अधिकृत आकडेवारी सांगते. त्यामुळे क्यूडेंगाच्या नवीन लसीमुळे निश्चितच डेंग्यूमुळे होणारे मृत्यू रोखण्यात यश मिळणार आहे.

ड्रग्ज कंट्रोलर जनरल ऑफ इंडिया अर्थात, डीसीजीआयने ताकेदा बायोफार्मास्युटिकल कंपनीच्या क्यूडेंगा या लसीला भारतात नुकतीच मान्यता दिली. यापूर्वी, युरोपियन युनियनसह ब्राझील, अर्जेंटिनासारख्या ४० देशांमध्ये ही लस परिणामकारक ठरली असून, जागतिक आरोग्य संघटनेनेही प्रमाणित केली आहे. ही लस डेंग्यूच्या चारही प्रकारांवर परिणामकारक ठरणार असून, वय वर्षे ४ ते ६० पर्यंत नागरिकांना ही लस घेता येईल. विशेष म्हणजे, डेंग्यूबाधितांनीच ही लस घेतली पाहिजे किंवा लस घेण्यापूर्वी रक्तचाचणी करायला हवी, असेही अजिबात नाही.

(पान ४ वर)




# आरोपी तुरुंगात, तरी आंदोलक मैदानात का?

**कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाचा सूर व्यवस्थाविरोधी नसून सरकारविरोधीच आहे, हे स्पष्ट. त्यातच मरगळलेल्या विरोधी पक्षांना यानिमित्ताने पुन्हा पालवी फुटावी आणि आता क्रांतीच होईल, या आवेशात त्यांनी दीपकेंना बाजूला सारत आंदोलनच हायजॅक करण्याचा केविलवाणा प्रयत्नही केला. पण, या सगळ्यात नीट पेपरफुटीचे प्रकरण आणि त्यावरील कारवाईचे काय झाले? आरोपी तुरुंगात, तरी आंदोलक मैदानात का? याचे आकलन...**

आकलन — तेजस परब

सिजेपी आंदोलनातून नेमके काय साध्य झाले? तर, विरोधकांनी गमावलेली राजकीय स्पेस पुन्हा मिळविण्यासाठीची केविलवाणी धडपड जनतेसमोर आली. त्यात आम आदमी पक्षासह काँग्रेस, शरद पवार, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे आणि आता उरलेसुरले सगळेच पक्ष या आंदोलनात उतरून दीपकेंना समर्थन देत सुटलेत. मात्र, या आंदोलनाची फलश्रुती नेमकी काय असेल? शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यानंतर तरी प्रश्न सुटतील का? याचे उत्तर द्यायला दीपके आणि त्यांचा कंपू तयार नाही. जेव्हा जेव्हा हा प्रश्न विचारला गेला, तेव्हा त्यांनी उत्तर देणे टाळलेलेच दिसले. याउलट, त्यांचे म्हणणे असे की, मोदी सरकार उत्तरदायी नाही. त्यामुळे शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा घेण्याची गरज आहे, अशी या आंदोलकांची मागणी. पण, त्यानंतर पुढे काय? हा झालेला गोंधळ कोण निस्तरणार? त्याचे उत्तर आंदोलकांकडे दिसत नाही. पुन्हा विद्यार्थ्यांच्या आत्महत्या होऊ नये, यासाठी काय करायचे? हा मुळात प्रश्न.

आंदोलकांनी ज्याप्रकारे नीट परीक्षेतील त्रुटी, व्यवस्थेवर बोट ठेवणे अपेक्षित होते, तसे कुठेही झालेले दिसत नाही. उलट, सरकारला सत्तेतून खाली खेचा, आता आम्ही संसदेत बसू, अशा अजब घोषणा देत जो-तो सुटलेला दिसतो. नीट पेपरफुटी प्रकरण ही काही यंदाची गोष्ट नाही. यापूर्वीही त्या-त्या राज्यात नीट पेपरफुटी प्रकरणाचे आरोप झाले. २०२४ साली बिहारमध्ये केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग आणि आर्थिक गुन्हे शाखांनीही या प्रकरणात पुरावे सादर केले. पाटण्याच्या शास्त्रीनगर पोलीस ठाण्यात सीबीआयच्या अधिकार्यांनी यासंदर्भात पोलिसांची भेटही घेतली होती. याच वर्षी राजस्थानातही पेपरफुटीचे प्रकरण उघडकीस आले होते. त्यावेळी सरकारने हस्तक्षेप केला नाही, असे होते का? तर, तसे नाही. आरोग्यमंत्री जे. पी. नड्डांनी या एकंदरीत प्रकरणाचा सविस्तर आढावा घेतला होता. त्यावेळी गुजरात, राजस्थानमध्ये प्रत्येकी एक, बिहारमध्ये तीन आणि महाराष्ट्रातील लातूरमध्ये एक, असे पाच स्वतंत्र गुन्हे नोंदविण्यात आले होते. त्यामुळे पेपरफुटी ही यंदाच झाली किंवा यापूर्वी झालीच नाही, हा दावा पूर्णपणे अयोग्य. मग यंदाचा नीट पेपरफुटीचा मुद्दा इतका का गाजला? कारण, विद्यार्थ्यांना परीक्षाच दोनदा द्यावी लागली आणि त्या भीतिपोटी काही विद्यार्थ्यांनी आधीच आत्महत्येचे पाऊल उचलले. महाराष्ट्रसंस्कृती

अभिजित दीपके हे मुळात आंदोलक नव्हेत. देशाच्या सरन्यायाधीशांनी केलेल्या झुरळ टिप्पणीद्वारे त्यांना शब्दांत पकडून देशातील विविध मुद्दे उचलण्याचा त्यांनी ऑनलाईन प्रयत्न केला. नीट परीक्षेचा मुद्दा हाताळताना, सोनम वांगचूक यांचीही साथ त्यांना लाभली. वांगचूक उपोषणाला बसले. पण, दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर वांगचूक यांना रुग्णालयात हलविण्यात आले. आंदोलनाला समाजमाध्यमांतून एका उग्र आंदोलनाचे रूप देण्यात आले. त्यानंतर पुढे काय झाले हे आपल्यासमोर आहेच. पण, या सर्व मुद्द्यांचे समाधान काय, याबद्दलचे उत्तर आंदोलकांकडे अजून तरी दिसत नाही.

खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नीट पेपरफुटी प्रकरणी कठोर कारवाईची भूमिका घेतलेली आहे. त्यानुसार, सरकारने तातडीने यातील सर्व दोषींच्या मुसक्याही आवळल्या. ही परीक्षा रद्द करण्यात आली. त्याचा फटका २२ लाख विद्यार्थ्यांना बसला. तपास सीबीआयकडे सोपविण्यात आला. परीक्षेच्या पारदर्शकतेबद्दल शंका असल्याचे सरकारनेच मान्य केले. शिक्षण मंत्रालयाची तातडीची बैठक पार पडली, ज्यात राष्ट्रीय परीक्षा संस्था (एनटीए)कडून याबाबततचा अहवाल मागविण्यात आला.



राजस्थान, बिहार, गुजरात आणि महाराष्ट्रातील संबंधित राज्यांच्या तपास यंत्रणांना विश्वासात घेऊन लगोलग धडक कारवाईही झाली. विद्यार्थ्यांचे हित सर्वतोपरी असेल, असा विश्वास सरकारतर्फे देण्यात आला. यासाठी नव्याने परीक्षा घेण्याचा निर्णय झाला. नवी परीक्षा ओळखपत्रे जारी करण्यात आली. यावेळी अतिरिक्त सुरक्षा बाळगण्यात आली.

सर्व संबंधित आरोपींना तुरुंगात डामण्यात आले. हे एकूण १३ आरोपी कायद्याच्या कचाट्यातून सुटू नयेत, यासाठी सरकार प्रयत्नशीलही आहे. नीट पेपरफुटीची मुळे ही महाराष्ट्रातही खोलवर रुजली आहेत, ज्यात लातूरच्या एका महाविद्यालयातील शिक्षण असलेला प्रा. पी. व्ही. कुलकर्णी, लातूरचाच रसायनशास्त्राचा प्राध्यापक शिवराज मोटेगावकर, सहआरोपी डॉ. मनोज शिरुरे, जीवशास्त्राची प्राध्यापक मनीषा मांढरे, संजीव मुखिया, अमन सिंह, नितीश कुमार, अमित आनंद, रोशन कुमार, अनुराग यादव, शुभम खैरनार, तेजस हर्षदकुमार शाह आदी आरोपींची चौकशी सुरू आहे.

नव्याने घेतलेल्या परीक्षेत कुठल्याही प्रकारच्या सुरक्षा त्रुटी राहू नयेत, यासाठी देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच नीटचे पेपर हे भारतीय वायुसेनेने परीक्षेसाठी पोहोचवले. प्रश्नपत्रिका नेताना एका सुरक्षित शृंखलेची आखणी करण्यात आली. प्रश्नपत्रिका एकूण १८ महत्त्वाच्या ठिकाणी पोहोचवल्या गेल्या. काही ठिकाणी एम-१७ हे हेलिकॉप्टर्स वापरण्यात आले. चार दिवसांत २०० उड्डाणांद्वारे प्रश्नपत्रिका देशभर पोहोचविण्यात आल्या.

(पान ४ वर)

# तळांसाठीची तळमळ!

**इराण- अमेरिका युद्धामध्ये अमेरिकेच्या आखाती तळांना इराणने मोठ्या प्रमाणात लक्ष्य केले. त्यामुळेच दीर्घकाळ अमेरिका या युद्धात गुंतली गेली. त्याची परिणीती म्हणजे, अमेरिकेवरचा दबावही वाढत गेला. परिणामी, ही सैन्य तळे पांढरा हत्ती असल्याची चर्चा पुन्हा रंगली. एकीकडे अमेरिकेची ही लष्करी तळे, तर दुसरीकडे चीन उभारत असलेली लष्करीतळे यात तफावत आहे. त्यांचे जसे लाभ आहेत, तशीच त्यांची कमकुवत बाजूही आहे. त्यामुळे या दोन्ही देशांचे तळ आणि भारताचे सैन्य तळ यांचा आढावा घेणारा लेख...**



राष्ट्ररक्षा हेमंत महाजन

अलीकडील इराण-अमेरिका संघर्षाने, आधुनिक युद्धातील अनेक गृहीतके मोडून काढली. अनेक दशकांपासून आखाती प्रदेशातील अमेरिकेच्या प्रचंड लष्करी तळांना, जगातील सर्वांत अभेद्य संरक्षणव्यवस्था मानले जात होते. कतारमधील अल उदैद, बहरीनमधील पाचवा नौदल ताफा, कुवेत, संयुक्त अरब अमिराती, सौदी अरब आणि जॉर्डनमधील तळांवर अमेरिकेचे अब्जावधी डॉलर्स खर्च झाले. मात्र, इराणने केलेल्या क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ल्यांनी, या तळांची असुरक्षितता उघड केली. अनेक तळांवरील रडार, हवाई संरक्षण प्रणाली, इंधनसाठे, संचार केंद्रे आणि विमानांना हानी पोहोचल्याचे, उपग्रह चित्रांमधून समोरही आले. त्यामुळे या संघर्षातून भारताने अत्यंत महत्त्वाचे धोरणात्मक धडे घेण्याची गरज आहे.

अमेरिकेने आखातात इतके तळ का उभारले? अमेरिकेच्या मध्य-पूर्वेतील तळांचे प्रमुख उद्दिष्ट चार प्रकारचे होते.

**ऊर्जासुरक्षेचे संरक्षण:-** जगातील सर्वाधिक तेलपुरवठा पर्शियन आखात आणि होर्मुझ सामुद्रधुनीतून होतो. या मार्गांचे संरक्षण करणे, हेच अमेरिकेचे प्रमुख उद्दिष्ट होते.

**इराणला रोखणे:-** १९७९च्या इस्लामिक क्रांतीनंतर, इराण अमेरिकेचा मुख्य प्रादेशिक प्रतिस्पर्धी झाला. त्यामुळे इराणवर सतत दबाव ठेवण्यासाठी, अमेरिकेने आखाताभोवती तळांचे जाळेच उभारले.

**दहशतवादविरोधी कारवाया :-** अफगाणिस्तान, इराक, सीरिया आणि इस्लामिक स्टेटविरुद्धच्या मोहिमांसाठीही, या तळांचा वापर केला गेला.

**शक्तिप्रदर्शन:-** या तळांमुळे अमेरिका मध्य-पूर्वेतील मित्रदेशांना सुरक्षा हमी देऊ शकली आणि संपूर्ण प्रदेशात प्रभावही राखू शकली.

**हे तळ सिटिंग डस का ठरले?**

**स्थिर लक्ष्यांची समस्या:** कोणताही हवाई तळ, नौदल तळ किंवा लॉजिस्टिक केंद्र हे स्थिर लक्ष्य असते. त्यामुळे त्याचे अचूक स्थान शत्रूला ज्ञात असते. पूर्वी हे फारसे धोकादायक नव्हते. कारण, अचूक क्षेपणास्त्रे आणि ड्रोन तंत्रज्ञान सर्व देशांकडे उपलब्ध नव्हते. परंतु, आता परिस्थिती बदलली आहे.

**क्षेपणास्त्रांचा प्रचंड मारा:-** इराणकडे हजारो बॅलिस्टिक आणि क्रूझ क्षेपणास्त्रे आहेत. काहींची मारक क्षमता तर दोन हजार किमीपेक्षा अधिक आहे. अगदी सर्वोत्तम संरक्षण प्रणालीसुद्धा, एकाच वेळी शेकडो क्षेपणास्त्रे रोखू शकत नाही.

**ड्रोन स्वॉर्म हल्ले:-** कमी किमतीचे शेकडो ड्रोन पाठवून, कोणत्याही देशाच्या संरक्षण प्रणालीला गोंधळात टाकता येते. युक्रेन, रशिया, इस्रायल आणि इराण युद्धांमधून हे सिद्ध झाले आहे.

**आर्थिक विषमता:-** एक स्वस्त ड्रोन काही हजार डॉलर्समध्ये तयार होतो. त्याला पाडण्यासाठी वापरले जाणारे पॅट्रियॉट, थाड किंवा SM-3 इंटरसेप्टरची किंमत लाखो डॉलर्स असते. हा आर्थिक समतोल आक्रमणकर्त्याच्याच बाजूने झुकतो.

**संतृप्ती :-** जगातील कोणतीही हवाई संरक्षण प्रणाली १०० टक्के यशस्वी नसते. जर २०० क्षेपणास्त्रे डागली आणि त्यातील ९० टक्के रोखली गेली, तरी २० लक्ष्यांवर परिणाम हा होतोच. लष्करी दृष्टिकोनातून ते पुरेसे असते. अमेरिकेची हवाई संरक्षण व्यवस्था अपयशी का ठरली? अमेरिकेची हवाई संरक्षण व्यवस्था अपयशी ठरली, असे म्हणणे पूर्णपणे सत्य नाही. तिने अनेक क्षेपणास्त्रे पाडली. परंतु, पुढील कारणांमुळे संपूर्ण संरक्षण शक्य झाले नाही.

**हल्ल्यांची संख्या:** इराणने मोठ्या प्रमाणावर क्षेपणास्त्रे आणि ड्रोन वापरले.

**बहुदिशात्मक हल्ले:** वेगवेगळ्या दिशांनी आणि उंचीवरून हे हल्ले करण्यात आले.

**कमी उंचीवरील क्रूझ मिसाईल:** रडारपासून बचाव करून, कमी उंचीवर उडणारी क्षेपणास्त्रे शोधणे कठीण असते.

**इलेट्रॉनिक युद्ध:** जीपीएस जॅमिंग, सायबर हल्ले यामुळे संरक्षण व्यवस्थेवर ताण वाढतो.

**मग या तळांचा उपयोग काय झाला?**

काही तज्ज्ञ या तळांना व्हाईट एलिफंट म्हणत असले, तरी ते पूर्णपणे निरुपयोगी नाहीत.

**हवाई मोहिमांचे केंद्र:** इराक, सीरिया आणि अफगाणिस्तानमधील हजारो हवाई मोहिमा, याच तळांवरून पार पडल्या.

**लॉजिस्टिक हब:** इंधन, दारुगोळा, सुटे भाग आणि सैन्याची वाहतूक, यासाठी हे तळ अत्यंत महत्त्वाचे आहेत.

**गुप्तचर आणि देखरेख:** उपग्रह नियंत्रण, ड्रोन ऑपरेशन आणि इलेट्रॉनिक गुप्तचर कारवायाही याच तळांवरून होतात.

**मित्रदेशांना आश्वासन:** या तळांमुळेच आखाती देशांनाही, अमेरिकेच्या सुरक्षेची हमी मिळते.

**इराणविरुद्ध या तळांनी कोणती आक्रमक भूमिका बजावली?**

**हवाई हल्ले:** इराणच्या लष्करी आणि अणुस्थळांवर हल्ले करण्यासाठी, अमेरिकन विमाने या तळांवरूनच उड्डाण करत होती. आयएसआर ऑपरेशन्स मोहिमाही चालवण्यात आल्या.

**क्षेपणास्त्र संरक्षण:** इराणी हल्ले रोखण्यासाठी, थाड आणि पॅट्रियॉट प्रणाली तैनात करण्यात आल्या.

**नौदल नियंत्रण:** बहरीनमधील पाचव्या ताफ्याद्वारे, पर्शियन आखातातील समुद्रीमार्गांवरही नियंत्रण ठेवण्यात आले.

चीनच्या भारतीय महासागरातील तळांशी तुलना: चीनने अमेरिकेसारखे मोठे तळ उभारण्याऐवजी, लॉजिस्टिक सपोर्ट नेटवर्क उभारण्याचा मार्ग स्वीकारला आहे.

**जिबूती:** हा चीनचा पहिला अधिकृत परदेशी लष्करी तळ. तो बाब-अल-मंदेब सामुद्रधुनीवर नजर ठेवतो आणि चीनच्या नौदलाला, आफ्रिका व पश्चिम आशियात पोहोचण्यासाठी आवश्यक सहकार्य करतो.

**ग्वादर:** होर्मुझ सामुद्रधुनीच्या जवळ स्थित. भविष्यातील चिनी नौदलासाठी महत्त्वाचा आधारबिंदू ठरू शकतो.

**हंबनटोटा:** श्रीलंकेतील हा बंदर प्रकल्प अधिकृतपणे व्यापारी असला, तरी त्याचा दुहेरी वापर शक्य आहे.

**म्यानमार:** सिटवे, यौकफ्यू आणि बंगालच्या उपसागरातील सुविधांमुळे, चीनला सामुद्रधुनीवरील अवलंबित्व कमी करता येते.

**मालदीव :** सध्या कोणताही अधिकृत चिनी लष्करी तळ नाही. मात्र, वाढती आर्थिक आणि पायाभूत गुंतवणूक भविष्यातील प्रवेशद्वार बनू शकते.

**चीनच्या तळांतील कमकुवत दुवे:** अनेक विश्लेषक चीनच्या स्ट्रिंग ऑफ पर्ल्सला अभेद्य समजतात. प्रत्यक्षात युद्धकाळात, हेच तळ चीनसाठी मोठी समस्याही बनू शकतात.

**मुख्य भूमीपासून अंतर:** चीनपासून हजारो किलोमीटर दूर असलेले तळ राखणे कठीण असते.

**पुरवठा रेषांवरील अवलंबित्व :** भारतीय नौदल समुद्रीमार्गांवर दबाव आणू शकते.

**स्थानिक राजकारण:** श्रीलंका, मालदीव किंवा म्यानमारमधील सत्ता बदलामुळे, चीनची स्थिती बदलू शकते.

**अचूक भारतीय क्षेपणास्त्रे:** ब्रह्मोस, निर्भय, लाँग रेंज प्रिसिजन वेपन्स आणि पाणबुड्यांमधून होणारे हल्ले, या तळांना धोक्यात आणू शकतात.

युद्धकाळात हे तळ चीनसाठी स्ट्रॅटेजिक ॲसेटपेक्षा, स्ट्रॅटेजिक लायबिलिटीच ठरू शकतात.

**भारतासाठी महत्त्वाचे धडे**

मोठ्या तळांवर अवलंबित्व टाळा. एकच विशाल तळ निर्माण करण्याऐवजी, अनेक लहान, विखुरलेल्या सुविधा उभाराव्यात.

**डिस्पर्स्ड ऑपरेशन्स:** विमाने, ड्रोन, क्षेपणास्त्रे आणि दारुगोळा वेगवेगळ्या ठिकाणी विखुरून ठेवावेत.

**भूमिगत सुविधा:** इंधन, दारुगोळा आणि कमांड सेंटर भूमिगत करावेत.

**बहुस्तरीय हवाई संरक्षण:** एस-४००, MRASAM, आकाश लेझर प्रणाली आणि ॲन्टी-ड्रोन नेटवर्क एकत्रित करावे.

**हार्डनिंग :** विमानतळ, रडार आणि कमांड पोस्ट संरक्षित आश्रयस्थानांमध्ये ठेवावेत.

**गतिशीलता :** मोबाईल क्षेपणास्त्र लॉन्चर आणि मोबाईल रडार यांचा मोठ्या प्रमाणावर वापर करावा.

**चीनला भारताने कसे तोंड द्यावे?**

**अंदमान-निकोबारचे सैनिकीकरण**

अंदमान आणि निकोबार बेटे भारतीय महासागरातील सर्वांत महत्त्वाचा धोरणात्मक लाभ आहेत.

**समुद्री नाकेबंदी क्षमता:** मलाक्का, लोम्बोक आणि सुंडा सामुद्रधुनींवर नजर ठेवण्याची क्षमता वाढवावी.

**पाणबुडी युद्धशक्ती:** अणुऊर्जेवर चालणाऱ्या आक्रमक पाणबुड्यांच्या संख्येत वाढ करावी.

**लांब-पल्ल्याची क्षेपणास्त्रे :** ब्रह्मोस ब्लॉक III, हायपरसॉनिक प्रणाली आणि समुद्राधारित क्षेपणास्त्रांची संख्या वाढवावी.

**मित्रराष्ट्रांचे जाळे:** क्वाड, फ्रान्स, इंडोनेशिया, व्हिएतनाम, मॉरिशस, सेशेल्स आणि ओमान यांच्यासोबत प्रवेश करार वाढवावेत.

**माहिती युद्ध:** उपग्रह, सायबर आणि इलेट्रॉनिक युद्ध क्षमतांमध्ये मोठीच गुंतवणूक करावी.

अलीकडे असे वृत्त आहे की, बांगलादेश मोंगला बंदर चीनकडे विकासासाठी देण्याचा विचार करत आहे. हे बंदर सिलिगुडी कॉरिडोरपासून, अवघ्या १०० किलोमीटर अंतरावर आहे. हा प्रकल्प भारताला देण्यात येणार होता; परंतु हसीना यांची सत्ता उलथवल्यानंतर बांगलादेशातील विद्यमान सरकारने तो चीनकडे दिला. जर हे बंदर लष्करी तळामध्ये रूपांतरित झाले, तर युद्धाच्या प्रसंगी ते चीनकरिता अत्यंत असुरक्षित ठरेल. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंडोनेशिया भेटीदरम्यान, इंडोनेशियाने मलाक्का सामुद्रधुनीच्या प्रवेशद्वारावर असलेले सबांग बंदर भारताला विकासासाठी दिले आहे. हे भारतासाठीचे एक मोठेच यश आहे. कारण, मलाक्का सामुद्रधुनीवर हे बंदर अत्यंत महत्त्वाचे असून, या मार्गावरूनच चीनच्या सुमारे ८५ टक्के व्यापाराची वाहतूक होते. भारत आणि चीन यांच्यातील सामरिक स्पर्धा आता केवळ हिमालयातील सीमावादापुरती मर्यादित नाही. आज ही स्पर्धा संपूर्ण हिंद-प्रशांत प्रदेशात विस्तारली आहे.

**निष्कर्ष :**

इराण-अमेरिका संघर्षाने एक मूलभूत सत्य अधोरेखित केले. आधुनिक काळात कोणताही स्थिर लष्करी तळ पूर्णपणे सुरक्षित नाही. प्रचंड खर्च करून उभारलेले अमेरिकेचे आखाती तळही, क्षेपणास्त्र आणि ड्रोन युगात असुरक्षित ठरले. परंतु, याचा अर्थ परदेशी तळ निरुपयोगी आहेत, असा होत नाही. मात्र, त्यांचे स्वरूप बदलण्याची गरज आहे.

# संविधान आणि बालहक्क आदर्श आणि वास्तवातील दरी

पोरकी पोरं डॉ. तुषार सावरकर

भारताच्या संविधानाच्या प्रस्तावनेत सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाची हमी देण्याचं आश्वासन आहे. या आश्वासनाचा सर्वात महत्त्वाचा लाभार्थी कोण असेल, तर तो म्हणजे देशातील बालक. कारण कोणत्याही समाजाचं भविष्य त्याच्या मुलांच्या वर्तमानावर उभं असतं. म्हणूनच भारतीय संविधानाने मुलांना केवळ संरक्षणाची गरज असलेला गट म्हणून न पाहता, स्वतंत्र हक्क असलेले नागरिक म्हणून मान्यता दिली आहे. समानता, शिक्षण, संरक्षण, आरोग्य आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार यांसारख्या अनेक घटनात्मक तरतुदींच्या माध्यमातून बालपण अधिक सुरक्षित आणि सन्माननीय करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. परंतु संविधानातील आदर्श आणि प्रत्यक्ष वास्तव यांच्यामध्ये अजूनही एक मोठी दरी दिसून येते. त्यामुळे प्रश्न केवळ महक्क आहेत का? हा नसून मते मुलांपर्यंत खरोखर पोहोचतात का? हाही आहे.

भारतीय संविधानाने बालकांच्या संरक्षणासाठी अनेक महत्त्वपूर्ण तरतुदी केल्या आहेत. कलम १४ सर्वांना समानतेचा अधिकार देते, तर कलम १५ (३) राज्याला महिला आणि मुलांसाठी विशेष उपाययोजना करण्याची मुभा देते. कलम २१ जीवन आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार सुनिश्चित करते, तर २००२ मध्ये करण्यात आलेल्या ८६ व्या घटनादुरुस्तीमुळे समाविष्ट झालेल्या कलम २१-अ अंतर्गत ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक मुलाला मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला. कलम २३ मानवी तस्करी आणि सक्तीच्या मजुरीवर बंदी घालते, तर कलम २४ अंतर्गत १४ वर्षांखालील मुलांना धोकादायक उद्योगांमध्ये कामावर ठेवण्यास मनाई करण्यात आली आहे. राज्याच्या धोरण निर्देशक तत्त्वांमधील कलम ३९ (ई) आणि (एफ) मुलांचे शोषण होऊ नये आणि त्यांचा विकास सन्मानाने व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त करतात. कलम ४५ प्रारंभिक बालसंगोपन आणि शिक्षणाची जबाबदारी राज्यावर सोपवते.

घटनात्मक तरतुदींच्या या पायावर उभे राहून भारताने शिक्षणाचा हक्क कायदा (२००९), किशोर न्याय (बालकांची काळजी व संरक्षण) कायदा (२०१५), पोक्सो कायदा (२०१२), बालकामगार (प्रतिबंध आणि नियमन) कायदा अशा अनेक कायद्यांची निर्मिती केली. १९९२ मध्ये भारताने संयुक्त राष्ट्रांच्या बालहक्क करारालाही मान्यता दिली. कागदोपत्री पाहता बालहक्कांच्या संरक्षणासाठी आवश्यक असलेली जवळपास संपूर्ण कायदेशीर चौकट भारतात अस्तित्वात आहे. परंतु प्रत्यक्ष वास्तव पाहिल्यास वेगळंच चित्र समोर येतं.

भारतीय संविधानाने प्रत्येक मुलाला शिक्षणाचा अधिकार दिला असला, तरी शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या मुलांची संख्या आजही चिंतेचा विषय आहे. स्थलांतरित कुटुंबांतील मुले, भटक्या-विमुक्त समुदायांतील मुले, रस्त्यावर राहणारी मुले, कचरा वेचणारी मुले, भिक्षावृत्तीमध्ये ढकलली गेलेली मुले आणि विविध प्रकारच्या वंचित परिस्थितीत जगणारी मुले अजूनही शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर आहेत. शिक्षणाचा हक्क हा घटनात्मक अधिकार असला, तरी अनेक मुलांसाठी तो अजूनही वास्तव न बनलेलं स्वप्न आहे.

कलम २४ ने बालमजुरीवर निर्बंध आणले असले, तरी



भारताच्या अनेक भागांमध्ये बालमजुरीचं वास्तव अद्याप दिसून येतं. चहाच्या टपऱ्या, हॉटेल्स, बांधकाम साईट्स, कचरा डेपो, शेती, वीटभट्ट्या आणि घरगुती कामांमध्ये काम करणारी मुलं ही आपल्या विकासाच्या मॉडेलमधील विरोधाभास अधोरेखित करतात. संविधान मुलांना शोषणापासून संरक्षण देतं; परंतु दारिद्र्य, स्थलांतर, कर्जबाजारीपणा आणि सामाजिक विषमता अनेकदा या संरक्षणावर मात करतात. मुलांच्या सुरक्षिततेच्या प्रश्नावरही अस्वस्थ करणारी वास्तवता दिसून येते. बाल लैंगिक अत्याचारांपासून संरक्षणासाठी पोक्सो कायदा अस्तित्वात असला, तरी राष्ट्रीय गुन्हे नोंदणी ब्युरोच्या आकडेवारीनुसार बालकांविरुद्धच्या गुन्ह्यांची नोंद सातत्याने होत आहे. या घटनांपैकी अनेक गुन्हे घर, शाळा किंवा परिचित व्यक्तींच्या परिसरात घडतात, ही बाब अधिक चिंताजनक आहे. कायदे असणं आणि सुरक्षित वातावरण निर्माण होणं या दोन वेगळ्या गोष्टी आहेत, हे या वास्तवातून स्पष्ट होतं.

आरोग्य आणि पोषणाच्या बाबतीतही संविधानातील आदर्श आणि वास्तवामध्ये अंतर दिसून येतं. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५ नुसार देशातील बालकांमध्ये खुंटलेली वाढ, कमी वजन आणि अशक्तपणाचं प्रमाण अजूनही गंभीर आहे. व्यवस्था, पोषण अभियान आणि विविध कल्याणकारी योजना अस्तित्वात असूनही कुपोषणाचा प्रश्न पूर्णपणे सुटलेला नाही. एका बाजूला अंतराळ मोहिमा आणि डिजिटल क्रांतीचा अभिमान बाळगणारा देश आहे, तर दुसऱ्या बाजूला कुपोषणाशी झुंजणारी लाखो मुलं आहेत.

संविधान मुलांना सन्मानाने जगण्याचा अधिकार देतं. पण हा सन्मान नेमका कुठे दिसतो? सिग्नलवर फुले विकणाऱ्या मुलांमध्ये? कचऱ्याच्या ढिगाऱ्यामध्ये प्लास्टिक गोळा करणाऱ्या मुलांमध्ये? बांधकाम साईटवर वाढणाऱ्या मुलांमध्ये? तुरुंगाच्या भिंतींच्या सावलीत वाढणाऱ्या मुलांमध्ये? की बालगृहांमध्ये संस्थात्मक आयुष्य जगणाऱ्या मुलांमध्ये? व्यसनाधीन, मानसिक आजारग्रस्त किंवा अपंग पालकांच्या मुलांमध्ये? अशा अनेक अदृश्य बालपणांमध्ये संविधानातील आदर्श अजूनही अपूर्ण वाटतात. यामध्ये एक महत्त्वाचा विरोधाभास दिसून येतो.

आपण मुलांना देशाचं भविष्य म्हणतो; परंतु धोरणनिर्मितीमध्ये त्यांच्या वर्तमानाकडे अनेकदा दुय्यम दृष्टीने पाहिलं जातं. बालकांशी संबंधित प्रश्न केवळ महिला व बालविकास विभागाची जबाबदारी म्हणून पाहिले जातात. प्रत्यक्षात शिक्षण, आरोग्य, पोषण, गृहनिर्माण, रोजगार, सामाजिक न्याय, नगररचना आणि मानसिक आरोग्य या सर्व क्षेत्रांचा बालहक्कांशी थेट संबंध आहे. त्यामुळे बालहक्कांचा प्रश्न हा केवळ कल्याणकारी कार्यक्रमांचा नसून सामाजिक न्यायाचा प्रश्न आहे.

(पान ६ वर)

कथा मृणालिनी केळकर

# हरवली म्हणून सापडली

मी मित्रांसोबत रमेशच्या फार्म हाऊसवर गेलो होतो. सगळेजण खुशीत होतो. मौजमजा, मस्ती, गाणी आणि खाणेपिणे. आणखी एक खास गोष्ट म्हणजे फार्म हाऊसजवळ एक तलाव होता. चांगला मोठा आणि खोल. तिथे आम्ही गळ टाकून बसलो. मासे पकडायला. कसा वेळ गेला कळलेच नाही. जेवण होईपर्यंत दिवस मावळायला आला. संध्याकाळ होताच आम्ही आवरतं घेतलं आणि घराच्या दिशेने निघालो.

घरी पोहोचलो. मी वॉशरुममध्ये फ्रेश व्हायला गेलो. हातपाय धुवून चेहऱ्यावर पाण्याचे सपकारे मारून टॉवेलने तोंड पुसत असताना मला आरशात माझा हात दिसला; आणि मी चमकलो, बोटात अंगठी नव्हती. खूप आठवून बघितलं, जेवायला बसेपर्यंत अंगठी होती, मला पक्कं आठवत होतं. नंतरचं काही लक्षात नाही. केव्हा आणि कुठे पडली? फार्म हाऊसवर असेल तर मिळण्याची शक्यता होती. दुसरीकडे कुठे असली तर? तर, मग सापडण्याची शक्यता जवळपास नाहीच. खोलीत येताच मी रमेशला फोन केला... त्याला सर्व सांगितलं. तो म्हणाला, हे बघ जरा धीर धर.... बरोबर नेलेले सामान पुन्हा एकदा तपासून बघ. नाही सापडली तर आपण दोन- तीन दिवसांनी म्हणजे येत्या रविवारी जाऊ फार्म हाऊसवर. त्या आधी मात्र जमणार नाही. ठीक आहे... म्हणत मी फोन ठेवला. पुन्हा फोन केला आणि विचारलं, जयंत, तू घरी असशील तर त्या दिवशी पिकनिकचे बरेच फोटो वहिनीने काढले होते मोबाईलवर. एकदा बघतो म्हणजे नेमकी केव्हा अंगठी पडली ते कळेल. हो. ये. मी घरीच आहे. जयंतने मोबाईल काढला सेव्ह केलेले फोटो दाखवत म्हणाला, थांब, तुला टीव्हीवर कनेक्शन जोडून देतो म्हणजे अधिक स्पष्ट दिसतील. फोटो लक्षपूर्वक पाहत होतो. अंगठी होती. म्हणजे इकडे तिकडे फिरत असतानाच पडली. मला एक वाईट सवय होती, बोटातली अंगठी सतत फिरवत राहायची. तेव्हाच कुठेतरी पडली असणार. आता पुन्हा तिथे जायला हवं. रविवार ठरला. केव्हा एकदा रविवार उजाडतो असे झाले होते. रविवार उजाडला, पण अंगठी काही सापडली नाही. मन स्वस्थ नव्हते. सारखी हुरहूर लागली होती. शेवटी एकदाचे जमलं आणि पुन्हा रमेशच्या फार्म हाऊसवर गेलो. नेहमीप्रमाणे जेवणाची तयारी करायला नोकराला सांगितले. तो गेला. अद्याप अंधार पडला नव्हता, म्हणून फार्म हाऊसचा कोपरा न कोपरा धुंडाळून काढला. पण नाहीच सापडली. जेवताना दोघांनीही शोध घेतला... वेडी आशा... तलावात पडली असेल आणि माशाने गिळली असेल तर! जळी स्थळी- काष्ठी- पाषाणी अंगठीच दिसत होती म्हणून शंका आली. अंगठी माझ्यासाठी खास होती. आईची शेवटची आठवण. अंगठी फार किमतीची नव्हती तरी अर्धा तोळा सोने आणि पुखराज, किमती रत्न! मी लहान असतानाच आई घर सोडून गेली, असे मला बाबांनी सांगितले होते. आता घरात होती ती दुसरी आई. या नव्या आईशी माझं अजिबात पटत नव्हतं. म्हणूनच शिक्षण संपताच मी दुसरीकडे नोकरी घेतली.

अंगठी सापडली नसल्याने रात्री फार जेवलो नाही. झोपही नीट लागली नाही. सकाळी उठलो. नोकराने चहा- नाश्ता आणून दिला. नाश्ता झाल्यावर आम्ही निघण्याची तयारी करत होतो. तेव्हाच नोकराने एक पाकीट आणून दिले. म्हणाला,काल एका बाईने हे आणून दिली. म्हणाली, आमच्या मालकिणीने दिले. मी पाकीट उघडून बघितले तर त्यात अंगठी चमकत होती.

ती बाई कुठाय, ही माझीच अंगठी. ती रात्रीच गेली. तिच्याबद्दल काही माहिती? हो. ती ज्यांच्याकडे काम करते, त्यांना मी ओळखतो. एक काम करशील, मला घेऊन जाशील त्यांच्याकडे? हो उद्या जाऊ शकतो. तो म्हणाला. रात्री मला झोप लागलीच नाही. केव्हा एकदा दिवस उजाडतो असे झाले. दुसर्या दिवशी सकाळीच तो आला. चहा- नाश्ता करून आम्ही निघालो. साधारण तासभर चालत गेलो. तेव्हा एका घराशी थांबलो. नोकरानं दार ठोठावून आवाज दिला, काकू, अहो काकू, दार उघडा... थोड्याच वेळात दार उघडत एक प्रौढ बाई दरवाजातून बाहेर आली. काय रे काय झालं?

जी... या सायबांना तुमच्या संग बोलायचं हाय. मी नमस्कार करत म्हटलं, मी प्रकाश देशपांडे, तुम्ही माझी अंगठी पाठवली. मला मिळाली, पण तुम्हाला कुठे सापडली? काल मी मासे-भाजी असं वेगळे वेगळे करीत होते तर पापलेटच्या तोंडात काहीतरी चमकताना दिसलं. मी बोटाने ओढलं तर अंगठी.. मला लक्षात आलं, याच्या साहेबांची असेल म्हणून पाठविली.



हो. ती माझी अंगठी आहे. रमेशची नाही. ही पुखराजची अंगठी तुझी....? म्हणजे तुझे नाव...? माझं नाव प्रकाश देशपांडे. मघाशी सांगितलं नाही का? कुठून आलास? जज्ज देशपांडे तुझे कोण? माझे वडील!... आणि आई?

माझी आई कुठे गेली की वारली मला माहीत नाही. सावत्र आईशी माझं पटत नाही. मी नागपूर सोडून इथे आमगावला आलो; पण तुम्ही एवढे प्रश्न का विचारता? तुम्हाला काही पैसे वगैरे हवे का? नाही. तुम्ही थांबा जरा... म्हणत ती आत गेली. परत आली ती एक फोटो घेऊन. सांग हा तुझा फोटो आहे? हो. म्हणजे ही बाई म्हणजे तुम्ही, कारण तिसरी व्यक्ती माझे बाबा आहेत. हो. बरोबर तू पाच वर्षाचा होतास. मी तुला मन्टू म्हणायची, आठवतंय का? म्हणजे ही फोटोतली बाई म्हणजे तुम्ही म्हणजे... माझी आई? हो, हो. मीच तुझी आई. तुझ्या वडिलांनी दुसरे लग्न केलं आणि मी घर सोडलं. तुला तिथेच ठेवलं. कारण तुझी फरफट व्हायला नको. त्या जिवतीच्या कहाणीतल्या आईसारखी. मी तुझ्या सुखाची प्रार्थना करायची आणि आज ती फळाला आली. इतका वेळ मी नुसता ऐकत होतो. आता मला खात्री पटली. हीच माझी आई! म्हणालो, आई, माझी अंगठी हरवली नसती तर तू मला कधीही सापडली नसतीस. आता तू इथे राहायचं नाही. आवराआवर कर आणि माझ्याकडे चल. येशील ना? हो रे मन्टू चल, आवरायला मदत कर मला. पाणावलेले डोळे पुसत ती म्हणाली. अन् मीही माझ्या डोळ्यातले अश्रू पुसले.

वळणावरच्या नोंदी

स्वाती काळे

# तहकीक-ए-हिंद



अल्बेरुनीचे तहकीक- ए-हिंद पुस्तक म्हणजे वाचकाच्या बुद्धीला आव्हानच आहे. कारण यामध्ये भारतीय तत्त्वज्ञान, खगोलशास्त्र, साहित्य, धर्मव्यवस्था, समाजव्यवस्था, गणित या सर्व विषयांचा सांगोपांग अभ्यास केलेला आहे. त्याने सर्व माहिती प्रचंड अभ्यास करून मिळविली. मूळ संस्कृत ग्रंथ प्रयत्नांनी मिळविले. हिंदू पंडितांबरोबर दीर्घ वेळ अभ्यास केला. अल्बेरूनी खरे तर गजनीच्या महमूदचा युद्धकैदी होता. नंतर त्याच्या दरबाराशी तो निगडित होता. तरीसुद्धा भारतावरच्या विध्वंसक आक्रमणाला इस्लामची मान्यता नाही, असे परखड मत मांडण्याचे भ्राष्ट्य त्याने दाखवले. तो म्हणतो की, ममहमुदाने भारताचे सगळे वैभव लुटून नेले. त्याच्या विध्वंसक स्वाऱ्यांच्या वावटळीत हिंदू विद्वान धुळीच्या कणांसारखे किंवा दंतकथांसारखे वाऱ्यावर विखुरले. या विखुरलेल्या हिंदू विद्वानांच्या मनात मुसलमानांविषयी तीव्र राग आहे. त्यामुळे ते मुसलमानी अंमलाखालच्या प्रदेशांपासून दूर गेले आहेत. त्या प्रदेशातील त्यांची शास्त्रेही काश्मीर, बनारस या ठिकाणी आश्रयाला गेली आहेत आणि तेथे परधर्मीयांविषयी द्वेषभावना वाढीस लागली आहे.

तहकीक-ए-हिंद व्यतिरिक्त अल्बेरुनीने अनेक संस्कृत ग्रंथांची भाषांतरे केली. विश्वउत्पत्तीसंबंधी कपिलमुनींनी लिहिलेला सांख्यदर्शन ग्रंथ, आत्म्याच्या प्रवासाविषयीचा पातंजल योगशास्त्र, वराहमिहीराची बृहतसंहिता, लघुजातकम्फ, ब्रह्मगुप्ताचे मपौलस्त्य सिद्धांत, ब्रह्मसिद्धांत असे अनेक ग्रंथ त्याने भाषांतरित केले. गमतीची गोष्ट म्हणजे त्याने अरबी खगोल ज्ञानाचा परिचय हिंदूंना होण्यासाठी संस्कृतमध्ये अरबी खंडखाद्यक नावाचे पुस्तक लिहिले. ब्रह्मगुप्ताच्या खंडखाद्यक या ग्रंथाच्या नावावरून त्याने हे नाव ठेवले होते. ब्रह्मगुप्ताच्या खंडखाद्यकात सर्वच विषयांचा उहापोह होता. सुग्रीव नावाच्या बौद्ध खगोलशास्त्रज्ञाने दधीसागर म्हणजेच दह्याचा समुद्र असा ग्रंथ लिहिला. त्याच्या शिष्याने भाताचा डोंगर असा ग्रंथ लिहिला. आणखीन एकाने लवण मुष्टी हा ग्रंथ लिहिला.

अल्बेरुनीने भारतीय विज्ञानाबद्दल माहिती गोळा करून जगासमोर आणली. हजाराच्या पलीकडची संख्याश्रेणी भारतीय मानतात असे त्याने दीड हजार वर्षांपूर्वी सांगून ठेवले आहे. एकम्पासून परार्धापर्यंत अठरा संख्या श्रेणी भारतीय मानतात. कोटी या शब्दाचा अर्थही श्रेणी हा आहे. तेहत्तीस कोटी म्हणजे तेहत्तीस श्रेणी. ब्रह्मा, विष्णू आणि महेश हे जरी तीन मुख्य देव असले, तरी त्यांच्या अधिपत्याखाली प्रत्येकी अकरा अशा तेहत्तीस श्रेणी आहेत. भारतीय पंडितांनी त्याला सांगितले होते की, पृथ्वीचा आकार गोलच असणार. त्यालाही हा सिद्धांत पटला होता. समुद्राची भरती- ओहोटी, सूर्य आणि चंद्राचे ग्रहण, ऋतू याबद्दलचे भारतीयांचे ज्ञान अल्बेरुनीने गोळा केले. भारतातील नद्या, प्रदेश, महत्त्वाची शहरे या सर्वांचे त्याने मनोहारी वर्णन केले आहे. कुंकण प्रांताची (कोकण) राजधानी ताने (ठाणे) आहे, असेही तो म्हणतो.

आपल्या पूर्वजांना देखील चिरतरुण दिसावे, अमर व्हावेसे निश्चितच वाटायचे. भारतीय रसायनशास्त्राच्या प्रकरणात त्याने लिहिले आहे की, रसायने बनविण्याचा हेतू आजार बरे करणे हा आहेच; त्याचबरोबर चिरतरुण दिसणे हा देखील आहे. केस काळे करणे, सुरकुत्या कमी करणे, केसांची वाढ करणे, अमर होणे यासाठी रसायनशास्त्र विभागात अनेक प्रयोग व्हायचे, असे तो म्हणतो. एका रसायनतज्ज्ञाने माळव्याच्या राजास सांगितले की, राजाला तो अमर करू शकतो. राजाने उकळत्या तेलात उडी मारावी आणि काही चूर्णे तो क्रमाक्रमाने टाकत जाईल. राजा तयार न झाल्यामुळे शेवटी त्या माणसानेच उकळत्या तेलात उडी मारली. त्याचा पार लोळागोळा झाला, पण राजाने चुर्णे टाकायला सुरुवात केली आणि काय आश्चर्य! त्या माणसाला पुन्हा रूप प्राप्त होऊ लागले. पण शेवटचे चूर्ण टाकण्याच्या आधी राजाला भीती वाटली की, हा माणूस अमर झाल्यावर आपले राज्य बळकावेल. म्हणून शेवटचे चूर्ण राजाने टाकले नाही. तेल थंड झाल्यावर त्या माणसाच्या उंचीचा एक चांदीचा खडक बाहेर आला. माळव्याच्या राजा भोजने धार येथील राजवाड्यात हा चांदीचा खडक ठेवला होता.

भारतीय वर्णव्यवस्था आणि विवाह पद्धती यावर अल्बेरुनीने बारकाईने टिपण केले आहे. तो म्हणतो की, भारतीय लोक लहानपणी लग्न करतात. त्यामुळे ही लग्ने आई- वडिलांच्या पसंतीनेच होतात. घटस्फोट त्या काळी अस्तित्वात नव्हता. पुरुष स्त्रीला लग्नाच्या वेळी भेट देतो. त्यावर त्याचा नंतर काहीही हक्क राहत नाही. जास्तीत जास्त चार स्त्रियांबरोबर पुरुष विवाहबंधनात अडकू शकतो.

नातेवाईकांमध्ये रोटीबेटीचे व्यवहार आक्षेपार्ह असायचे. पुरुषाने स्वतःच्या जातीत किंवा खालच्या जातीत लग्न करावे. लग्नाच्या वेळी मुलीच्या वडिलांनी अट घालून मुलीचे लग्न केले असेल तर मुलीला होणाऱ्या संततीवर मुलीच्या वडिलांचा हक्क असू शकायचा. मुलाला त्याच्या आईची जात किंवा वर्ण मिळतो. मूल जन्मल्यानंतर तिसऱ्या वर्षी बाळाचे जावळ काढण्यात येते आणि सातव्या किंवा आठव्या वर्षी त्याचे कान टोचण्यात येतात.

कायद्याच्या प्रक्रियेत जर लिखित स्वरूपाचा पुरावा नसेल तर साक्षीदाराची साक्ष ग्राह्य धरण्यात येते. कमीत कमी चार साक्षीदार असावेत. पण जर एकमेव साक्षीदाराची साक्ष न्यायाधीशाच्या दृष्टीने विश्वसनीय असेल तर ती साक्ष ग्राह्य धरून एकाच साक्षीच्या आधारे निकाल लागू शकतो. जर वादी (फिर्यादी) आपला दावा सिद्ध करू शकला नाही तर प्रतिवादीने शपथ घ्यावी लागते किंवा शपथेचा भार फिर्यादीवर सोपवून प्रतिवादी म्हणू शकतो, तुझा दावा खरा आहे अशी शपथ तू घे... तू, मागत आहे ते मी तुला देईल. शपथेचे अनेक प्रकार आहेत. जर दाव्याचा विषय फारसा महत्त्वाचा नसेल तर प्रतिवादी पाच विद्वानांच्या साक्षीने शपथ घेतो. जर मी असत्य बोलत असेल तर माझ्या मालमत्तेतील त्याच्या दाव्याच्या रकमेच्या आठपट मूल्य एवढी संपत्ती त्याला नुकसान भरपाई म्हणून मिळो. शपथेचे अतिशय कठोर प्रकारही त्याकाळी अस्तित्वात होते.

शपथेचा आणखीन एक प्रकार म्हणजे आरोपीला वेगाने वाहणाऱ्या नदीजवळ नेले जाते. आरोपी पाण्याला उद्देशून म्हणतो, हे जलदेवते, मी जर असत्य बोलत असेल तर मला मृत्यू येऊ दे आणि जर मी सत्य बोलत असेल तर माझे रक्षण कर. त्यानंतर पाच जण मिळून त्याला पाण्यात ढकलून द्यायचे. जर तो सत्य बोलत असेल तर तो बुडायचा नाही.अल्बेरुनीने समाजाचे निरीक्षण करताना भारतीयांच्या छोट्या छोट्या गोष्टी छान रंगवून सांगितल्या आहेत. सापाचे विष उतरवण्यासाठी एक विशिष्ट मंत्र तालात म्हटला जातो.

एकच ठेका सतत ऐकल्यामुळे सर्पदंश झालेल्या माणसाला झोप येते आणि त्याच्या वेदना कमी होतात. रानात कोवळे ऊन खात बसलेल्या हरणाच्या भोवती गोल करून एक वेगळाच आवाज सगळे मिळून काढतात. हळूहळू होतं काय की त्या हरणाला अशा तालबद्ध आवाजाची सवय होते. सभोवतालच्या माणसांची सवय होते आणि अशी सवय झाली की भोवतालची माणसे त्याला अलगद जंगलातून घराकडे नेतात आणि मारतात.

भारतात बुद्धिबळ आणि चौसर त्याकाळीही फार लोकप्रिय होते. बुद्धिबळ चार जण मिळून खेळायचे, अशी माहिती अल्बेरुनीने दिलेली आहे.

अलेक्झांडर, मेगॅस्थेनीसची आठवण यावी अशाप्रकारे अल्बेरुनीने प्राण्यांचे वर्णन केले आहे. चार डोळ्यांचे हरीण, दख्खनच्या पठारावर असणारा आणि हत्तीलाही लोळवणारा शरभ, दक्षिण भारतातील नद्यांमध्ये असलेला ऑक्टोपससारखा प्राणी अशा अनेक चित्रविचित्र प्राण्यांची वर्णने त्याने रंगविली आहेत. अल्बेरुनीचे महत्त्व यासाठी की, त्याने संशोधनाची शिस्त पाळली.

ग्रीक, अरेबिक आणि भारतीय तत्त्वज्ञानाचा निःपक्षपातीपणाने तौलनिक अभ्यास केला. संस्कृत ग्रंथांचे संदर्भ अतिशय प्रामाणिकपणे दिले. त्याच्या अंगी असलेल्या विचक्षण बुद्धिमत्तेने आणि तार्किक शिस्तीने गजनीच्या मेहमूदचा हा युद्धकैदी मनाचा ठाव घेतो.

---

आनंद स्पंदन

डॉ. अविनाश मोहरील

# खळी गालावर पडावी, कपाळावर नव्हे...



मित्रांची मैफल जमली होती. सगळी मंडळी ठरल्याप्रमाणे आली होती. खूप दिवसांनतर सारेजण एकत्रित येणार म्हणून जंगी तयारी करण्यात आली होती. सगळे जमले तरी काहीतरी उणीव भासत होती. सर्वांच्या गप्पा सुरू झाल्या होत्या. जुन्या आठवणींना उजाळा मिळत होता. मधून- मधून हसणेही सुरू होते. सगळे ठरल्याप्रमाणे होत असूनही मैफलीत रंग भरला जात नव्हता. अचानक तो आला. त्याचे येणे म्हणजे चैतन्यच जणू. त्याच्या आगमनाने काय जादू झाली ठाऊक नाही; प्रत्येकच जण एकदम जोशात आला. सगळ्यांसाठी तो लॉलीपॉप घेऊन आला. मग गाणे म्हणणे सुरू झाले. सगळ्यांना सोबत घेऊन खास जुन्या ग्रुपमधील लीड अँड फॉलो वाली मजेदार गाणी म्हणून झाली. त्यात भर म्हणजे नाचणेही सुरू झाले. त्याचे नाचणेही धमाल. सर्वांना नाचायला लावणे, धमाल विनोद आणि खूप काही. रटाळपणे संथ लयीत चाललेली मैफल पुढे दोन-तीन तासपर्यंत खळखळत्या धबधब्याप्रमाणे अक्षरशः कोसळत होती. हा सारा बदल झाला तो केवळ त्याच्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वाने. कारण त्याचे व्यक्तिमत्त्व प्रत्येकाच्या गालावर खळी उमटवणारेच होते.

आनंद वन भुवनी या विषयावरील एका व्याख्यानात आनंदी जीवन जगण्याची सूत्रे विषद करताना मी एकदा असे म्हणालो की, व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व असे असावे की त्याला किंवा तिला बघितल्यावर बघत असलेल्याच्या गालावर खळी पडावी; कपाळावर नाही. कारण कपाळावर पडलेल्या खळीला आठी असे म्हणतात. माझे ते वाक्य खूप आवडल्याची पावती एका ८० वर्षांच्या आजोबांनी गोड हसून मला व्याख्यानानंतर पाठीवर थाप दिली होती; ती अजूनही स्मरणात आहे. परंतु या गालावर खळी पाडणार्या व्यक्तींच्या अगदी उलट काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, ज्यांना भेटून त्यांचा नकारात्मक व निराशावादी जीवन दृष्टिकोन आपल्या कपाळावर आठीच निर्माण करतो. सार्वजनिक जीवन असो वा खाजगी; या मंडळींचा चेहरा इस्त्री केल्यागत कडक व गंभीर असतो.

सदोदित गंभीर असलेल्या या मंडळींची एक कमावलेली नजर असते. त्या नजरेतून मी सर्वश्रेष्ठ व मला सोडून बाकी सर्व कनिष्ठ, असे ते प्रत्येकाला दर्शवित असतात. या असल्या वर्तणुकीमुळे या मंडळींचा दरारा असतो. खाजगी जीवनातही हे लोक विनोद करणे किंवा परिवारासोबत हसत बसणे यासारखी त्यांच्या लेखी क्षुल्लक असलेली कामे करीत नाही. असा इस्त्री केलेला चेहरा घेऊन घरी आलेला बाप जगातील कोणत्याच मुलांना नको असतो. या असल्या वागण्यामुळे यांचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन संपूर्णपणे नकारात्मक बनलेला असतो. या मंडळींना कधीही स्वतः सोडून इतरांचे कौतुक करताच येत नाही. कारण आत्मस्तुतीमुळे इतरांसाठी त्यांच्याकडे शब्दच उरलेले नसतात. कधी कधी सत्ता किंवा पैसा या बाबींच्या भरवश्यावर यांचे असले वागणे खपवून घेतले जाते. परंतु यांच्या आगमनाने कुणाच्याही गालावर खळी उमटत नाही तर ती कपाळावर आठीच्या स्वरूपातच उमटते.

दुर्दैवाने आपल्याच कोशात असलेल्या या मंडळींना ती अनेकांच्या कपाळावर उमटणारी आठीही दिसत नाही व त्यामुळे यांच्या वागणुकीत बदलही होत नाही. या गंभीर प्रवृत्तीच्या मंडळींपेक्षा अतिशय वेगळे आणि हवेहवेसे वाटणारीही काही मंडळी आपल्याला भेटत असतात.

व. पु. काळेंच्या शब्दात सांगायचे झाल्यास जीवनाच्या प्रत्येक क्षणाला महोत्सवामध्ये परावर्तित करण्याची क्षमता असलेले हे लोक आपल्या जीवनात इंद्रधनुष्यी रंग भरून आपले जीवन रंगीबेरंगी नवितात. काय असतं त्यांच्याकडे असे विशेष? सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांच्याकडे असतो भरभरून वाहणारा जीवनाबद्दलचा उत्साह. त्यांची दहा मिनिटांची भेटही आपल्याला प्रसन्नता प्रदान करते. कारण ते प्रत्येक गोष्ट सकारात्मकतेने मांडत असतात. प्रत्येक गोष्टीतले चांगले बघत असतात व त्या चांगल्यालाच प्रदर्शित करीत असतात. यामुळे इतरांचे कौतुक करण्यासाठी यांच्याकडे शब्दांची कमतरता नसते तर ते प्रत्येकाच्या चांगल्या कामाला उदंड प्रतिसाद देतात. प्रत्येकाच्या कामाला सकारात्मक प्रतिसाद देणे, त्या प्रतिसादाद्वारे त्याला आणखी चांगले कार्य करण्यासाठी प्रेरित करणे हे त्यांच्या आयुष्याचे महत्त्वाचे कार्य असते. ही मंडळी कायम हसत असतात आणि छोटे छोटे विनोद करून आसपासचे वातावरण विनोदी बनवितात. त्यांना भेटून आपल्या कामाबद्दल छान व मनापासून पावती मिळणार याची खात्री असते. आपल्या कामाची पावती प्रत्येकालाच हवी असते, पण मनःस्वी व हम खास मिळणार असे व्यक्तिमत्त्व स्वाभाविकपणे आपल्याला आवडायला लागते. या मंडळींना प्रत्येक गोष्ट मनापासून करण्याची सवय असल्याने त्यांचा प्रतिसाददेखील विलोभनीयच असतो. (पान ६ वर)

---

विवेचन

श्रीरंग श्री. हिर्लेकर

# धनुर्वेद म्हणजे संपूर्ण युद्धशास्त्र (उत्तरार्ध)




वेदपूर्वार्धात शस्त्र व धनुष्यासंबंधी वाचले. शस् म्हणजे कापणे, छेदणे. उपयोगानुसार बाणांचे प्रकार असे- क्षुरप्र नावाच्या बाणाचे पाते वस्तर्यासारखे असून शत्रूचे हात-पाय किंवा मान उडवण्यासाठी, अर्धचंद्र बाणाने रथाचा ध्वज किंवा शत्रूची मान कापून काढल्या जात असे. भल्ल बाण रुंद पात्याचा असून त्याने खोलवर जखम केल्या जाई. नाराचा बाण प्राणघातक आघातासाठी, सूचिमुख शत्रूच्या अंगावरील पोलादी कवच भेदून शरीरात घुसत असे.

### अस्त्र म्हणजे गायडेड मिसाईल

अस् म्हणजे टेकणे. बाण अथवा कशावरही अभिमंत्रित करून स्थापना केलेली शक्ती म्हणजे अस्त्र हा अर्थ प्राप्त झाला. याच्या दिव्य प्रभावाने अपेक्षित कार्य सिद्ध होत असे. इंद्रपुत्र जयंताने सीतेची खोडी काढली तेव्हा रामाने त्याच्यावर ब्रह्मास्त्र स्थापित दर्भाची काडी टाकली. जयंत त्रिखंडात भटकला तरी ब्रह्मास्त्राने त्याचा पाठलाग सोडला नाही. शेवटी शरण आल्यावरच रामाने अस्त्राची दिशा फिरवली. अर्जुनानेही अश्वत्थाम्यावर सोडलेले ब्रह्मास्त्र शांत केले. याचा अर्थ अस्त्र शांत करणे किंवा दिशा बदलवणे शक्य असे.

अस्त्रांचे अनेक प्रकार असून ते सिद्ध करण्याचे मंत्र आहेत. मंत्र म्हणजे जिच्या मननाने आपले रक्षण होते अशी शब्दरचना. या मागे ध्वनिशास्त्र आहे. स्वर, तय, ताल, आरोह, अवरोह, कंपने यांचा विशिष्ट पद्धतीने उच्चार करावयाचा, त्या मंत्रदेवतेची जी काय बंधने असतील त्यांचे कठोर पालन करावयाचे आणि मुख्य म्हणजे पुस्तके वाचून मंत्र ग्रहण करावयाचा नाही तर गुरुमुखातूनच त्याचे आदरपूर्वक श्रवण करून स्वीकार करावयाचा. अशाने मंत्रदेवता सिद्ध होऊन विशिष्ट कार्य साध्य होते.

### अस्त्रांची नावे, देवता आणि कार्य

आग्नेयास्त्राची देवता अग्नी, यामुळे अग्निज्वाला प्रकट होऊन शत्रूचे दहन करावयाचे. वरुणास्त्राची देवता वरुण असून यामुळे जलप्रवाहाचे लोट निर्माण करता येतात तर पर्जन्यास्त्रामुळे आकाशात मेघ दाटून येऊन जलवर्षाव करावयाचा.

वायुदेवतेच्या वायव्यास्त्राच्या प्रभावाने मोठी वादळे उत्पन्न करून शत्रू सैन्याची दाणादाण उडवायची किंवा पर्जन्यास्त्रामुळे उत्पन्न झालेले जलवृष्टीचे मेघ परतवून लावायचे. नागास्त्रामुळे असंख्य नाग- सर्प प्रकट करून शत्रू सैन्यावर सोडावयाचे. गरुड हा नागाचा शत्रू. अर्थात गरुडास्त्राच्या प्रयोगाने सर्प पळवून लावायचे. इंद्रास्त्र हे अत्यंत प्रभावी आणि वज्रासारखे भेदक. याचा प्रहार करून मोठमोठ्या खडकाचेही चूर्ण व्हायचे. पाशुपतास्त्राची देवता पशुपतिनाथ. हे शंकराप्रमाणेच प्रलयंकारी. नारायणास्त्राची देवता साक्षात विष्णुनारायण. अत्यंत सामर्थ्यशाली. आणि याचे वैशिष्ट्य म्हणजे प्रतिकार करावा तितका याचा प्रकोप अधिकच वाढावयाचा.

आजचे अणुबॉम्ब म्हणजे याच्यापुढे दिवाळीतील फटाके. ब्रह्मास्त्रामुळे पृथ्वीवर धरणीकंपासारखी परिस्थिती, समुद्रात त्सुनामीसारख्या लाटा, नद्यांचे पाणी उकळून त्यांची वाफ होणे, अतिउष्णतेमुळे सर्व परिसर जळून राखरांगोळी असले भयंकर परिणाम व्हायचे. याचा वापर न करता टाळण्यावरच भर दिला जायचा. [illegible] न देयं: दिव्यास्त्रे कोणालाही शिकवली जात नसत. त्यातही ब्रह्मास्त्राविषयी तर विशेषच निर्बंध सांगितले आहेत. शिष्याची कठोर परीक्षा घेऊन, पात्रता, नैतिकता तपासून त्याला जबाबदारीचे भान असल्याची खात्री करून मगच अस्त्रविद्या देण्यात येत असे. अस्त्राचा वापरही करता यावा आणि आणि प्रसंगी उपशम म्हणजे माघारीही घेता यायला हवे. महाभारतात शेवटचे निकराचे युद्ध अर्जुन आणि अश्वत्थामा यांच्यात झाले. कोणीच कोणाला आटपेना. शेवटी दोघांनीही एकमेकांवर ब्रह्मास्त्र सोडले. आता सृष्टीचा विनाश होणार हे निश्चित. तेव्हा नारद आणि व्यासांच्या विनंतीवरून अर्जुनाने आपले अस्त्र शांत केले.

### अस्त्रांविषयी थोडक्यात सांगावयाचे तर...

१) दीक्षा, संधान, मोक्षण आणि उपसंहार म्हणजे अस्त्रविद्येची संपूर्ण प्रक्रिया. २) कोणत्या अस्त्राला कोणते अस्त्र निष्प्रभ करते ती माहिती असावी, ३) अस्त्रांचे मंत्र, देवता, तिची बंधने, त्यामागील तात्विक अर्थ यांची जाणीव, ४) परिणामांचे भान.

अस्त्रविद्या ही आजच्या ज्ञात भौतिक शास्त्रापलीकडील आहे. पंचभौतिक विज्ञानाच्या चौकटीत तिचा अन्वय लावणे अशक्य. तिची एबीसीडीच वेगळी. फार फार तर तिचे मंत्र म्हणजे व्होकल कमांडस म्हणता येतील. आजच्या गायडेड मिसाईल प्रमाणे क्षेपण झाल्याबरोबर ते लक्ष्याचा अचूक वेध घेऊन आपले नियोजित कार्य पूर्ण करणारच.

मिसाईल्स रडार, इन्फ्रेड जीपीएस, लक्ष्याच्या प्रतिमा, अनेक प्रकारचे सेन्सर्स यावर विसंबून कार्य करतात तर अस्त्रे त्यांच्या मंत्ररूपी व्होकल कमांड स्वर. मिसाईल्सचे पासवर्डस् असावेत तसे धनुर्वेदातील अस्त्र त्यांच्या मालकांच्या आवाजातील मंत्रांनेच कार्यान्वित होत. ते परत घेता यायचे हे त्यांचे आणखीन एक वैशिष्ट्य.

थोडक्यात, दीक्षा म्हणजे गुरूकडून अधिकृत नोंदणी, अस्त्रदान व स्वीकार म्हणजे ॲक्सेस, उपसंहार म्हणजे डिॲक्टिव करणे अशी तुलना योग्य होईल. कर्णाने परशुरामाकडून अनधिकृतरीत्या ब्रह्मास्त्र विद्या मिळवली, पण ऐनक्षणी ॲक्सेस विसरला. इंद्राने कर्णाला दिलेली वासवी शक्ती ही ब्रह्मास्त्र अथवा नारायणास्त्रासारखीच संहारी. पण फक्त एकदाच वापर हे तिचे निराळेपण. कदाचित तिच्या मंत्ररूपी कमांडमध्येच तशी रचना असावी.

धनुर्वेदात अस्त्रांची सविस्तर वर्णने आहेत. रामायण-महाभारतात त्यांचे प्रत्यक्ष प्रयोगही आढळतात. मात्र कोठेही त्यांच्या संहिता उपलब्ध नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.

कदाचित त्यांच्या भयानक संहारक शक्तींमुळेच हे ज्ञान गुप्त राहावे, असा संकेत असेल आणि क्वचित कोठे काही सापडले तरी त्याची सिद्धता सर्वसाधारण मनुष्याच्या आकलनापलीकडीलच असणार.

---

## आषाढ

त्या ढगांचा भार थोडा
आधार सांगून वाकला
ती कथा मग प्रेम विरह
शब्द स्थापून गाजला.
ती मेघ वाणी उरात
संगीत सांगून लाजली
पावसाची ती कथा ना
आषाढस्य वाटली.
ती प्रवाही प्रेम गीते घेऊन पानांवर थाटले
दूर मातीच्या कणांवर
विरह घेऊन आटले.
उष्ण व्याप्त कडा तिच्याशी
तृप्त धारा वेढल्या
मग कविता पाऊस होऊन
आषाढस्य गाजल्या.
ती लिहिली मेघवाणी
सरींच्या आशेत सुख
हिरवळीवर प्रेम लिहून
कविता विरही सन्मुख.
त्या सरींचा आधार होऊन
आभाळ आज्ञेत वाहिले
मातीत कृष्ण कांतीतले मज
विठू दर्शन भावले.
विठू दर्शन भावले.

श्रद्धा राऊत बुरले

## मन

माझ्याच आसवांनी, नयनी ओल आहे ।
जवळचे, दूरचे, सारे अबोल आहे ।।
गालावरी जरी ही, लाली सुरेल आहे ।
नयनी अंजन, तरी ही, कराल आहे ।।
कां? व्यर्थ मी झुरावे, कर्म सरल आहे ।
आसवं, थव्यांचा वेग, का विकल आहे ।।
मन, उगा, उदास, स्तब्ध सकल आहे ।
हिंदोळ जरासा, भावना आंदोल आहे ।।
मनी, उत्तुंग, नव शंका, उमल आहे ।
गात्रांत, हळहळ, रेखा तरल आहे ।।

रेखा भिवगडे

पर्यावरण **मिलिंद बेंडाळे**

# मुळा-मुठा नदीचा गुदमरतोय श्वास

**पुण्याची ओळख शिक्षणनगरी, सांस्कृतिक राजधानी, आयटी हब आणि वेगाने विकसित होणारे महानगर अशी आहे; मात्र या शहराच्या विकासाच्या चमकदार चेहऱ्यामागे एक विदारक वास्तव दडले आहे. शहराची जीवनदायिनी मानली जाणारी मुळा-मुठा नदी आज प्रदूषण, अतिक्रमण आणि कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली अक्षरशः गुदमरते आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नुकत्याच सादर केलेल्या अहवालाने ही परिस्थिती पुन्हा एकदा अधोरेखित केली.**

लोणी काळभोर आणि कदम वाकवस्ती ग्रामपंचायतींच्या हद्दीत नदीकाठी मोठ्या प्रमाणात घनकचरा टाकला जात आहे. तो हटवण्यासाठी किंवा रोखण्यासाठी कोणतीही प्रभावी उपाययोजना करण्यात आलेली नाही. यामुळे नदीचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. कोणत्याही नदीचे प्रदूषण ही केवळ पर्यावरणाची समस्या नसते, तर सार्वजनिक आरोग्य, शेती, जैवविविधता, स्थानिक अर्थव्यवस्था आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेचीही परीक्षा असते.

मुळा- मुठा नदीच्या बाबतीत हे अधिक प्रकर्षाने जाणवते. कारण ही नदी केवळ पुणे शहरातून वाहणारी जलवाहिनी नाही, तर हजारो नागरिकांच्या जी-वनाशी जोडलेली परिसंस्था आहे; मात्र आज या नदीत प्लॅस्टिक, पॉलिथिन, बांधकाम साहित्य, हॉटेलमधील कचरा, थर्माकोल, मृत जनावरांचे अवशेष आणि मांसविक्री केंद्रांमधील जैविक कचरा बिनधास्त टाकला जात आहे. एवढेच नव्हे, तर या कचर्याला वारंवार आग लावली जात असल्याने विषारी धूर परिसरात पसरतो आणि स्थानिक नागरिक, विद्यार्थी तसेच शैक्षणिक संस्थांतील कर्मचारी यांना त्याचा त्रास सहन करावा लागतो. विशेष म्हणजे हा प्रकार अचानक उघडकीस आलेला नाही.



स्थानिक नागरिकांनी सातत्याने तक्रारी केल्या, प्रदूषण नियंत्रण मंडळाने पाहण्या केल्या, हवा आणि पाण्याची गुणवत्ता तपासली, नोटीस बजावल्या, तरीही परिस्थितीत कोणताही बदल झालेला नाही. याचा अर्थ समस्या केवळ कचरा व्यवस्थापनाची नाही, तर प्रशासनाच्या इच्छाशक्तीच्या अभावाची आहे. कायदे अस्तित्वात आहेत, नियम आहेत, दंडात्मक तरतुदी आहेत; पण त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे नियम केवळ कागदोपत्री राहतात आणि नदी मात्र दिवसेंदिवस अधिक प्रदूषित होत जाते. घनकचरा व्यवस्थापन नियमांनुसार प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेवर कचऱ्याचे वर्गीकरण, संकलन, प्रक्रिया आणि वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावण्याची जबाबदारी आहे; मात्र अनेक ग्रामपंचायती आणि स्थानिक संस्था आजही खुल्या जागेत कचरा टाकणे हा सर्वात सोपा मार्ग स्वीकारतात. नदीकाठ हा त्यासाठी सहज उपलब्ध पर्याय ठरतो. कारण तेथे तात्पुरती जागा मिळते आणि जबाबदारी दुसऱ्यावर ढकलता येते; पण निष्काळजीपणाची किंमत संपूर्ण समाजाला मोजावी लागते. मुळा-मुठा नदीतील प्रदूषणाचा परिणाम केवळ नदीपुरता मर्यादित राहत नाही. नदीत मिसळणारे रासायनिक पदार्थ, प्लॅस्टिक आणि जैविक कचरा पाण्याची गुणवत्ता घसरवतात. त्यामुळे जलचरांचे अस्तित्व धोक्यात येते. भूजलावर परिणाम होतो आणि शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याची गुणवत्ता कमी होते.

नदीकाठच्या परिसरात दुर्गंधी, डासांची उत्पत्ती आणि संसर्गजन्य आजारांचा धोका वाढतो. ज्या नदीने शहराला जीवन दिले, त्याच नदीकडून आज आरोग्याचा धोका निर्माण होत आहे, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. पुण्यासारख्या वाढत्या शहरात कचर्याचे प्रमाण वाढणे स्वाभाविक आहे; मात्र त्याचे नियोजनबद्ध व्यवस्थापन करणे ही स्थानिक स्वराज्य संस्थांची प्राथमिक जबाबदारी आहे. दररोज निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे प्रमाण माहीत असताना-ही त्यासाठी प्रक्रिया केंद्रे उभारली जात नाहीत, कचऱ्याच्या स्रोतावर वर्गीकरण प्रभावीपणे राबविले जात नाही आणि पुनर्वापराच्या साखळीला चालना दिली जात नाही. परिणामी, कचर्याचे ढिगारे नदीकाठ, मोकळ्या जागा आणि नाल्यांमध्ये वाढत जातात. या समस्येकडे केवळ पर्यावरणीय प्रश्न म्हणून न पाहता विकासाच्या संकल्पनेतील मोठी विसंगती म्हणून पाहण्याची गरज आहे. एका बाजूला स्मार्ट सिटी, हरित शहर, शाश्वत विकास

अशा संकल्पनांची चर्चा केली जाते, तर दुसऱ्या बाजूला शहराच्या मध्यभागातून वाहणारी नदी कचर्याच्या ढिगाऱ्यात बदलत आहे. ही विरोधाभासाची स्थिती प्रशासनाच्या नियोजनातील त्रुटी स्पष्ट करते. प्रदूषण नियंत्रण मंडळाने संबंधित ग्रामपंचायतींना नोटिसा बजावल्या आणि विविध कायद्यांतर्गत कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे; मात्र केवळ नोटिसा देऊन प्रश्न सुटणार नाही. दोषींवर आर्थिक दंड, फौजदारी कारवाई, कचरा व्यवस्थापनाची सक्ती आणि नियमित देखरेख यांसारख्या उपाययोजना प्रभावीपणे राबवाव्या लागतील.



दुसरीकडे नदीकाठावरील बेकायदेशीर कचरा डेपो तातडीने हटवणे आणि त्या ठिकाणांचे पुनर्वसन करणेही आवश्यक आहे. नदी संवर्धनासाठी केवळ सरकारी यंत्रणांवर अवलंबून राहून चालणार नाही. नागरिक, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था आणि उद्योग क्षेत्र यांचाही सक्रिय सहभाग आवश्यक आहे. घराघरातून ओला आणि सुका कचरा वेगळा करणे, प्लॅस्टिकचा वापर कमी करणे, नदीकाठी कचरा टाकणार्यांची माहिती प्रशासनाला देणे आणि स्वच्छता मोहिमांमध्ये सहभागी होणे या छोट्या वाटणाऱ्या कृतींचा मोठा परिणाम होऊ शकतो. याशिवाय संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित करून नदीकाठ परिसरावर देखरेख ठेवणे, सीसीटीव्ही प्रणाली बसवणे, ड्रोनद्वारे निरीक्षण करणे आणि नियमभंग करणार्यांवर त्वरित कारवाई करणे आवश्यक आहे.

पर्यावरणीय गुन्ह्यांकडे किरकोळ उल्लंघन म्हणून पाहण्याची मानसिकता बदलावी लागेल. मुळा- मुठा नदीचे पुनरुज्जीवन हा केवळ सौंदर्यीकरणाचा प्रकल्प नाही. तो पर्यावरण, सार्वजनिक आरोग्य आणि भविष्यातील पिढ्यांच्या जीवनमानाशी संबंधित विषय आहे.

जगातील अनेक शहरांनी आपल्या प्रदूषित नद्यांना पुन्हा जिवंत केले आहे. त्यासाठी दीर्घकालीन नियोजन, राजकीय इच्छाशक्ती आणि नागरिकांचा सहभाग या तीन बाबी महत्त्वाच्या ठरल्या.

पुण्यासाठीही हाच मार्ग स्वीकारावा लागेल. आज मुळा-मुठा नदी मदतीसाठी हाक देत आहे. तिच्या पात्रात वाहणारे पाणी कमी आणि कचरा अधिक दिसत असेल, तर ते केवळ पर्यावरणाचे अपयश नाही, तर आपल्या विकासाच्या मॉडेलचे अपयश आहे.

नदी वाचवणे ही केवळ सरकारची किंवा एखाद्या संस्थेची जबाबदारी नाही. ती संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. आज आपण डोळेझाक केली, तर उद्या नदीचे पुनरुज्जीवन अधिक खर्चिक आणि अधिक कठीण होईल. त्यामुळे प्रशासनाने तातडीने कठोर पावले उचलणे, स्थानिक स्वराज्य संस्थांना जबाबदार धरणे आणि नागरिकांनीही पर्यावरणपूरक वर्तन स्वीकारणे ही काळाची गरज आहे. कारण नदी जिवंत असेल, तरच शहर जिवंत राहील.

मुळा-मुठा वाचवणे म्हणजे पुण्याचा पर्यावरणीय श्वास वाचवणे होय. आज घेतलेले निर्णयच उद्याच्या पिढ्यांना स्वच्छ, निरोगी आणि प्रवाही नदीची भेट देऊ शकतात; अन्यथा इतिहास आपल्याला एका जीवनदायिनी नदीच्या मृत्यूचे जबाबदार म्हणूनच ओळखेल. एकेकाळी शहराची तहान भागवणारी, शेतीला पाणी देणारी आणि जैवविविधतेने समृद्ध असलेली ही नदी आज सांडपाणी आणि घनकचर्याचे वहन करणारा नाला बनत चालली आहे. शहराचा विकास झाला; पण नदीच्या संवर्धनासाठी आवश्यक असलेली पायाभूत व्यवस्था मात्र त्याच वेगाने विकसित झाली नाही. परिणामी, विकासाचा सर्वाधिक फटका नदीलाच बसला. पर्यावरण संरक्षणाचे कायदे केवळ कागदावर न राहता त्यांची कठोर अंमलबजावणी झाली, तर अशा घटनांवर निश्चितच आळा बसू शकतो. त्यामुळे जबाबदार अधिकार्यांचे उत्तरदायित्व निश्चित करणे गरजेचे आहे. नदीच्या प्रदूषणाचा परिणाम केवळ आजच्या पिढीवरच होत नाही, तर भविष्यातील जलसुरक्षेलाही तो गंभीर धोका निर्माण करतो. आज हवामान बदलामुळे आधीच पाण्याची उपलब्धता कमी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. **(पान ६ वर)**

**पान १ वरून**

## वंदावे गुरूपद...

सकाळी शाळेत शिकायचे, दुपारी क्लासला जायचे, एखाद्या तिसर्याचे साहित्य अभ्यासाला पूरक म्हणूनच वापरायचे, गरज वाटल्यास घरातल्याचे सहाय्य घ्यायचे. म्हणजेच एक गुरू-एक शिष्य ही स्थितीच आता राहिलेली नाही. गुरुगृही असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या चारित्र्याचा, व्यासंगाचा, वागणुकीचा, व्यवहारज्ञानाचा प्रभाव शिष्यांवर पडत असतो. हे संस्कार अगदी कळत-नकळत घडतात आणि तेच त्या कोवळ्या वयात आदर्श निर्माण करत असतात. आयुष्यभर दीपस्तंभासारखी साथ देत असतात. पण काळाच्या प्रवाहात हा प्रघात मागे पडला आणि शिक्षणाचा बाजार मांडणारी एक व्यवहारी व्यवस्था अस्तित्वात आली. पण याचा अर्थ असा नव्हे की, आज गुरुपदी बसवावे असे लोकच नाहीत. सगळीकडे पसरलेली भेसळीची कीड इथेही पसरली असली, तरी अनेक ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वे आपल्या आयुष्यात येतात. त्यातील काही लोक तर निरिच्छ भावनेने विद्यार्थ्यांच्या भल्यासाठी झटत असतात. आज गुरूप्रती आदर कमी होतोय, ही वस्तुस्थिती आहे. गुरूला एकेरी संबोधण्यापर्यंत र्हास झालाय हे देखील वास्तव आहे. पैसा मिळविणे हे ईप्सित समोर ठेवून विद्यादान करणार्यांची संख्या वाढत आहे, हे नाकारण्यात अर्थ नाही. पण म्हणून सगळे संपले असे नाही. कल्पना आणि वास्तव या दोन विरुद्ध बाबी असतात. त्या सांधणे हे कर्मकठीण काम. पण काहींना ही किमया साधते आणि बदलत्या प्रवाहातही स्वत्त्व टिकवून प्रवास सुरू ठेवला जातो. आजही असे अनेक आदर्श आहेत. आजही गतस्मृतींचा धांडोळा उलगडतो तेव्हा आपले शिक्षक, त्यांनी केलेला उपदेश आठवतो. शिक्षक रस्त्यात भेटले तर नकळत पायाला हात लावून नमस्कार केला जातो, शिक्षकांचा आठव अधिक गहिरा होत जातो. आजच्या पिढीलाही या अनुभूतीचा आनंद घेता यावा अशी इच्छा आहे. गुरुपौर्णिमा इव्हेंट होता कामा नये. किमती भेटवस्तू, हार-फुलांचे गुच्छ देऊन गुरुपौर्णिमेचा इव्हेंट साजरा होईल, पौर्णिमा नाही. ही व्यासपौर्णिमा साजरी करायची तर दोघांची मने विशुद्ध हवीत. मनात प्रेमभाव दाटून यायला हवा आणि हा वसा पुढे चालवण्याचा संकल्प सोडायला हवा. दिल्याने वाढणारी ही एकमेव संपत्ती आहे.

## क्यूडेंगाची लस आली तरी...

क्यूडेंगा लसीचे दोन डोस उपलब्ध असून, पहिला डोस घेतल्यानंतर तीन महिन्यांच्या अंतराने दुसरा डोस नागरिकांना घेता येईल. परंतु, गरोदर महिला आणि इम्युनोरिस्पॉनसिव्ह प्रकारची ज्यांची औषधे सुरू आहेत, अशांनी ही लस घेऊ नये, असे वैद्यकीय तज्ज्ञ सांगतात.

या लसीच्या किमतीबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आली नसून, लसीचे मूल्य आणि एकूणच वितरण कार्यक्रमाविषयी आगामी काळात स्पष्टता येईल. परंतु, डेंग्यूची लस टोचून घेतली म्हणजे या आजारापासून आजीवन संरक्षणकवच मिळाले, अशा भ्रमात राहण्याचे काहीएक कारण नाही.

ही लस १०० टक्के डेंग्यूपासून सुरक्षा प्रदान करणारी नसून, डेंग्यूच्या लक्षणांमध्ये ८० टक्के; तर डेंग्यूमुळे रुग्णाला रुग्णालयात दाखल करण्याचा दर हा ९० टक्क्यांनी कमी होणार आहे. शिवाय, या लसीचा परिणाम साधारण साडेचार वर्षांपर्यंत कायम राहणार असल्याचेही समजते. त्याचबरोबर संबंधित रुग्णाच्या रोगप्रतिकारक शक्तीवरदेखील लसीची परिणामकारकता अवलंबून आहेच. याचाच अर्थ, ही लस सर्वसामान्य नागरिकांसाठी उपलब्ध होणार असली, तरी डेंग्यूपासून खबरदारीच्या उपाययोजनांना गत्यंतर नाही.

पूर्वी डेंग्यूचा धोका हा मुख्यत्वे मान्सूनच्या कालावधीपुरता मर्यादित होता. परंतु, जागतिक हवामानबदलामुळे कोलमडलेले एकूणच निसर्गचक्र पाहता, डेंग्यू हा आता केवळ पावसाळी आजार राहिलेला नाही. वर्षभरही त्याचा प्रादुर्भाव देशाच्या अगदी कानाकोपर्यांत पाहायला मिळतो. त्याचे मुख्य कारण म्हणजे, पावसाळ्यात ठिकठिकाणी लगेच निचरा न झाल्यामुळे साचणारे पाणी आणि उष्ण दिवसांचा कालावधी वाढल्याने डेंग्यूच्या डासांचा प्रजनन कालावधीही वाढला. त्यामुळे नवीन लस बाजारात दाखल होणार असली, तरी डेंग्यूविरोधी लढण्यासाठी आरोग्य यंत्रणांना सज्ज राहावे लागेल. सहसा लसीकरणाचे कार्यक्रम हे राष्ट्रीय स्तरावर एकसमान निश्चित कालावधीत राबविले जातात. परंतु, लसीकरणाचा विचार करताना देशातील सर्वाधिक डेंग्यू रुग्णसंख्या आढळणार्या जिल्ह्यांना प्राधान्यक्रम दिल्यास, त्याचे निश्चितच सकारात्मक परिणाम दिसून येतील.

सामाजिक जनजागृती, अचूक निदान, जलद वैद्यकीय मदत आणि डासांच्या संख्येवर नियंत्रण या चतु:सूत्रीचा अवलंब केल्यास डेंग्यूचा प्रादुर्भाव निश्चितच कमी होण्यास मदत होईल. पण, ही केवळ सरकारची अथवा प्रशासकीय जबाबदारी न मानता, सर्वसामान्य नागरिकांनीही डेंग्यूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी खबरदारी घेणे तितकेच क्रमप्राप्त. यामध्ये प्रामुख्याने आपल्या घरात, आसपासच्या परिसरात पाणी साचणार नाही याची काळजी घेण्याबरोबरच, डासांना दूर ठेवण्यासाठी क्रीम, पूर्ण बाह्यांचे कपडे, मच्छरदाणीचा झोपताना वापर यांसारखे उपायही डेंग्यूला दूर ठेवू शकतात. आपले घर- अंगण कितीही स्वच्छ असले, पण आसपासचा परिसर कचऱ्याचे ढीग, दुर्गंधी आणि सांडपाण्याने दूषित असेल, तरी डेंग्यूच्या प्रादुर्भावाची शक्यताही साहजिकच वाढते.

त्यामुळे डेंग्यूचा धोका टाळण्यासाठी स्वत:च्या, आपल्या कुटुंबाच्या आरोग्यरक्षणासाठी आपला परिसरही स्वच्छ राखणे, याबाबत सजगता ही दाखवायलाच हवी!

## आरोपी तुरुंगात, तरी आंदोलक मैदानात का?


पेपरफुटी झालेली असतानाही सुमारे २२ लाख प्रश्नपत्रिका कुठल्याही गळतीविना सुरक्षित देशभर पोहोचविण्याचे आव्हान भारतीय वायू दलाने पूर्ण केले. याचा अर्थ, सरकारने पेपरफुटी किती गांभीर्याने घेतली, हे लक्षात येईल. ही पेपर गळती रोखावी म्हणून सरकार पुढील वर्षापासून पूर्णपणे संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन घेण्याच्याही विचारात आहे. यामुळे पारंपरिक ऑप्टिकल मार्क रिकग्निशन पद्धतच हद्दपार होईल. त्यामुळे देशभर एकसमान आणि पारदर्शक पद्धतीने ही परीक्षा होईल, ही काळजी यापूर्वीच केंद्र सरकार आणि शिक्षण मंत्रालयाने घेतलेली आहे. मात्र, कळीचा मुद्दा करून सरकारला घेराव करून आम्ही भारताचा नेपाळ, बांगलादेश आणि श्रीलंका करू हे म्हणणे कितपत योग्य आहे? अराजकतेचा डाव दिल्ली पोलिसांनी मोडीत काढल्यानंतर आता मुलांवर हल्ला का झाला, अशा वल्गना करताना दिसत आहेत. अर्थात, सर्वकाही चूक आंदोलकांची आहे, असे नाही.

दिल्ली पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जचे व्हिडिओ सोशल मीडियावर फिरतच आहेत. मात्र, गाडी कशी पेटवावी?, दगड कसे मारावेत? याचे प्रशिक्षण सुशिक्षित विद्यार्थ्यांना देणारे कोण होते, याचा तपास लागणे गरजेचे. एक युट्यूबर पोलिसांवर जर पेपर स्प्रे मारत असेल, तर पोलीस हातावर हात ठेवून गप्प बसतील का? असे अनेक किस्से या आंदोलनादरम्यान घडले, त्याची ढाल आता विरोधी पक्ष करत आहेत. मात्र, या सगळ्या आंदोलनाच्या शेवटी ङ्गनीटफ परीक्षा पुन्हा एकदा सुरक्षितरीत्या याच सरकारने पार पडली आहे, हे विसरता कामा नये. सीजेपी समर्थक आणि दीपकेंनी हे सरकार नको, मग पर्याय कोण? या प्रश्नाचेही उत्तर देण्याची जरा तसदी घ्यावी.

नवचेतना **समिधा पाठक**

अमुक गोष्ट मला जमत नाही, किंवा मला समजलेली नाही, हे मान्य करण्यात काहीच गैर नाहीय. विद्यार्थिवस्थेत तर हे मान्य करणं फार महत्त्वपूर्ण आहे. कारण ज्ञानाचा भ्रम हा अज्ञानापेक्षा जास्त भयंकर असतो. कुठलंही काम करताना आपण ते समरस होऊन करायला हवं, कारण आपण जे काम करतो त्यामागे पुष्कळ लोक असतात. त्यामुळे आपल्या कुठल्याही यशात हे सगळे भागीदार असतात. म्हणूनच आपण करतो तेच चांगले असेल, असे मानू नये व मी केले, मी केले, असा अहंकार बाळगायला नको.

विजय आणि प्रकाश हे दोघे सख्खे भाऊ होते. दोघांचा एकमेकांवर फार जीव होता, घासातला घाससुद्धा मिळून वाटून खायचेत. शिक्षण झालं आणि दोघेही मोठ्या शहरांत चांगल्या पदावर नोकरी करू लागले. सणवार साजरे करण्यासाठी एकत्र जमायचे. पुढे मात्र वडिलोपार्जित संपत्तीच्या वाटणीवरून दोघांमध्ये भांडण झाले आणि मग दोघेही एकमेकांशी बोलायचे नाहीत. असे बरेच वर्षं निघून गेलेत. दोघांनाही एकमेकांची खूप आठवण यायची, पण अबोला मात्र कायमच होता. मी का नमतं घ्यावं, हाच विचार दोघेही करायचेत.




अचानक एके दिवशी विजयचा अपघात झाला, प्रकाश त्याला भेटायला म्हणून गेला. पण, तो हॉस्पिटलमध्ये पोहचण्यापूर्वीच विजयची प्राणज्योत मावळली होती. पश्चात्तापाखेरीज प्रकाशकडे आता दुसरा कुठलाही पर्याय नव्हता. असं म्हणतात, रिलेशनशिप डझ नॉट डाय ए नॅचरल डेथ, इट इज मरडर्ड बाय इगो! खरंच नको तिथं फणा काढतो हा अहंकार! आपला हा शत्रू आपल्या नकळत आपलं फार मोठं नुकसान करून जातो. मी- माझं- मला- माझ्यासाठी- ही चौकट, अहंकार आपल्या मनाभोवती आखून ठेवतो. त्यामुळे या चौकटीपलीकडे जाऊन विचार करण्याची मुभा आपल्याला नसते. हृदयातील प्रेम, आपुलकी, जिव्हाळा, सहकार्य, सहानुभूती, ममत्व, मैत्री या सर्व भावनांचा शिरच्छेद करून, हा अहंकार आपल्या मनावर अधिराज्य गाजवत असतो. हाच अहंकार मनाचे दारसुद्धा बंद करून देतो, कारण त्याच्या राज्यात, मला सगळं माहिती आहे, अशी आपल्या मनाची भूमिका होऊन जाते.

आपल्या आयुष्याकडे, आपल्या वास्तवाकडे हा अहंकार पूर्णपणे दुर्लक्ष करतो. ही झापडं डोळ्यांपुढं लागलीत, की माणूस मग आपल्या त्रुटींकडे किंवा वैगुण्याकडे कानाडोळा करू लागतो. सोबतच हा अहंकार आत्मपरीक्षणाचाही पत्ता कट करतो, त्यामुळे नकळतच, अहं ब्रह्मास्मिम असं आपल्याला जाणवू लागतं. आत्म परीक्षणाच्या व ज्ञानग्रहणाच्या अभावी, न्यूनगंड निर्माण होतो आणि मग हा न्यूनगंड झाकण्यासाठी माणसाला सतत धडपड करावी लागते. हाच अज्ञान अहंकार निर्माण करतो, अहंकारामुळे स्वार्थी वृत्ती वाढते, स्वार्थी वृत्तीमुळे असामाधान, कडवटपणा, निराशा वाढते, निराशेतून क्रोध, क्रोधातून तिरस्कार आणि तिरस्कारातून सर्वनाश! असा हा प्रवास चालू राहतो... आपण स्वत:पेक्षा आपल्या अहंला जिवापाड जपतो. मात्र, त्यानंतर हा अहं आपल्यालाच डोईजड कधी होऊ लागतो कळतही नाही, त्यापायी आपण इतरांशी शत्रुत्व पत्करत राहतोच, अहंकार आपलं सर्वार्थाने नुकसान करतो. जवळचे नातेवाईक, सगेसोयरे दुरावू शकतात, मैत्री तुटू शकते. अवाजवी इगो असणारी कुठलीही व्यक्ती आतून शांत नसते. कारण त्या इगोचा त्या व्यक्तीलाही त्रास होत असतो. त्यांच्या आतला मी अस्वस्थ असतो.

अहंकारी व्यक्तींना शांत, स्वस्थ होत जाण्यासाठी आवश्यक अशी मनाची स्थिरता प्राप्त होत नाही. अशी माणसं बहुतांशी आतून असुरक्षित असतात. जगण्याच्या वास्तवाशी त्यांचा संबंध तुटत जातो. आपण कधीतरी संपणार आहोत तसंच या जगातील प्रत्येक भौतिक गोष्ट कधीतरी नाहीशी होणार आहे, किंवा तिचं स्वरूप बदलणार आहे.

थोडक्यात, आपण आणि आपल्या भोवतालचे सर्व घडीचे प्रवासी आहोत, हे वास्तव अहंकारी व्यक्ती मात्र नजरेआड करतात. त्यामुळे आपण या लहान आयुष्यातला प्रत्येक क्षण आनंदात जगावा व इतरांनाही आनंद द्यायला हवा. मी- माझं- मला- माझ्यासाठी- या शब्दांपलीकडे भरपूर मोठं विश्व आहे. व्यक्तीचा इगो जसजसा बळकट होत जातो तसतसा तो त्याच्या सर्व सकारात्मक क्षमता, सृजनात्मक क्षमता आणि मुख्य म्हणजे ज्ञान, सारासार विचार करण्याची क्षमता, बुद्धिमत्ता यांवर निळ्या स्वच्छ आकाशावर मळभ पसरावं तसा पसरत जातो. हा अहंकार अधिक गडद होत जातो आणि या सगळ्या सकारात्मक क्षमता कोमेजून जायला लागतात. आपण इतरांकडून शिकायला हवं आणि अपयश स्वीकारायला हवं- भेटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडून. मग ते लहान मूल का असेना, त्याच्याकडून काही ना काहीतरी शिकायला हवं. या जगातील सर्व प्राणिमात्रांना भावना आहेत आणि त्याही महत्त्वाच्या आहेत, हे प्रत्येकानं स्वीकारायला हवं. तसंच अपयश येणं, हा आयुष्यातील एक भाग आहे. तो भागसुद्धा स्वीकारायला हवा.


सतत चिडणं, नाराज होणं याने माझं मानसिक-शारीरिक नुकसान होतंच आणि आयुष्यातल्या आनंदाच्या क्षणांना आपण मुकतो, हे लक्षात घ्यायला हवं. आयुष्य सतत वाहत असतं. काळ क्षणाक्षणांनी पुढे जात असतो. यश मिळवण्यासाठी प्रयत्न जरूर करावेत, पण त्याहीपेक्षा समाधानी वृत्ती रुजवणे जास्त महत्त्वाचे आहे. कारण अहंकार ही अशी एक पीडा आहे जिला अंत नाही. भौतिक सुखांच्या पलीकडे पाहायला शिकायला हवं. सुखी, आनंदी, समाधानी आयुष्यासाठी तसंच भौतिक प्रगती आणि आंतरिक प्रगतीसाठी अहंकाराचा त्याग खूप महत्त्वाचा असतो. अमुक गोष्ट मला जमत नाही, किंवा मला समजलेली नाही, हे मान्य करण्यात काहीच गैर नाहीय. विद्यार्थिवस्थेत तर हे मान्य करणं फार महत्त्वपूर्ण आहे. कारण ज्ञानाचा भ्रम हा अज्ञानापेक्षा जास्त भयंकर असतो. कुठलंही काम करताना आपण ते समरस होऊन करायला हवं, **(पान ६ वर)**

कीर्तिरूपांच्या आठवकथा
डॉ. रमा गोळवलकर

# महर्षी भृगु

सनातनी परंपरेच्या कोणत्याही संप्रदायात ईश निंदा म्हणजे ब्लासफेमी नावाचा कोणताही अपराध नाही. वरकरणी बघता हे विधान खूपच निरुपद्रवी आणि साधं वाटेल, पण खोलवर जाऊन चिकित्सा केली तर त्यातलं मर्म उलगडत जातं. मानवी मेंदूच्या आकलन शक्तीतून झालेली बौद्धिक जडणघडण आणि त्यातून घेतलेली विचारांची झेप बघता देवाचं अस्तित्व अमान्य करणार्या विचारधारांमध्ये ज्याचं अस्तित्वच नाही, त्याचा अपमान- अवमान करण्याचा प्रश्नच उरत नाही.

दुसरीकडे सनातनी संस्कृतीमधल्या भगवंताचं अस्तित्व मानणाऱ्या सर्वच शाखा, तो चराचर व्यापून दशांगुळे उरला आहे, असंच मानतात. ते परब्रह्मतत्त्व निर्गुण, निराकार, निष्कल, परात्पर, अविनाशी, परमतत्त्व, एकमेवाद्वितीय आहे. ते इतकं महाप्रचंड, सर्वव्यापी आणि सर्वातीत आहे की ते अपमान, अवमान, अवहेलना, निंदा, उपमर्द, उपहास, तिरस्कार, निरादर वगैरेच्या पलीकडे आहे. शिवाय ते इतकं अंतरंगी वसलेलं, आपलंसं आहे की भगवंत आणि भक्ताच्या नात्यात या सगळ्याचा लवलेशही नसतो. म्हणूनच ईश्वराची निंदा हा अपराधच सूचित नाही. त्यामुळे त्या अपराधाची शिक्षादेखील या सर्व सनातनी विचारधारेत अस्तित्वात नाही. या उलट सनातनी देवांच्या महिमावर्णन करणाऱ्या पौराणिक कथांत एक कथा आवर्जून सांगितली जाते.



ब्रह्मदेव, महादेव, श्रीमन्नारायण या त्रिदेवांपैकी सर्वश्रेष्ठ कोण याची परीक्षा करण्याचं काम महर्षी भृगुंना सोपवण्यात आलं. ब्रह्मलोक आणि कैलासात त्यांच्याकडे दुर्लक्षच करण्यात आलं. ही वागणूक मिळाली नाही. हिरमुसले होत ते वैकुंठलोकात गेले. तिथेही त्यांच्या आगमनाच दखल कोणी घेतली नाही. श्रीमन्नारायण शेषशय्येवर पहुडल्या अवस्थेत योगनिद्रेत लीन होते. महालक्ष्मी त्यांची चरणसेवा करत होती. हे दृश्य बघून महर्षी भृगूंचा राग अनावर झाला. त्याच क्षणी त्यांनी श्रीमन्नारायणाच्या छातीवरच लाथ मारली. तिचा आघात इतका प्रबल होता की, नारायणाच्या वक्षस्थलावर महर्षींच्या पावलाचा ठसा उमटला. तेवढा भाग काळानिळा झाला.

त्या धक्क्यानं योगनिद्रेतून बाहेर आलेल्या श्रीमन्नारायणांनी त्यांचं पाऊल हाती घेत, त्याला हळुवारपणे कुरवाळत ऋषिवर आपल्याला लागलं तर नाही ना म्हणून विचारपूस केली. नारायणांची ही प्रतिक्रिया अतिशय अनपेक्षित आणि आश्वासक होती. भगवंताचा स्थायीभाव असलेलं वात्सल्य आणि त्यांची क्षमाशील वृत्ती यातून स्पष्ट दिसली.

महर्षी भृगुंच्या पावलाचा ठसा आजतागायत महाविष्णू आपल्या छातीवर भक्तवत्सल लांच्छन म्हणजे भक्ताविषयीच्या वात्सल्याची खूण किंवा चिन्ह म्हणून मिरवतात म्हणून त्यांना भक्तवत्सल हे नामाभिधान आहे.

साक्षात भगवंतांची परीक्षा घेण्याचं दायित्व ज्यांच्याकडे सोपवण्यात आलं होतं ते भृगु ऋषी नेमके होते तरी कोण? ब्रह्मदेवांनी या सृष्टिनिर्मितीच्या अगदी सुरुवातीला स्वतःच्या मनातून उत्पन्न केलेल्या मानसपुत्रांपैकी एक.

ऋग्वेदातल्या काही सूक्तांचे द्रष्टे असलेले भृगु कृत्रिमरीत्या अग्नी निर्माण करणारे पहिले मानव होत. दोन सुकी लाकडं किंवा गारगोट्या (चकमकीचा दगड) एकमेकांवर घासून ठिणगी पाडून त्यापासून त्यांनी आग उत्पन्न केली. आग पैदा करता येणं हा मानवी जीवनालाच कलाटणी देणारा शोध होता आणि तो भृगु ऋषींनी लावल्याची नोंद ऋग्वेदात आहे. त्यांनी मातरीश्वन् या देवतेकडून अग्नी प्राप्त केला.

ऋग्वेदकाळात आद्य अग्निपूजक म्हणून भृगु ऋषी ओळखले जात. त्यांनी पाण्यातला अग्नीसुद्धा शोधून काढला. त्याला संस्कृतसह अन्य भारतीय भाषांत वडवानल म्हणतात. इराणी अग्निपूजक लोकांमध्येदेखील महर्षी भृगूंनीच अग्नीचा शोध लावला अशी श्रद्धा आहे.

भृगु ऋषी त्रिकालज्ञानी म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी लिहून ठेवलेली भृगु संहिता! या पृथ्वीतलावर जन्माला आलेल्या आणि येणार्या प्रत्येक जातकाची जन्मकुंडली आणि तिचं ज्योतिषशास्त्रीय विश्लेषण लिहिलेला एक भलामोठा ग्रंथराज जगात अन्यत्र कुठेही नाही. असं एकमेवाद्वितीय शास्त्र म्हणजे ज्योतिष्यशास्त्र. आकाशाचं वाचन करून तिथे दिसणारा या सूर्यमालेतला प्रत्येक ग्रह, तारका समूह म्हणजे राशी आणि नक्षत्र यांचा विचार करून भविष्याचा वेध घेणं म्हणजे ज्योतिष्य. खगोलाचा भूगोलावरच्या जातकावर होणारा परिणामांचा अंदाज कुंडलीतील आकड्यांच्या आधारे वर्तवणं या शास्त्राची सारी जडणघडण भृगु ऋषींनी केली. गेली कित्येक सहस्रकं या भूमीवर या शास्त्राचा बोलबाला आहे. या व्यतिरिक्त भृगु स्मृति हा स्मृतिग्रंथ, भृगु संहिता (ज्योतिष), भृगु संहिता (शिल्प) हे दोन संहिता ग्रंथ, भृगु सूत्र नावाचा सूत्रग्रंथ, भृगु उपनिषद, भृगु गीता हे तत्त्वचिंतनपर ग्रंथ त्यांच्याच नावे आहेत.

प्राचीन भारतीय परंपरेनुसार महर्षी मनूंना मनुस्मृती लिहिण्याच्या कार्यात भृगु ऋषींनी सहाय्य केलं. यांचा आश्रम गुजराथेत नर्मदा नदीच्या किनारी वसलेल्या आजच्या भडोचमध्ये होता. त्याचं प्राचीन नाव भृगुकच्छ. रोमन ग्रीक लोक याला बॅरिगाझा पोर्ट म्हणून ओळखत. काळाच्या ओघात आधी भरूकच्छ आणि नंतर भडोच म्हणून प्रसिद्ध आहे. त्यांनी प्रजापतीच्या ख्याती नावाच्या कन्येशी विवाह केला. भृगु ऋषींच्या कुळात एकाहून एक तेजस्वी आणि तपस्वी पुत्रांचा जन्म झाला.

भृगुंच्या एका पुत्राचं नाव च्यवन आणि दुसऱ्याचं नाव शुक्र. पुढे च्यवन ऋषींनी कायाकल्प करणारं च्यवनप्राश नावाचं आयुर्वेदिक अवलेह (चाटण) सिद्ध केलं; तर शुक्राचार्यांना मृत जिवाला पुन्हा जिवंत करणारी संजीवनी विद्या त्यांच्या आईकडून म्हणजे ख्यातीकडून मिळाली.

याविषयीची एक अतिशय त्रोटक कथा वाचण्यात आली. देव आणि दैत्यांच्या युद्धात भृगुपत्नी ख्याती आपल्या तपोबलानं मिळवलेली संजीवनी विद्या वापरून मेलेल्या दैत्यांना पुन्हा जिवंत करत असे. म्हणून श्रीविष्णूंनी आपल्या सुदर्शन चक्रानं तिचा शिरच्छेद केला. त्यामुळे चिडलेल्या भृगु ऋषींनी त्याला पुन्हा पुन्हा स्त्रीच्या पोटी जन्म घ्यावा लागेल, असा शाप दिला. भगवान विष्णूला विविध अवतार घ्यावे लागतात; त्यामागचं एक कारण हा शापही आहे.

च्यवन ऋषींचा पुत्र ऋचिक. त्याचा पुत्र जमदग्नी आणि त्याचा पुत्र महापराक्रमी चिरंजीवी राम अर्थात परशुराम. हे सगळे भार्गव म्हणवले जातात. समुद्र मंथनातून उत्पन्न झालेल्या लक्ष्मीचं कन्यादान भृगु ऋषींनी केलं, अशी एक किंवदंती आहे. त्यामुळे लक्ष्मीचं एक नाव भार्गवी आहे. एकूण भृगु ऋषी आणि विष्णू यांचा संबंध अन्योन्य आहे. म्हणूनच देवशयनी एकादशीच्या निमित्तानं महर्षी भृगूंची ही आठव कथा.

बोली आणि संस्कृती
प्रा. अजय देशपांडे

# ओवीत गोठले रक्त मुक्या शब्दांचे...

ओवी हा शब्द बोलीतील आहे. महाराष्ट्राच्या ओठांवर ओवी या छंद आणि रचनाप्रकाराचे अधिराज्य आहे. प्राचीन काळापासून ओवी ही मराठीच्या बोली बोलणाऱ्या समूहाची ओळख आहे. ओवीची निर्मिती महाराष्ट्रातील स्त्रियांच्या सृजनशील प्रतिभेने केली. डॉ. रोहिणी तुकदेव यांनी ओवी छंद : रूप आणि आविष्कार या पुस्तकात ओवीच्या रूप आणि आविष्काराविषयी सखोल व तर्कशुद्ध विवेचन केले आहे. ओवीची प्राचीनता कथन करताना त्या लिहितात, ओवी हा मराठी वाययाचा प्रारंभबिंदू आहे. ओवी ही मराठी भाषक समूहाची सर्वात जुनी सांस्कृतिक ओळख आहे. शब्द आणि नाद यांच्या एकमेळाचे मराठी माणसाला जे आकर्षण आहे, त्याचे नेमके गमक व्यक्तविणारे ओवी हे गुणसूत्र आहे.



महाराष्ट्राची लोकभाषा म्हणून केला गेलेला मराठीचा ग्रंथनिविष्ट उल्लेख जितका जुना आहे, तितकाच ओवीचा उल्लेख जुना आहे. लोकप्रतिभेने आणि संतप्रतिभेने ओवीचे सामर्थ्य आणि सौंदर्य नेमके ओळखले होते. परंपरेतील अक्षरगणवृत्ते, मात्रावृत्रे न स्वीकारता प्राचीन महाराष्ट्रातील स्त्री प्रतिभेने ओवी निर्माण केली.

**पहिली माझी ओवी गं, पंढरीच्या विठ्ठला**
**नाम्या जनी चोख्यासाठी धाव धाव धावला ।।१।।**
**दुसरी माझी ओवी गं, माझ्या माहूरच्या रेणुकेला**
**आठवता गं रूप तिचं, उधाण येते भक्तीला ।।२।।**

जात्यावरच्या ओव्यांसह अनेक प्रकारच्या ओव्या गायल्या जातात. सतत मदत करणाऱ्या शेजारणीला लग्न होऊन सासरी आलेल्या नववधू उत्स्फूर्तपणे म्हणते-

**शेजारिणीबाई। माही येणी घालावी**
**मायच्या हातची। आठवण मले यावी।।**

स्त्रीप्रतिभेने सुखदुःखाचे अनेक प्रसंग, भावना, विचार सारे काही ओव्यांमध्ये शब्दबद्ध करून ठेवले आहे. संत ज्ञानेश्वरांच्या प्रतिभेने साडेतीन चरणी ओवीतून ज्ञानेश्वरी हा काव्य आणि तत्त्वज्ञानाचा मौलिक ग्रंथ सिद्ध केला. संत ज्ञानदेवांच्या ओवीचे सामर्थ्य संत नामदेवांनी नेमके कथन केले आहे.

**नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी**
**एक तरी ओवी अनुभवावी।।**

वारकरी स्त्री-पुरुष संतांनी ओवीतून विचार आणि तत्त्वज्ञान सांगितले. जात्यावरची ओवी हा ओवीचा प्रारंभ असावा. ओवी हा स्त्री ओठावरचा आदिम लोकछंद होय. खरे तर शब्दांच्या पलीकडचे सारे काही ओवीच्या चिमूटभर शब्दांत सामावलेले असते. कवी ना. धों. महानोर लिहितात, आईच्या मांडीवर लहानपणापासून जात्याच्या पाळूशी झोपलो, वाढलो. आईसाठी, तिच्या घरघरत्या जात्यासाठी व जगलेल्या दुःखांसाठी- आनंदोत्सवासाठी पाच- सात व लिहिल्या. एक दहा कवितांची दीर्घ अशी मोठ्ठाली कविता लिहिली तरीही आई, जातं, दळण सांगायचं राहूनच गेलेलं आहेसं वाटतं. अशा किती माता- भगिनी भेटल्या की त्यांच्या हजारो ओव्यांनी, लोककवितांनी मला शब्द दिला, लय दिली.

**पीठ गळे जात्यातून तसं पाणी डोळ्यांतून**
**आई करपले हात तुझे भाकरी भाजून.**
**शिळ्या भाकरीनं उभा माझ्या संसाराचा जीव**
**तुझ्या ओवीच्या शब्दानं मला केलं चिरंजीव.**

आईच्या ओवीचा महानोरांच्या कवितेवर संस्कार आहे. ओवी शब्दातच स्त्रीदुःखाची शब्दात न सांगता येणारी वेदना दडली आहे. जे दुःख कधीच कुठेच व्यक्त करता येत नाही, जे दुःख शब्दांत मावत नाही आणि शब्दांच्या पलीकडचे आहे, ते दुःख स्त्री जात्यापाशी ओवीतून सांगत असते. महानोरांची ११ शब्दांची भावस्पर्शी कविता आहे.

**सरलं दळण ओवी अडली जात्यात, उभ्या जन्माचा उमाळा कळ सोसून डोळ्यांत..**

या इवल्याशा कवितेत ओवी आणि स्त्रीदुःखाचा नाळसंबंध साकळला आहे. कवितेची पहिली ओळ दोनच शब्दांची आहे, पण प्रारंभी ओढलेली एक रेष विलक्षण सूचक आहे. सरलं दळण दळण दळण्याची प्रक्रिया बराच वेळ सुरू आहे आणि ओवीही सुरूच आहे.

ओव्या म्हटल्या जा आहेत, दळणही दळले जात आहे. दळताना म्हटल्या जाणाऱ्या ओव्या तिच्या व्यक्त- अव्यक्त मनातल्या साऱ्या दुःखाचा निचरा करीत आहेत. हे सारे सुरू असताना सरलं दळण ही घटना घडली. पुढे काय? दळण दळण्याची, ओव्या गाण्याची आणि मनातल्या व्यक्त- अव्यक्त भावनांचा निचरा होण्याची प्रक्रिया सरलं दळण या दोन शब्दांपूर्वीच्या इवल्याशा रेषेतून उत्कटपणे व्यक्त झाली आहे. सरलं दळणं पुढे काय?

**सरलं दळण ओवी अडली जात्यात..**

दळण सरल्याबरोबर जातं थांबलं अन् ओठावरची ओवी जात्यात नव्हे, मनातच अडली. दळण सरल्याने जातं चालवता येत नाही आणि जातं चालवता येत नाही म्हणून ओवी म्हणता येत नाही. म्हणजे मन आपल्या मनापाशीच मोकळं करता येत नाही. आवंढा गिळावा तशी ओवी गिळावी लागली म्हणून ओवी अडली जात्यात. ओवीचे शब्द, स्त्रीचा स्वर आणि जात्याचा नाद या तीन बाबींशी स्त्रीचे व्यक्त- अव्यक्त दुःखही बांधले गेले आहे. जात्याचा नाद थांबल्याने शब्द आणि स्वर दोन्हीही अडले आहेत; परिणामी मनातल्या दुःखांचा मनाशीच होणारा संवाद गळ्याशी अडला आहे. या शब्द आणि स्वरांच्या पलीकडच्या दुःखाच्या पृष्ठभूमीवर पुढील ओळी येतात-

**उभ्या जन्माचा उमाळा कळ सोसून डोळ्यांत..**

ओठावर येणारे दुःखाचे उमाळे गळ्याशीच दाटल्याने डोळे ओले झाले. जन्मभर सोसलेले दुःख जात्याच्या नादात, स्वराने ओठातील शब्दांतून पाझरत होते, मन मोकळे होत होते. मनातल्या दुःखाचे अनिवार कढ स्वरबद्ध होऊन बाहेर येत होते... दळण सरल्याने हे सारे क्षणात बंद झाले, गळ्यातले कढ गळ्यातच थांबले आणि उभ्या जन्माचा अव्यक्त उमाळा कळ सोसून डोळ्यात दाटून आला. (पान ६ वर)

उगवतीचे रंग
वि. ९४०३७४९९३२
विश्वास देशपांडे

**अतिशय अर्थपूर्ण असं हे गाणं. आपल्या आयुष्याला तंतोतंत लागू पडणारं. क्षणभर त्यातील सुखदुःखाचा विषय आपण बाजूला ठेवू, पण आपलं आयुष्य हे एक सुंदर असं जरतारी वस्त्र आहे. जेव्हा आपण नात्यांचा विचार करतो, तेव्हा हे एका 'महावस्त्राचं' रूप घेतं.**




आपण ज्या घरात जन्म घेतो, त्या घरापासून आणि जन्मापासून काही नाती आपल्याला उपजतच मिळतात. आई, वडील, बहीण, भाऊ यासारखी अनेक नाती रक्ताची असतात. पण आपण समाजात जसजसे मोठे होत जातो, तशी आणखीही अनेक नाती आपल्याशी जोडली जातात. मग ती नाती बऱ्याच वेळा रक्तापलीकडची असतात. अशी बिनरक्ताची नाती कित्येकदा रक्ताच्या नात्यापेक्षाही घट्ट असतात. अशी सगळी नाती मिळून तयार होतं ते भरजरी महावस्त्र! यातील मधले एकमेकात गुंफलेले घट्ट धागे असतात रक्ताच्या नात्यांचे; बाजूची रुपेरी किनार असते समाज नावाच्या नात्याची; आणि पदरावर जी मोरपंखी नक्षी असते ना, ती असते जिवलग मित्रांची! त्यांच्यामुळेच ही भरजरी पैठणी शोभून दिसते. वस्त्राला 'पट' असाही एक सुंदर शब्द आहे. आपल्या आयुष्याचा पट अशा अनेक रंगीबेरंगी धाग्यांनी विणला गेलेला असतो.

पण... पण... असा भरजरी पट प्रत्येकाच्याच नशिबी येतो का? कदाचित नाही. कुणाच्या वाट्याला महावस्त्र येतं, तर कुणाच्या वाट्याला जाडंभरडं वस्त्र. कुठे या महावस्त्राचे इंद्रधनुषी रंग शोभून दिसतात, तर कुठे ते फिकट झालेले असतात. पण जे वस्त्र आणि जसं वस्त्र तुमच्या वाट्याला आलं असेल, ते तुम्हाला स्वीकारावंच लागतं. काही जण आपल्या कर्तृत्वाने या वस्त्रात इतके सुंदर रंग भरतात की साध्या वस्त्राचंही महावस्त्र होतं; आणि दुर्दैवाने एखादी व्यक्ती आपल्याला मिळालेलं भरजरी वस्त्रही मातीमोल करते.

महाभारतातल्या कर्णाचं उदाहरण आपल्याला सगळ्यांना माहिती आहे. खरं तर तो ज्येष्ठ कुंतीपुत्र आणि अत्यंत तेजस्वी असा सूर्यपुत्र. राज्यावर पहिला हक्क त्याचा. पण जन्म होतो आणि त्याचा त्याग त्याच्या आईलाच करावा लागतो. तरीही, आपल्या पराक्रमाने आणि कर्तृत्वाने आपल्याला मिळालेल्या या जाड्याभरड्या वस्त्राचं रूपांतर तो महावस्त्रात करतो. तो अभिमानाने सांगतो:

**सूतो वा सूतपुत्रो वा यो वा को वा भवाम्यहम्।**
**दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम्।।**

(मी विणकर वा विणकर पुत्र जे काही असेल ते दैवामुळे आहे. कोणत्या कुळात जन्म घ्यायचा हे माझ्या हातात नाही, पण माझ्या कर्तृत्वाने आणि पराक्रमाने मोठे व्हायचे की नाही ही गोष्ट नक्कीच माझ्या हातात आहे.)

याउलट रावणाचं उदाहरण जर आपण पाहिलं तर असं दिसतं की रावण ऐश्वर्यसंपन्न होता, शक्तिमान होता, विद्वान होता, शंकराचा परमभक्त होता, लंकेसारख्या सुवर्णनगरीचा राजा झाला होता. एका अर्थाने त्याच्या पदरात पडलेले हे महावस्त्रच होते. पण आपल्या नैतिक अध:पतनाने आणि अहंकारामुळे त्याने या वस्त्राचे पार पोतेरे केले.

माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे असं आपण म्हणतो, पण माणसाला 'माणूस' म्हणून जगण्याचं बळ देणारी खरी शक्ती नात्यांमध्ये असते. जन्माला आल्यापासून ते आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत आपण अनेक नात्यांच्या धाग्यांनी वेढलेले असतो. काही नाती रक्ताची असतात, तर काही नाती प्रेमाची, विश्वासाची आणि कर्तव्याची असतात. ही नात्यांची वीण जेवढी घट्ट, तेवढं कुटुंब निकोप; आणि कुटुंब जेवढं निकोप, तेवढा समाज आणि देश सुदृढ. नाती ही केवळ आपणा सर्वांना एकमेकांशी जोडणारी साखळी नसून, ती संपूर्ण समाजाला अंतर्गत ऊर्जा देणारी एक जिवंत व्यवस्था आहे. म्हणूनच, मिळालेली नाती जपायला हवीत, वाढवायला हवीत.

नात्यांमध्ये एक अद्भुत सामर्थ्य असतं. ती जशी कुटुंब आणि समाजाला एकत्र बांधून ठेवतात, जोडतात; तशीच जर ती कमकुवत झाली, तर संपूर्ण व्यवस्था तोडण्याची विनाशकारी ताकदही त्यांच्यात असते. एका सुताचा धागा कमकुवत झाला की अख्खं वस्त्र विस्कळीत व्हावं, तसंच एखाद्या नात्यात वितुष्ट आलं की संपूर्ण कुटुंब कोलमडून पडतं. म्हणूनच, निकोप नात्यांमधून निकोप कुटुंब आणि निकोप कुटुंबांमधून एका निकोप, बलशाली राष्ट्राची निर्मिती होत असते. देश जोडायचा असेल, तर आधी घराघरातील नात्यांचा सांधा भक्कम असावा लागतो.

आपल्या भारतीय संस्कृतीचे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे आपल्या ऐतिहासिक, सामाजिक आणि अध्यात्मिक परंपरांचा या नात्यांवर असलेला गहिरा प्रभाव. आपल्याकडे नात्यांकडे केवळ एक 'करार' म्हणून पाहिले गेले नाही, तर ती एक साधना मानली गेली आहे. आपल्या परंपरा जेवढ्या उज्वल, तेवढाच आपल्या नात्यांचा दर्जाही उच्च आणि उदात्त राहिला आहे. याचा सर्वात मोठा आणि आदर्श वस्तुपाठ आपल्याला 'रामायण' काळात पाहायला मिळतो. रामायणाने मानवी नात्यांचे जे आदर्श निर्माण केले, ते आजही मानवी संस्कृतीचे दीपस्तंभ आहेत.

पित्याचे वचन पाळणारा पुत्र, पुत्रासाठी प्राण त्यागणारा पिता; वशिष्ठांसारखे ऋषितुल्य गुरु आणि त्यांच्या चरणी लीन होणारा शिष्य; राम-लक्ष्मण-भरत यांच्यातील नि:स्वार्थ बंधुप्रेम; सुग्रीव आणि बिभीषणासारखे मित्र; हनुमंतासारखा परमभक्त आणि सेवक; आणि सुख-दुःखात सावलीसारखी पाठीशी राहणारी पत्नी... रामायणातील प्रत्येक नातं कर्तव्याच्या आणि त्यागाच्या एका अत्युच्च पातळीवर विणलं गेलं होतं. तिथे स्वार्थाला जागा नव्हती, म्हणूनच तो रामराज्य नावाचा एक सुवर्णकाळ ठरला. परंतु, काळाचे चक्र फिरले आणि 'महाभारत' काळात ही परंपरा काहीशी खंडित झाली, नव्हे ती कलंकित झाली. महाभारताचा पट हा मानवी नात्यांच्या विस्कळीतपणाचा आणि मर्यादांचा पट आहे. तिथे सत्तेचा लोभ, अहंकार आणि महत्त्वाकांक्षा एवढीणी टोकाला गेली की, रक्ताची नाती एकमेकांच्या रक्ताची तहानलेली झाली.

गुरु- शिष्याचे नाते, बंधुत्वाचे नाते, ज्येष्ठ-श्रेष्ठांचे मान-सन्मान सत्तेच्या सारीपाटावर पणाला लावले गेले. जेव्हा नात्यांमध्ये कर्तव्याऐवजी स्वार्थ आणि प्रेमाऐवजी मत्सर जागा होतो, तेव्हा महाभारतासारखा विनाश अटळ असतो, हाच धडा आपल्याला इतिहासाने दिला.

आज आपण एकविसाव्या शतकाच्या उत्तरार्धात, म्हणजे वर्तमान परिस्थितीत जगत आहोत. आजची कुटुंब व्यवस्था एका अत्यंत संवेदनशील वळणावर उभी आहे. काळाने आणि आधुनिकतेने आपल्या समोर अनेक नवी आव्हाने उभी केली आहेत. तंत्रज्ञानाच्या जाळ्याने आपल्याला जगभरातल्या लोकांशी जोडले असले, तरी शेजारी बसलेल्या आपल्या माणसापासून आपण दुरावत चाललो आहोत की काय, अशी भीती वाटू लागली आहे. एकत्र कुटुंब पद्धती मागे पडून विभक्त कुटुंबे आली आणि आता तर 'फ्लॅट संस्कृती'मध्ये माणसे अधिक आत्मकेंद्रित होऊ लागली आहेत.

नात्यांची वीण उसवू लागली आहे. नात्यांच्या या महावस्त्राचं रूपांतर एखाद्या टॉवेलमध्ये होतं की काय, अशी भीती वाटू लागली आहे. टॉवेलला आपण गरजेपुर्ते हात पुसतो आणि बाजूला ठेवतो. नाती अशी असतात का?

आजच्या या गतिमान, यांत्रिक युगात संवाद हरवत चालला आहे आणि जिथे संवाद संपतो, तिथे नात्यांची वीण सैल होऊ लागते. संवाद नसलेली नाती म्हणजे केवळ नावापुरती उरलेली नात्यांची एक चौकट. आजच्या तरुण पिढीसमोर आणि आपल्या सर्वांसमोरच हे मोठे आव्हान आहे की, या बदलत्या काळात नात्यांमधील पूर्वीचा तो ओलावा, तो जिव्हाळा आणि ती विश्वासाची ऊब कशी टिकवून ठेवायची? एक गोष्ट मात्र नक्की की स्नेहजलाचं सिंचन झालं की नाती उमलून येतात. स्नेह जाऊन त्याची जागा स्वार्थाने घेतली की नाती कोमेजतात. म्हणूनच जिथे अकृत्रिम प्रेम असते आणि केवळ स्वार्थाला थारा नसतो तिथले नात्यांचे रंग कधीही फिके होत नाहीत. याच सगळ्या गदारोळात, मनात एका नव्या सृजनाचा अंकुर फुटला. मनात आले.

काळाच्या प्रवाहात आपण जे मागे सोडत चाललो आहोत, याची पुनश्च एकदा जाणीव करून द्यायला हवी. वस्त्रातील उभे-आडवे धागे जसे प्रेमाने एकत्र येतात आणि एकमेकांना घट्ट पकडून ठेवतात, तसाच हा दिशाहीन होत चाललेला समाज पुन्हा एकदा नात्यांच्या सूत्रात गुंफायला हवा. या विचारातूनच 'नात्यांचं महावस्त्र' या लेखमालेचा जन्म होतोय.

महावस्त्र हे वेगवेगळ्या रंगांच्या, रेशमी मुलायम पण बळकट अशा धाग्यांच्या एकत्र विणण्यातून तयार होतं. या लेखमालेच्या माध्यमातून आपण आपल्या आयुष्यातील अशाच काही अमूल्य, रेशमी नात्यांचे पदर उलगडणार आहोत.

आईचे नि:स्वार्थ वात्सल्य, बाबांचे आकाशाएवढे छत्र, आजी-आजोबांच्या संस्कारांची शिदोरी, भाऊ-बहिणीचे निखळ प्रेम, मावशी आणि काकांचा मायेचा आधार, सुख-दुःखात पाठीशी राहणारा मित्र आणि आपल्याला अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारा गुरु...या सर्व नात्यांच्या अंतरंगात डोकावण्याचा प्रयत्न आपण करणार आहोत. या महावस्त्राचा एक-एक धागा आपण अत्यंत मायेने आणि जिव्हाळ्याने जाणून घेण्याचा प्रयत्न करू या. हे महावस्त्र जितकं सुंदर विणलं जाईल, तेवढं आपलं घर, आपला समाज आणि आपले जगणं अधिक सुकर आणि आनंदी होईल. या वैचारिक आणि भावनिक प्रवासात आपण माझ्या सोबत नक्कीच असाल, ही खात्री आहे. **(क्रमशः)**

# ग्रहसंकेत

**(रविवार, २६ जुलै ते शनिवार, १ ऑगस्ट २०२६)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर, ज्येष्ठ पत्रकार
'शिवकृपा' फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो. कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र.९४२३७५८४०१)

✻ **रविवार,** २६ जुलै- प्रदोष, वामन पूजन, शाक गोपद्मव्रतारंभ, जंगली महाराज उत्सव प्रारंभ, श्री विष्णू शयनोत्सव, कारगिल विजय दिन ✻ **सोमवार, २७ जुलै-** महाराष्ट्रीय बेंदूर, जया-पार्वती व्रतारंभ, संत मामा दांडेकर पुण्यतिथी पुणे, माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम स्मृतिदिन ✻ **मंगळवार, २८ जुलै-** साईबाबा उत्सव प्रारंभ शिर्डी, जागतिक निसर्ग संवर्धन दिन ✻ **बुधवार, २९ जुलै-** गुरुपौर्णिमा रा.८.०४ पर्यंत, कुलधर्म, व्यासपूजा, शिर्डी व शेगांव येथे गुरुपौर्णिमा उत्सव, श्री विठ्ठल नवरात्र समाप्ती, जागतिक व्याघ्र दिन, संन्यासिनां चातुर्मास्यरंभा, व्रतनी पौर्णिमा समाप्त ✻ **गुरुवार, ३० जुलै-** इष्टी, वीर बाजीप्रभू देशपांडे पुण्यतिथी, महाद्वारकाला पंढरपूर, कतकी जयंती ✻ **शुक्रवार, ३१ जुलै-** छ. राजाराम महाराज जयंती करवीर, नाना शंकरशेट पुण्यतिथी, अशून्यशयन व्रत ✻ **शनिवार, १ ऑगस्ट-** लोकमान्य टिळक पुण्यदिन, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती.

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** २६, २९, ३० जुलै, १ ऑगस्ट (१९ पर्यंत) ✻ **डोहाळ जेवण-** २६, २९ (१६ नंतर), ३० जुलै (१८ पर्यंत) ✻ **बारसे-** ३१ जुलै, १ ऑगस्ट (११ पर्यंत) ✻ **जावळ-** ३०, ३१ जुलै ✻ **गृहप्रवेश-** २६ (८ नंतर), २९, ३०, ३१ जुलै, १ ऑगस्ट

### मेष :- आर्थिक समस्यातून मार्ग निघेल

देवावर विश्वास ठेवला की, कठीण प्रसंग ही सोपे वाटू लागतात. पुढील सप्ताहात धनस्थ मंगळ तृत्तीयात येत आहे. त्यामुळे आर्थिक समस्यातून मार्ग निघेल. या सप्ताहात वादाचे प्रसंग कसोशीने टाळावेत. आर्थिक गुंतवणूक विचाराने करावी. नव्या कामात अधिक लक्ष घालावे. कलागुणांना चांगल्या संधी लाभतील. शुभ ता. २९, ३१

### वृषभः- मतभेद टाळावेत

मनापासून बोललेले शब्द साधे असले तरी पुरेसे असतात. राशीतील मंगळ पुढे धनस्थानी येणार आहे. वाहनाच्या देखभालीकडे लक्ष द्यावे लागेल. सप्ताहात मतभेदाचे प्रसंग टाळावेत. उष्णतेपासून त्रास संभवतो. डोकेदुखीवर उपाय करावेत. संततीबाबत शुभ घटना घडतील. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. जीवनसाथीदाराशी मतभेद टाळावेत. शुभ ता. २६, ३१

### मिथुनः- अडचणीतून मार्ग निघेल

आपुलकीला मोठ्या शब्दांची गरज नसते. बारावा मंगळ पुढे राशीत येणार आहे. त्यामुळे घाईने निर्णय घेऊ नका. आर्थिक समस्यातून मार्ग निघेल. प्रशासन, बँक, विमा क्षेत्र अनुकूल आहे. अपेक्षित घटना घडतील. नव्या संधीचे स्वागत करावे. या सप्तहात अनावश्यक खर्च टाळावेत. स्वमतागृह टाळावा. अडचणीतून मार्ग निघत जाईल. शुभ ता. २६, ३१

### कर्कः- प्रकृतीकडे दुर्लक्ष नको

शब्दांपेक्षा जास्त मन बोलत असतं. बारावा मंगळ होणार आहे. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. वाहनांपासून जपून असावे. आत्मविश्वास वाढविणाऱ्या घटना घडतील. चिकाटीने रहावे. प्रगती होत जाईल. कलेत प्रगती होईल. कौटुंबिक जीवनात शुभ घटना घडतील. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. ३०, ३१

### सिंहः- समस्यातून मार्ग निघेल

संपत्ती कमी मिळाले तरी चालेल पण मैत्री चांगलीच मिळावी. धनस्थानी शुक्र येत आहे. त्यामुळे आर्थिक समस्यातून मार्ग निघेल. लाभस्थ पदाच्या जोडीला मंगळ येत आहे. त्यामुळे वैद्यकीय, माहिती तंत्रज्ञान अशा क्षेत्रात अनुकूलता वाढेल. धार्मिक, सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. अडचणी सुटतील. शुभ ता. २९, ३१

### कन्याः- उत्साह, धडाडी वाढेल.

मनाला आवडलेली, मनाला लागलेली गोष्ट माणूस कधीच विसरत नाही. कर्मस्थ बुधावर मंगळही येत आहे. त्यामुळे कार्यक्षेत्रात उत्साह, धडाडी वाढेल. संततीबाबत शुभ घटना घडतील. सौख्यात वाढ होईल. नव्या विचारांना चालना मिळेल. अडचणींची चिंता नको. मार्ग निघत जाईल. नव्या संधी लाभतील. शुभ ता. ३०, ३१

### तुलाः- मनासारख्या घटना

टोमण्यांच्या भट्टीत भाजलेला माणूस सोनं बनतो. आठवा मंगळ पुढे नववा होणार आहे. त्यामुळे समस्या कमी होत जातील. कर्मस्थ रवि- गुरुमुळे कार्यक्षेत्रात मनासारख्या घटना घडतील. स्पर्धांमध्ये यश मिळेल. तिखट, तामसी पदार्थ जास्त खाऊ नका. त्रास संभवतो. कलागुणांचा विकास होईल. शुभ ता. २६, ३०

### वृश्चिकः- दगदग करू नका

घर मोठ असण्यापेक्षा, मन मोठे असणं महत्त्वाचे असते. सातवा मंगळ, हर्षल प्रतिकूल आहे. त्यामुळे स्वःमताग्रह टाळावा. वादाचे प्रसंग टाळावेत. फार दगदग करू नका. शारीरिक तक्रारींची तक्रार घ्यावी. आर्थिक स्थिती समाधानकारक राहील. वस्त्र प्रावरणे, खाद्यपदार्थ अशा क्षेत्रात अनुकूलता राहील. शुभ ता. ३०, ३१

### धनुः- विचाराने रहावे

काही दगड बाजूला सारून पुढे चालणेच शहाणपणाचे असते. राशीसमोर मंगळ येणार आहे. त्यामुळे सर्व बाबतीत सामंजस्याने रहावे. प्रतिकूल घटना संभवतात. विचाराने रहावे. जुने येणे वसूल करून घ्यावे. स्थावर बाबतीत विलंबाने मनासारख्या घटना घडतील. कलेत प्रगती होईल. उष्णतेपासून त्रास होईल. शुभ ता. २९, ३१

### मकरः- समस्यातून मार्ग निघेल

ज्यांना तुमची किंमत कळत नाही, त्यांना स्पष्टीकरण देण्यात वेळ घालवू नका. षष्टात मंगळ दोन ऑगस्टला येणार आहे. त्यामुळे आर्थिक समस्यातून मार्ग निघेल. अंगीकृत कार्यात समाधानकारक प्रगती होईल. नव्या विचारांना चालना मिळेल. संततीशी मतभेदाचे प्रसंग टाळावेत. शुभ ता. २९, ३१

### कुंभः- विचाराने रहावे

वेळ सर्वांना मिळतो, जीवन बदलण्यासाठी. धनस्थानी सुखस्थ मंगळामुळे झालेली कोंडी आता दूर होत जाईल. या सप्तहात सर्व बाबतीत विचाराने रहावे. गृहनिर्माण, विधी अशा क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. शिक्षणातून चांगली प्रगती होईल. दगदग, मतभेदाचे प्रसंग टाळावेत. विद्युत उपकरणांपासून जपून असावे. शुभ ता. २९, ३१

### मीनः- चिंता करू नका

काळ, वेळ, क्षण जगता आले तर जीवन बहारदार बनतं. राशीत शनि तर चौथा होणारा मंगळ यामुळे काही प्रमाणात समस्या वाढल्या तरी चिंता करू नका. रवि- गुरुमुळे सर्व समस्यातून मार्ग निघत जाईल. दगदग टाळावी. भावंडांशी मतभेदाचे प्रसंग टाळावेत. स्थावर, वाहन विषयक प्रश्न विचाराने सोडवावेत. समस्या संभवतात. शुभ ता. २९, ३१

!! शुभ भवतु !!

तत्त्वदर्शन डॉ. राजेंद्र डोळके

# निष्काम कर्मयोग



कर्मयोग या शब्दाचा व्युत्पत्यर्थ कुशलतापूर्वक केलेले योग्य कर्म असा होतो. कोणतेही युक्त कर्म करण्याचा मार्ग किंवा पद्धती म्हणजे कर्मयोग, असा त्याचा भावार्थ आहे. फळाची आसक्ती सोडून आणि लाभ- अलाभ, सुख-दुःख, राग-द्वेष, सिद्धी - असिद्धी, जय-पराजय इत्यादी द्वंद्वांचा अभिनवेश न धरता निष्काम बुद्धीने व निरहंकारी बनून शास्त्रविहित कर्मे करीत राहावे, हाच गीतेचा संदेश आहे व हाच कर्मयोग आहे. गीतेचा हा संदेश अथवा कर्मयोग या श्लोकात सांगितला आहे तो प्रसिद्ध श्लोक असा-

**कर्मण्येवाधिकारस्ते मा**
**फलेषु कदाचन।**
**मा कर्मफलहेतुर्भूर्मा**
**ते संगोऽस्तवकर्मणी।।** (२-४७)

याचा अर्थ असा माणसा, तुला कर्माविषयीच अधिकार आहे. फलाच्या ठिकाणी कधीही नाही. कर्माचा व फलाचा उद्देशही तुझ्यात असता कामा नये. इतके असूनही कर्म न करण्याची आसक्तीही तुला नको. तात्पर्य, फळाची, कर्माची व अकर्माची आसक्ती न ठेवता कर्माचा अधिकार अमलात आणणे, हेच कर्मयोगाचे मोक्षदृष्ट्या सार आहे. मनुष्याला कर्म तर सुटलेच नाही. कर्म सुटणे किंवा सोडणे अशक्य आहे, असा श्रीकृष्णाचा सिद्धांत आहे आणि ते प्रत्येकासच पटते. परंतु त्याने फलाशा ठेवू नये असे का म्हणावे, हा प्रश्न पडतो. आणखी श्रीकृष्ण गीतेच्या सुरुवातीसच असेही म्हणतात,

**सिद्ध्यासिद्धयोः समोभूत्वा समत्वं योग उच्चते** (२-४८).

म्हणजे मी माझे कर्तव्य करतो, पण ते सिद्धीस जावो अथवा न जावो अशा भावनेने ते करावे. एकूण सिद्धी व असिद्धी सारखी मानून आणि फळावर नजर न ठेवता मनुष्याने आपले कर्म करावे, असा श्रीकृष्णाचा उपदेश आहे. आणि येथूनच कर्मयोगाच्या तत्त्वज्ञानाची सुरुवात होते. मनुष्याची सर्व धडपड ही सुखासाठी असते आणि त्यासाठीच तो कर्मे करीत असतो. काहीतरी कामना, इच्छा, आशा यांनी प्रेरित झाल्याशिवाय मनुष्य कर्म करीत नाही. अमके कर्म केल्याने मला काय मिळेल या विचाराने प्रवृत्त होऊनच तो कर्मे करीत असतो. अशा परिस्थितीत फलवासना सोडून कर्म करणे हा उलटा पंथ झाला. कर्मात फलाचा हेतू जर नसेल तर कर्म करण्याची प्रवृत्ती होणार नाही, हे उघड आहे. या सर्व प्रश्नांची उत्तरे गीतेतच अतिशय सुंदर पद्धतीने देण्यात आली आहे. यालाच निष्काम कर्मयोग म्हणतात. कर्म आनंदमय होऊन जेव्हा मअकर्मफ होते तेच मनिष्काममम कर्म. निष्काम कर्म या शब्दप्रयोगात कर्म या पदापेक्षा निष्काम या पदालाच अधिक महत्त्व आहे. कारण स्वधर्माचरणाचेही कर्म करीत असता मनाचे विकर्म जर तेथे नसेल तर तो केवळ एक उपचार ठरतो. या निष्काम बुद्धीलाच अनासक्ती असे म्हटले आहे. ज्ञानाने आसक्तीचा नाश करून कर्मे करीत राहणे म्हणजेच अनासक्ती. कर्माचे फळ मिळणे हे मनुष्याच्या स्वाधीन नसल्यामुळे त्या फळाबद्दल त्याने आसक्त असू नये. कर्म जर निष्काम बुद्धीने केले नसेल तर कर्म जितके चांगल्या प्रकारचे व्हावयास पाहिजे तितके होत नाही. कारण सकाम पुरुष फलासक्त असल्यामुळे फळाविषयींच्या स्वप्नचिंतनात त्याचा थोडा बहुत कालक्षय आणि शक्तिक्षय होणारच. परंतु फलेच्छारहित पुरुषाचा प्रत्येक क्षण आणि सर्व शक्ती कर्मातच उपयोजिली जाणार. नदीला सुटी नाही, वाऱ्याला विसावा नाही, सूर्याला ज्याप्रमाणे तळपणेच माहीत त्याप्रमाणे निष्काम कर्त्याला सतत सेवाकर्मच माहीत. अशा निरंतर कर्मरत असणार्या पुरुषाचे कर्म उत्कृष्ट होणार नाही तर कोणाचे होणार? कुठल्याही कर्म कौशल्याबरोबर चित्ताच्या समत्वाची जोड असली तर काम अधिक सुंदर होणार ही गोष्ट उघड आहे. सकाम पुरुष कर्माकडे स्वार्थी दृष्टीने पाहत असतो. त्यामुळे त्याच्या कर्मात दोष राहण्याची शक्यता असते.

निष्काम पुरुषाची स्वकर्माविषयी नैतिक कर्तव्य- बुद्धी असल्यामुळे त्यात यत्किंचितही उणीव राहू नये, याविषयी तो तीव्रतेने जपत असतो. अशारीतीने निष्काम कर्मयोगात अद्भुत सामर्थ्य असते. निष्काम कर्मयोगी हा साधारणतः शास्त्र विहित कर्मे करीत असतो. कारण तुम्ही कर्म कोणतेही करा, तुम्हाला त्याचे फळ हे मिळणारच. चांगल्या कर्माचे चांगले फळ मिळणार आणि वाईट कर्माचे वाईट. माणूस चोरी करतो अथवा ला घेतो तेव्हा त्या कर्माचे स्वाभाविक फळ तुरुंगवास व अन्य शिक्षा हे ठरलेलेच असते. म्हणून धर्माच्या मर्यादेत राहून प्रीती- द्वेषरहित भावनेने, ज्यात कर्तेपणाचा लेशमात्रही अभिमान नसतो आणि जे समष्टीच्या म्हणजे जगाच्या कल्याणासाठी केलेले असते, असेच कर्म करावे म्हणजे त्याचे फळही चांगले मिळते.

गीतेतील मा फलेषु कदाचन आणि मा कर्म फल हेतुर्भूः या दोन चरणांचा अर्थ नीटपणे समजून घेणे आवश्यक आहे. आपण जेव्हा कोणतेही कर्म करतो, तेव्हा त्याचा अमुकच परिणाम व्हावा असा हेतू मनात धरूनच ते कर्म करतो. आपल्या इच्छेप्रमाणे त्या कर्माचा परिणाम झाला तर आपण ते कर्म मसफळफ झाले असे म्हणतो आणि आपल्या इच्छेप्रमाणे जेव्हा परिणाम येत नाही तेव्हा आपण ते कर्म निष्फळ झाले असे म्हणतो. येथेच आपण चूक करतो. कोणतेही कर्म निष्फळ राहतच नाही. परंतु फळ जर तुमच्या धारणेप्रमाणे अथवा अपेक्षेप्रमाणे आले नाही तर त्या कर्मात अगर कर्म करण्याच्या पद्धतीत काहीतरी दोष आहे, असे समजा. म्हणजेच तुमच्या कर्मात निष्कामता नाही असे समजा. कर्माच्या पूर्वी, कर्म करतेवेळी आणि कर्म झाल्यावरही जर तुमच्या मनात फळाचाच विचार असेल तर कर्म जितक्या चांगल्या प्रकारे व्हावे तितके होत नाही. परिणामतः कर्माच्या गुणवत्तेवर परिणाम होऊन फळाच्या गुणवत्तेवरही तो होतो. गीतेत फळाच्या आशेच्या त्यागाचा उपदेश आहे. याचा अर्थ असा नाही की कर्माचे फळ सोडून द्यावे. पण मला या कर्माचे अमुकच फळ मिळाले पाहिजे, ते नाही मिळाले तर मी घेणारच नाही, अशी भावना नसावी. मा फलेषु कदाचन या चरणातून मला कर्माचे फळ मिळेल की नाही हा संभ्रमच लोकांच्या मनात घट्ट झाला आहे. परंतु गीतेतील अर्थ तसा नसून तुम्ही कर्म करा; तुम्हाला फळ निश्चित मिळेल असा आहे.

कर्म करणे हे तर मनुष्याला लागलेच. जीवन आहे तोपर्यंत कर्माचा त्याग करणे शक्यही नाही. कारण जीवन हे सुद्धा कर्मच असल्यामुळे कर्माचा त्याग तो जीवनाचा त्याग ठरतो. पण मनुष्य प्रत्येक कर्माच्या ठिकाणी ठेवत असलेल्या फलेच्छेमुळेच सर्व गडबड होते. ही कर्मफलेच्छाच सर्व सुखदुःखांना कारणीभूत ठरते. म्हणून कर्मात अकर्म पाहणे हेच खरे कर्म ठरते. अकर्मात बाह्य इंद्रिये कामे करीत असतात, परंतु अंतर्मनात कर्मफळाची वासना, आसक्ती, प्रीती, द्वेष काहीही नसते. हीच खरी निष्कामता.

या दृष्टीने विचार केला तर खरा निष्काम कर्मयोगी स्वतः श्रीकृष्ण आहे. त्याने महाभारत युद्ध केले ते स्वतः काही मिळविण्यासाठी नाही. पांडवांना जिंकून देण्याकरिता ते केले. तो स्वतः मरणारही नव्हता आणि जिंकल्यानंतर त्याला काही संपत्तीही मिळणार नव्हती. कारण त्याला मिळविण्यासारखे असे काहीही राहिले नव्हते. केवळ धर्मरक्षणार्थ स्वार्थनिरपेक्ष वृत्तीने तो लढला आणि युद्ध संपल्यानंतर रिक्त हस्ताने तो द्वारकेला परतला. गीतेतील निष्काम कर्मयोग त्याने केवळ सांगितला नाही तर तो जगला.

पान २ वरून

## संविधान आणि बालहक्क आदर्श...

अर्थात, गेल्या काही दशकांत अनेक सकारात्मक बदलही घडले आहेत. प्राथमिक शिक्षणाचा विस्तार झाला आहे. लसीकरणाचं प्रमाण वाढलं आहे. बालमृत्यू दरात घट झाली आहे. बालविवाह आणि बालमजुरी विरोधात कायदेशीर आणि सामाजिक जागरूकता वाढली आहे. राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग, राज्य आयोग, न्यायव्यवस्था, स्वयंसेवी संस्था आणि विविध सामाजिक चळवळींनी महत्त्वपूर्ण काम केलं आहे. परंतु या यशामुळे वास्तवातील उणिवांकडे दुर्लक्ष करता येणार नाही..

खरं तर बालहक्क हे केवळ दयेचे किंवा कल्याणाचे विषय नाहीत; ते मूलभूत मानवी हक्क आहेत. मुलांना शिक्षण देणं ही कृपा नाही, तर घटनात्मक जबाबदारी आहे. त्यांना हिंसेपासून वाचवणं हा उपकार नाही, तर त्यांचा अधिकार आहे. त्यांना पोषण, आरोग्य आणि सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणं हे समाजाच्या संवेदनशीलतेचं मोजमाप आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेत म्हटलं होतं की, एखाद्या संविधानाचं यश हे त्याची अंमलबजावणी करणाऱ्या लोकांवर अवलंबून असतं. ही बाब बालहक्कांच्या संदर्भात अधिक महत्त्वाची ठरते. कारण सर्वोत्तम संविधान आणि उत्कृष्ट कायदे असूनही, जर मुलांचं बालपण दारिद्र्य, हिंसा, उपेक्षा आणि शोषणाच्या छायेत जात असेल, तर घटनात्मक आश्वासनं अपुरी ठरतात. म्हणूनच आज गरज केवळ नवीन कायद्यांची नाही; तर विद्यमान हक्कांना प्रत्यक्षात आणण्याची आहे.

प्रत्येक धोरणामध्ये बालकेंद्रित दृष्टिकोन, शिक्षण आणि आरोग्यावर वाढीव गुंतवणूक, सर्वाधिक वंचित मुलांपर्यंत पोहोचणाऱ्या सेवा आणि बालहक्कांबाबत समाजात अधिक संवेदनशीलता निर्माण करणं ही काळाची गरज आहे. कारण संविधानाने मुलांना जे दिलं आहे, ते केवळ कागदावरच राहू नये. त्या हक्कांना वास्तवात उतरवणं हीच लोकशाहीची खरी परीक्षा आहे आणि एखाद्या राष्ट्राची खरी प्रगती त्याच्या उंच इमारतीं किंवा आर्थिक वाढीच्या आकडेवारीने नव्हे, तर त्याने आपल्या मुलांना दिलेल्या सुरक्षित, सन्माननीय आणि आनंदी बालपणाने मोजली जाते.

पान ३ वरून

## खळी गालावर पडावी, कपाळावर..

एखादा मनापासून केलेला पदार्थ जर यांना आवडला तर तो पदार्थ बनविण्याची सार्थकता त्यांच्या प्रतिसादांमधून हेच लोक मिळवून देतात. अन्यथा वर्षानुवर्षे सुग्रास जेवण खाऊ घातल्यानंतरही त्याबद्दल पत्नीचे कौतुक न करता अवाक्षरही न काढणारे धीरगंभीर माणसेही या जगात खूप आहेत किंवा मला कौतुक करता नाही येत, समोरच्याने समजून घ्यावे असे म्हणत असलेल्या महिलाही खूप आहेत. मुळात जीवनाचा खरा आनंद कशात आहे हे ज्याला कळते तोच जीवनात आनंदाची उधळण करू शकतो. जीवनाचा आनंद लोकांना दूर लोटण्यात नाही तर प्रेमाने जवळ करण्यात आहे, गंभीर चेहरा करून वावरण्यात नाही तर खळखळून मनमुराद हसण्यात आहे, बोजड तत्त्वज्ञानाचे बोधामृत पिऊन व पाजून टीकात्मक होण्यात नाही तर साध्या साध्या गोष्टींमधील तत्त्वज्ञान समजून निखळ होण्यामध्ये आहे, पावसाच्या दिवसात घराच्या खिडक्या दारे घट्ट बंद करून खिडक्यांच्या काचांमधून पाऊस बघण्यात नाही तर पावसाच्या जलधारांमध्ये चिंब भिजून रोम रोम रोमांचित करून घेण्यात आहे.

प्रसिद्ध वक्ते संजय उपाध्ये यांच्या सांगण्यानुसार जीवन हे सीरियसली घेण्याचा विषय नाही, तो सिनसीअरली घेण्याचा विषय आहे. जीवनाकडे बघण्याचा आपला सकारात्मक व मनमौजी दृष्टिकोनच आपल्याला हसणे शिकवितो व त्या हसण्याच्या वलयात आपल्याला अनेकांना सामावून घेता येते. असे करताना समोरच्या व्यक्तीच्या गालावर आपल्या सहवासाने खळी उमटेल अशी खात्री आपण बाळगू शकतो व ती कपाळावर उमटणार नाही, याची काळजीही घेऊ शकतो.

पान ४ वरून

## नदीचा गुदमरतोय श्वास



अशा परिस्थितीत उपलब्ध गोड्या पाण्याचे स्रोत जपणे गरजेचे आहे. नदी प्रदूषित झाल्यास पाणी शुद्ध करण्यासाठी मोठा खर्च करावा लागतो. हा आर्थिक भार शेवटी सामान्य नागरिकांवरच येतो. त्यामुळे नदी स्वच्छ ठेवणे पर्यावरणीयच नव्हे, तर आर्थिकदृष्ट्याही आवश्यक आहे. आज पुण्यात नदी सुशोभीकरणाच्या विविध योजना राबविल्या जात आहेत. नदीकाठ विकसित करणे, पायी चालण्याचे मार्ग, सायकल ट्रॅक आणि मनोरंजन सुविधा उभारण्याचे नियोजन केले जात आहे; मात्र नदीचे पाणी आणि नदीपात्र स्वच्छ नसताना केवळ सुशोभीकरण करून नदीचे पुनरुज्जीवन होऊ शकत नाही. नदी जिवंत ठेवायची असेल, तर सर्वप्रथम प्रदूषणाचे स्रोत बंद करणे, सांडपाण्यावर प्रक्रिया करणे, कचरा टाकण्यास पूर्णविराम देणे आणि नदीच्या नैसर्गिक प्रवाहाचे संरक्षण करणे आवश्यक आहे. अन्यथा सुशोभीकरण हे केवळ बाह्य देखाव्यापुरते मर्यादित राहील. (लेखक पर्यावरण अभ्यासक आहेत.)

पान ४ वरून

## प्रेम आणि सन्मान

कारण आपण जे काम करतो त्यामागे पुष्कळ लोक असतात. त्यामुळे आपल्या कुठल्याही यशात हे सगळे भागीदार असतात. म्हणूनच आपण करतो तेच चांगले असेल, असे मानू नये व मी केले, मी केले, असा अहंकार बाळगायला नको. सेवा देणाऱ्या लोकांनी आपल्या मनात कुठलाही अहंकार ठेवायला नको, तर मनात आपलेपणाची भावना ठेवूनच सेवाकार्य करायला हवे.

आपल्याला माहीत आहे की, आपण या विशाल अवकाशातील मात्र एक अतिसूक्ष्म कण आहोत, ज्याच्या असण्या-नसण्याने या चराचर सृष्टीला, अखिल ब्रह्मांडाला काही एक फरक पडणार नाही, तर मग हा वृथा अहंकार कशासाठी? मी का बोलू? मी का फोन करू? मी का कमीपणा घेऊ? मी का नेहमी समजून घ्यायचं? मी काय कमी आहे?... हे असले बरेच मी आपल्या आयुष्यात विष कालवतात. पण, आज गरज आहे ती मीपणा सोडून, माणुसकी जोडण्याची! आज या जगातील बरेच जण प्रेमासाठी आसुसले आहेत, म्हणून आपल्यातील इगोला बाय बाय करून, आयुष्याच्या वाटेवर भेटणाऱ्या प्रत्येकाला प्रेम आणि सन्मान द्या.

पान ५ वरून

## ओवीत गोठले रक्त मुक्या शब्दांचे...

अश्रू तराळून आले. ओवीशी असणाऱ्या स्त्रीदुःखाचे आदिम नाते आणि शब्दात न सांगता येणारे स्त्रीचे दुःख या इवल्याशा कवितेने सूचकपणे उजागर केले आहे. महानोर स्त्रीदुःखाची शब्दांत न मावणारी कहाणी सांगताना ओवी या शब्दाचे सूचकपणे उपयोजन करतात. दाट दुःखाचं गाठोडं शब्द उचलेना ओठ अशी मनाची अवस्था असताना मुक्या जात्याच्या पाळूशी ओवी गाते प्राणातुन असे शब्द अंकुरत जातात.

**जात्यात, पिठावर लाल थेंब कुंकाचे**
**ओवीत गोठले रक्त मुक्या शब्दांचे...**
**सकाळ सोन्याची, दाणे पाखडले दारी**
**जात्याच्या पाळूत जीव शोधतो कैवारी**
**जात्याच्या पाळूत घिरघर दाण्याचं**
**पीठ होताना, प्रत्येक समेला ओवी गाताना**
**तिचं मन भरून येतं... आभाळासारखं**
**जात्यातून गळणाऱ्या पिठासारखं.**
**ती दररोज ओवी गाते सूर्यासाठी**
**संसारातल्या सुखदुःखासाठी...**

या आणि अशा कितीतरी कवितांमध्ये जात्याचा उल्लेख आहे; ओवीचा उल्लेख आहे. ओवीत गोठले रक्त मुक्या शब्दांचे ही ओळ स्त्रीदुःखाचे आभाळ कवेत घेऊनच उभी आहे. ती दररोज ओवी गाते संसारातल्या सुखदुःखासाठी या ओळीत ओवी प्रार्थना होते. कधी प्रार्थना, कधी दुःखाचा उमाळा, कधी हुंदका, कधी गहिवर, कधी सांत्वन, कधी अंगाई अशी कितीतरी स्त्री- भावभावनांची रूपे महानोर ओवी या शब्दाच्या उपयोजनातून उजागर करतात. जे दुःख कधीच, कुठेच व्यक्त करता येत नाही, जे दुःख शब्दात मावत नाही आणि शब्दांच्या पलीकडचे आहे, ते दुःख स्त्री जात्यापाशी ओवीतून सांगत असते. मुक्या जात्याच्या पाळूशी ओवी गाते प्राणातुन... हे शब्द जात्याशी अवचितपणे, उत्स्फूर्तपणे व्यक्त होणाऱ्या ओवीचे स्त्रीदुःखाशी असणारे शब्दात न सांगता येणारे नाते उजागर करणारे आहे. ओवीने स्त्री प्रतिभेचे सारे विभ्रम सांभाळले आहेत. ओवी महाराष्टाचे, मराठी भाषा आणि साहित्याचे न संपणारे ऐश्वर्य आहे.

# आंदोलन नेमके कोणाचे?

**दिल्लीतील जंतरमंतर हे लोकशाहीत आपल्या मागण्या मांडण्याचे आणि आंदोलन करण्याचे हक्काचे ठिकाण. परंतु, अलीकडेच तिथे सुरू असलेल्या कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाने या जागेला एक वेगळेच हिडीस रूप दिल्याचे दिसते आहे. विद्यार्थी हक्कांच्या आणि जनसामान्यांच्या नावाखाली सुरू झालेल्या या आंदोलनात तथाकथित डाव्या विचारसरणीच्या लोकांची झालेली गर्दी आणि तिथे लागलेल्या घोषणा पाहिल्यावर, हे खरोखरच विद्यार्थ्यांचे आंदोलन आहे की, भारत आणि हिंदूविरोधी शक्तींना एकत्र आणणारे मैदान, असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे. जेव्हा एखाद्या आंदोलनात देशाच्या अखंडतेला आव्हान देणारे घटक सक्रिय होतात, जेव्हा तिथे बहुसंख्य समाजाच्या श्रद्धास्थानांवर चिखलफेक केली जाते, तेव्हा ते आंदोलन विद्यार्थ्यांचे राहत नाही. ते बनते, एक सुनियोजित कारस्थान!**

समाजभान

**ओंकार मुळ्ये**



शिक्षणाचा, रोजगाराचा किंवा विद्यार्थ्यांच्या भल्याचा या घोषणांशी काय संबंध? हा सरळसरळ भारताच्या सांस्कृतिक आणि सामाजिक ताण्याबाण्याला छेद देण्याचा प्रयत्न आहे. सामान्य विद्यार्थ्यांनी आणि देशातील जनतेने आता हा ढोंगीपणा ओळखण्याची गरज आहे.

स्वतःला जनसामान्यांचे आणि विद्यार्थ्यांचे कैवारी म्हणवणारे काही चेहरे या आंदोलनाचे नेतृत्व करताना दिसले. कुणाल कामरा, निवेदिता मेनन, अरुंधती रॉय इ. अशा अनेकांनी मूळ प्रश्नांना बगल देऊन या आंदोलनाचा रोख पूर्णपणे राजकीय आणि एका विशिष्ट अजेंड्याकडे वळवताना स्पष्टपणे दिसले. डाव्यांनीच जणू या आंदोलनाचा ताबा घेतल्यासारखी परिस्थिती तिथे निर्माण झाली होती. विद्यार्थ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून आपला देशविरोधी अजेंडा कसा रेटायचा, याचेच प्रात्यक्षिक जंतरमंतरवर पाहायला मिळाले.

प्रभू श्रीरामांचा अपमान असेल, हिंदूंच्या धार्मिक भावनांना ठेच पोहोचवण्याचा प्रयत्न असेल, 'लाजिम है कि हम भी देखेंगे... बस नाम रहेगा अल्लाह का' या गायलेल्या ओळी असतील, या सर्व गोष्टी उघडपणे करून डावे लोक धार्मिक ध्रुवीकरण करणारा अजेंडा पुढे रेटताना दिसले. याचा खरेतर मूळ विद्यार्थी मागण्यांशी काहीही संबंध नव्हता. त्यामुळे हे आंदोलन विद्यार्थ्यांचे आहे की, विशिष्ट विचारसरणीच्या हिंदू-विरोधकांचे, हेच आता कळेनासे झाले आहे.

**हे समजून घ्या!**

अशातच, आता एक गोष्ट समजून घेणे अत्यावश्यक आहे, ती म्हणजे; चित्रपट आणि वास्तव या दोन्ही अत्यंत भिन्न गोष्टी आहेत. पण, आजची तरुण पिढी अनेकदा या दोन्हींमधील फरक विसरून जाते. याचेच एक ताजे उदाहरण म्हणजे, सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक आणि 'थ्री इडियट्सफ चित्रपटातील फुंसुक वांगडू हे पात्र. अलीकडेच आमिर खान याने एका निवेदनात स्पष्ट केले की, 'थ्री इडियट्स' चित्रपटातील 'फुंसुक वांगडू'चे पात्र आणि सोनम वांगचूक यांचा काडीमात्र संबंध नाही. या खुलाशानंतर एक मोठा संभ्रम दूर झाला असला, तरी यानिमित्ताने आपल्या देशातील युवा पिढीच्या मानसिकतेवर आणि त्यांच्या भवितव्यावर एक गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनात सोनम वांगचूक यांनी सहभाग घेत, उपोषणाला सुरुवात केली. त्यांना भेटायला अनेकजण येऊन गेले. मात्र, तथाकथित विद्यार्थी आंदोलनांच्या मंचावर जेव्हा राष्ट्रविरोधी चेहरे जातात, तेव्हा त्यांच्यामागे तरुण पिढीही आंधळेपणाने धावू लागते. काही आंदोलने अशी असतात, जी अनेकदा राजकीय स्वार्थासाठी आणि विशिष्ट विचारसरणीचा अजेंडा चालवण्यासाठी प्रायोजित केली जातात, हे तरुणांनी समजून घेतले पाहिजे. अशा वेळी केवळ एका आभासी चेहऱ्याकडे पाहून आंदोलनात उडी घेणे म्हणजे, स्वतःच्या भवितव्याशी खेळण्यासारखे आहे.

एका बाजूला देशात पेपर लीक, रोजगाराच्या संधी आणि शैक्षणिक सुधारणा यांसारखे अत्यंत महत्त्वाचे प्रश्न आहेत. या प्रश्नांवर तरुणांनी आवाज उठवला पाहिजे. पण, हा आवाज उठवताना नेतृत्व कोणाच्या हातात आहे, याचा विचार करणे आवश्यक आहे. जेव्हा एखादे आंदोलन मूळ मुद्द्यावरून भटकून वैचारिक चिखलफेकीकडे वळते, तेव्हा तिथे वेळेचा आणि ऊर्जेचा अपव्यय होतो. अशा आंदोलनाच्या नादात गुन्हे दाखल झाले किंवा करिअर उद्ध्वस्त झाले, तर त्याचे परिणाम सामान्य तरुणाला आणि त्याच्या कुटुंबालाच भोगावे लागतात. आभासी जगातील नायकांच्या मागे धावून अमूल्य भवितव्य धोक्यात घालण्यापेक्षा, विवेकबुद्धीने वागणे आणि जागरूक राहणे, हाच आजच्या तरुणांसाठी एकमेव मार्ग आहे. कोणाची तरी राजकीय ढाल बनण्यापेक्षा देशाचे सुजाण नागरिक बना!



# अशी ही जेन-झी

**आताच्या जेन- झी पिढीबद्दल बोलताना, वेगळेपणावर भाष्य करताना ही पिढी तर्हेवाईक असल्याचा ठपका काही लोकांना ठेवायचाच असतो. वास्तविक प्रत्येक पिढी ही त्या काळाचं अपत्य असतं. आपल्या काळाचे संस्कार अंगी बाणवतच माणसं जगतात. आजच्या काळातील चलनातलं नाणं म्हणजे एआय आणि माहिती. या दोन गोष्टींच्या जोरावर जगावर राज्य करता येतं. या पार्श्वभूमीवरच आजच्या पिढीचं टेक सॅव्ही असणं, आपण अनुभवत आहोत. मात्र, त्याचबरोबर दुसऱ्या बाजूला या टेकच्या जंजाळातून समाजाला मुक्त करण्यासाठी, विकसित राष्ट्रांमध्ये काही चळवळी जन्माला येत आहेत. यांचे भोई जेन- झी आहेत.**

वेध

**मुकुल आव्हाड**

२१ व्या शतकात आपण एआय आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या अभूतपूर्व क्रांतीचे साक्षीदार आहोत. परंतु, अमेरिकेत ज्या वेगाने एआय विस्तारत आहे, तितयाच तीव्रतेने त्याला विरोधही होत आहे. नुकतेच न्यूयॉर्कने नवीन डेटा सेंटर्सच्या उभारणीवर, तात्पुरती बंदी घालणारा कायदा मंजूर करण्याच्या दिशेने पाऊल टाकले. तर, दुसरीकडे दीक्षान्त समारंभांमध्ये तंत्रज्ञान क्षेत्रातील नेत्यांना, विद्यार्थ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागले. नोकऱ्याच्या संभाव्य धोक्यांमुळे, तरुण पिढीमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

व्हाईट हाऊसचे सल्लागार आणि तंत्रज्ञ डेव्हिड फ्राईडबर्ग नुकतंच एका पॉडकास्टमध्ये म्हणाले की, एआय मुळे नोकऱ्या संपतील ही एक ल्युडाईट विचारसरणी असून, ती दररोज चुकीची ठरते आहे. आता या ल्युडाईट शब्दाचा इतिहासच गमतीदार आहे.

१९ व्या शतकाच्या सुरुवातीला इंग्लंडमधील नॉटिंगहॅम येथे औद्योगिकीकरणाची लाट आली. पॉवर लूममुळे, पारंपरिक कापड विणकरांच्या उपजीविकेला धोका निर्माण झाला. या कारागिरांनी अनेक वर्षांच्या प्रशिक्षणातून, कौशल्य विकास साधला होता. कारखानदारांनी तंत्रज्ञानाच्या वापराने मजुरीचे दर कमी केले. याविरुद्ध विणकरांनी बंड पुकारले. या बंडाला चेहरा मिळाला, तो एका काल्पनिक लोकनायकाचा. त्याचं नाव होतं नेड लूड! त्याच्या नावाचा वापर करून, काहींनी कारखान्यांमधील यंत्रांची तोडफोड सुरू केली.

पत्रकार ब्रायन मर्चंट यांच्या मते, खरे ल्युडाईट्स तंत्रज्ञान विरोधी नव्हते, तर लोकांचे शोषण करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानाच्या विरोधी होते. अखेर ब्रिटिश सरकारने लष्कराच्या मदतीने, हे बंड चिरडले. त्यानंतर ल्युडाईट्सना, इतिहासात प्रगतीविरोधी म्हणून रंगवले गेले. आज दोन शतकांनंतर, जेन- झीफया ल्युडाईट लेबलचा अभिमानाने स्वीकार करत आहे. मोठ्या तंत्रज्ञान कंपन्यांच्या वाढत्या वर्चस्वाचा आणि अल्गोरिदमचा निषेध करण्यासाठी, कॉलेज कॅम्पसमध्ये ल्युडाईट लब्स स्थापन झाले आहेत.

न्यूयॉर्क शहरात अज्ञात कार्यकर्त्यांनी समाज माध्यम-मुक्त कार्यक्रमांची, एक मालिकाच आयोजित केली. याला द समर ऑफ ल्युड असेच नाव देण्यात आले. ही नवी पिढी तंत्रज्ञानाचा पूर्णपणे तिरस्कार करत नाही, तर स्क्रीनच्या गुलामगिरीतून स्वतःला मुक्त करण्याचा प्रयत्न करते आहे. यासाठी तरुणांनी विविध उपाय राबवण्याचा निर्णय घेतला. इंटरनेट नसलेले जुने फोन्स वापरणं, डायरी लिहिणं, विणकाम करणं इत्यादी गोष्टी आपल्याला दिसतात. फोन आणण्यास बंदी असणारे आणि संवादास प्राथमिकता देणारे क्लबही, युरोपात आहेत.

कामाची गरज म्हणून आपला स्क्रीनटाईम, प्रमाणाबाहेर वाढला आहे. काही विकसनशील देशांमध्ये एका बाजूला अपस्कील न झाल्यास नोकरी जाण्याची भीती; तर दुसऱ्या बाजूला नवनवीन कोर्सेसचा बाजार. अमेरिकेतील तरुण चळवळींमधून, एआयवरील परावलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न करतात. मात्र, जी गोष्ट आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक होत आहे, तिथे यांचा उपयोग काय? असाही प्रश्न पडतो. तंत्रज्ञानाचा मारा नसलेल्या काळात जेन-झीचं बालपण गेलं. वर्तमानातील अस्वस्थता, ताणतणाव या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा जुनं ते सोनं हे आजच्या पिढीला वाटत असेल, तर त्यात नवल ते काय!

एआय हा जर आजच्या काळाचा प्रवाह असेल, तर ल्युडाईट्स ही प्रवाहाविरोधातली बंडखोरी आहे. इतिहासाच्या सुयोग्य आकलनातून, क्रांती प्रतिक्रांतीच्या आकलनातूनच आपल्याला आजचा समाज समकेल आणि परिवर्तनाची पुढची दिशा सापडेल, हे नक्की!

# अनावश्यक सिझेरियनवर लगाम!

**वैद्यकीय क्षेत्रात प्रसूती हा एक अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाचा टप्पा. मात्र, अलीकडच्या काळात नैसर्गिक प्रसूतीऐवजी सिझेरियन शस्त्रक्रियेचे प्रमाण जगभरात झपाट्याने वाढले. या पार्श्वभूमीवर तुर्कीये सरकारने घेतलेला एक धाडसी निर्णय सध्या जागतिक पातळीवर चर्चेचा विषय ठरला आहे. अनावश्यक सिझेरियन करणाऱ्या १०० हून अधिक डॉक्टरांवर दंडात्मक कारवाई करत, त्यांना निलंबित करण्यात आले. या निर्णयामुळे वैद्यकीय जगतात खळबळ उडाली असून, या समस्येचे गांभीर्य पुन्हा एकदा समोर आले आहे.**

वेध

**ओंकार मुळ्ये**

तुर्कीयेमध्ये २०२५ पासून ठोस वैद्यकीय कारणांशिवाय सिझेरियन प्रसूती करण्यावर कायदेशीर निर्बंध घालण्यात आले आहेत. तुर्कीयेमध्ये जन्मदर झपाट्याने कमी होत असल्याने हा दर संतुलित ठेवण्यासाठी सरकारने नैसर्गिक प्रसूतीला प्रोत्साहन देण्याचे ठरवले आहे. राष्ट्राध्यक्ष एर्दोगान यांनी २०२६ ते २०३५ हा कालावधी कुटुंब आणि लोकसंख्या दशक म्हणून घोषित केला आहे. या धोरणांतर्गत बालजन्माला प्रोत्साहन देणे, फॅमिली अॅण्ड यूथ फंड च्या माध्यमातून आर्थिक मदत करणे आणि वैद्यकीय नियम कडक करून जन्मदर वाढवणे यांवर भर दिला जात आहे.

जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार, सिझेरियन प्रसूतीमध्ये तुर्कीये हा जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. तिथे सुमारे ५०.८ ते ५८.४ टक्के प्रसूती सिझेरियनद्वारे होतात. तसेच आर्थिक सहकार्य आणि विकास संघटनेच्या ३८ सदस्य देशांमध्ये तुर्कीये सिझेरियनच्या प्रमाणात अव्वल स्थानी आहे. या वाढत्या प्रमाणाला आळा घालण्यासाठी सरकारने डॉक्टरांवर कारवाई सुरू केली आहे, ज्याला स्थानिक डॉक्टरांच्या संघटनांनी विरोध दर्शवला आहे. द लॅन्सेटसारख्या नामांकित वैद्यकीय नियतकालिकानुसार, वैद्यकीय गरज नसतानाही सिझेरियनचे प्रमाण वाढण्यामागे काही व्यावसायिक आणि सामाजिक कारणेही असू शकतात. काही खासगी रुग्णालये अशी आहेत, जिथे नैसर्गिक प्रसूतीपेक्षा सिझेरियनसाठी दुप्पट ते तिप्पट शुल्क आकारले जाते. अशी माहिती आहे की, आधुनिक जीवनशैली, प्रसूती कळांची भीती आणि समुपदेशनाचा अभाव, यामुळे काही गर्भवती महिला स्वतःहून सिझेरियनचा पर्याय निवडतात.

तुर्कीयेमधील ही परिस्थिती भारतासाठीही एक धोक्याची घंटाच. भारतातही सिझेरियन प्रसूतीचे प्रमाण झपाट्याने वाढत असून, ते सध्या २७ टक्क्यांवर पोहोचले आहे. जागतिक आरोग्य संघटनेने सुचविलेली आदर्श मर्यादा १० ते १५ टक्के आहे, म्हणजेच भारत या मर्यादेपेक्षा खूप पुढे गेला आहे. Health तुर्कीये सरकारने घेतलेला निर्णय हा केवळ एका देशापुरता मर्यादित नसून, बदलत्या सामाजिक मानसिकतेवर ओढलेले आसूड आहेत.

भारतातही आरोग्य यंत्रणा आणि रुग्णालयांवर योग्य नियंत्रण ठेवण्याची, तसेच गरोदर महिलांचे योग्य समुपदेशन करण्याची नितांत गरज आहे; जेणेकरून वैद्यकीय कारणाशिवाय होणाऱ्या अनावश्यक शस्त्रक्रिया टाळता येतील आणि माता व बालकांचे आरोग्य सुरक्षित राहील.



कुटुंबप्रबोधनाच्या दृष्टीने विचार केला, तर कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्ती (आजी, आई, सासू) आणि गरोदर महिलांना एकत्र आणून नैसर्गिक प्रसूतीचे शारीरिक व मानसिक फायदे समजावून सांगता येतील. जर कुटुंबातूनच नैतिक आणि मानसिक पाठबळ मिळाले, तर महिलांचा आत्मविश्वास वाढतो. कुटुंबप्रबोधनामुळे केवळ आई आणि बाळाचे आरोग्यच सुधारणार नाही, तर खासगी रुग्णालयांकडून होणाऱ्या आर्थिक शोषणालाही आळा बसेल.

तुर्कीयेने अनावश्यक सिझेरियन प्रसूतीविरोधात घेतलेला कठोर निर्णय हा जगभरातील व्यावसायिक आणि सामाजिक आरोग्यव्यवस्थेसाठी एक स्पष्ट संदेश आहे. केवळ आर्थिक नफा किंवा वेळेची बचत यांमुळे नैसर्गिक प्रसूतीचा पर्याय नाकारणे, ही एका निरोगी समाजाच्या निर्मितीतील मोठी बाधा आहे. कौटुंबिक सुसंवाद, योग्य समुपदेशन आणि संवेदनशील आरोग्य यंत्रणा, या तिन्हींच्या समन्वयातूनच आपण अनावश्यक वैद्यकीय हस्तक्षेप टाळू शकतो. आई आणि बाळाचे नैसर्गिक आरोग्य जपणे, ही केवळ एका कुटुंबाची जबाबदारी नसून, ती एका सशक्त व सुदृढ राष्ट्रनिर्मितीची पायाभरणी आहे, हाच या संपूर्ण परिस्थितीचा मुख्य गाभा आहे.



## ओला ऋतू...

ओली झाडे
ओली रस्ते
ओली पायवाट
ती...
ओला सुगंध
ओली फुले
ओली वनराई
ती....
ओली पाने
ओली माती
ओली पांदण वाट
ती...
ओली सल
ओला ऋतू
ओल्या मातीनं
स्वागत करती.

**सुधाकर मानवतकर**

## पाऊस

पाऊस कधीचा पडतो
स्वप्नाच्या गावात
मी शुष्क कोरडा ठक्क
उष्णाच्या कडाक्यात
ना नाव कागदी ओली
अंगणातल्या ओहळात
झाडांची पाने पिवळी
ग्रीष्माच्या मुक्कामात
शब्दांची तगमग होते
आठवता मागचा मोसम
मन मरगळलेले उत्तर
पावसाची कविता ना
'सम' मेघांनी नभात यावे
मज चिंब भिजवून द्यावे
मग शब्द येतील आतून
मी पाऊस पाऊस व्हावे

**कल्पी जोशी**

## निसर्ग...

एकांतात आनंद देणारा निसर्ग,
पक्ष्यांच्या थव्याने नटलेला...
फुला झाडांनी बहरलेला
निसर्ग..!
मनुष्याचा नि:स्वार्थी मित्र निसर्ग,
किलबिल सुरांनी सुवासलेला...
नद्या पर्वतांनी सजलेला
निसर्ग..!
वाऱ्यासवे मायेचा
आभास करून देणारा,
विविध रंगाने रंगलेला...
धरतीवरील स्वर्ग निसर्ग..!
मनुष्याच्या प्रगतीमध्ये
महत्त्वाचा वाटा
निसर्ग..!
आपल्याला मिळालेली
मौल्यवान भेट
निसर्ग...!!

**गायत्री नागरे**

## दाता

दरवर्षीच पाऊस हा
घेऊन दान देतो
उन्हाच्या काहिलीला
गारेगार मन देतो
भुकेल्या जनावरांना
हिरवेगार रान देतो
सुकलेल्या त्या फांदीला
कोवळे कोवळे पान देतो

रिमझिम गाणाऱ्या सुरांना
प्रतिसाद तो छान देतो
ऐकणाऱ्या हृदयाला
आपुलकीचे कान देतो
चिंब भिजल्या कायेला
सौंदर्याचा मान देतो

कविमनाच्या ओंजळीत
चार शब्दांचे दान देतो
कोण म्हणतं पाऊस
फक्त पाऊस होऊन येतो
जातानाही पुढच्या वर्षीची
चाहूल मागे ठेवून जातो

**अश्विनी भागवत**



## निसर्ग चौघडे

कृष्णनभ करिती रिते
जलांचे संपृक्त घडे
शांत तप्त वसुंधरा
मेघ वाजविती चौघडे.
इंद्रधनू सप्तरंगी
सौदामिनी कडकडे
घनगर्जत येता
अंतरात धडधडे.

वर्षाऋतूचे आगमन
रसिकमना आवडे
नवविषयाचे सामर्थ्य
साहित्यिका सापडे.
अनिल मुक्त वाहे
प्रणयास रंग चढे
वनी मालती, मल्लिका

धरित्रीस सुगंधी सडे.
मकरंद प्राशिती मिलिंद
पुष्प पुष्प बागडे
हिंदोळ्यासम तरुवर
झेपावती माकडे.
गुलमोहर केशरी
तपस्व्यांसम झाडे

पथ मोहक सुंदर
रेखीव नक्षी कडे कडे.
समतोल पर्यावरणाचा
नको निसर्गाशी वाकडे
कृषका कष्टां येई फळ
घालू ईश्वरा आपण साकडे.

**स्वप्ना जगदळे**

आकलन **प्रिया सावंत**

# श्रीराम जन्मभूमी न्यास:

## धर्मनिष्ठेचे बळ आणि नॅरेटिव्हची वावटळ!

**गेल्या काही दिवसांपासून अयोध्येतील राम मंदिर देणगी अपहारप्रकरणी विरोधकांकडून फेक नॅरेटिव्ह प्रस्थापित करून जनतेची दिशाभूल करण्याचे हेतुपुरस्सर प्रयत्न सुरू आहेत. लोकशाहीत प्रश्न विचारणे हे अपेक्षितच; पण अर्धसत्याच्या जोरावर समाजाची दिशाभूल करून, हिंदू धर्मालाच बदनाम करण्याचे षड्यंत्र हाणून पाडायलाच हवे.**



श्रीराम जन्मभूमी मंदिर हा केवळ श्रद्धेचा विषय नाही, तर तो भारतीय राज्यघटनेचा, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा आणि संस्थात्मक जबाबदारीचा विषय आहे. दि. ९ नोव्हेंबर २०१९ रोजी पाच न्यायमूर्तींच्या घटनापीठाने दिलेला एकमुखी निर्णय, त्यानुसार केंद्र सरकारने स्थापन केलेला श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र न्यास आणि ११ कोटींहून अधिक कुटुंबांनी स्वेच्छेने दिलेले २ हजार, ५०० कोटींचे दान; या तीन घटकांनी या प्रकल्पाला अभूतपूर्व वैधता प्राप्त झाली आहे. अशा पार्श्वभूमीवर ७ कोटी, ५ लाख रुपयांचा घोटाळा या मथळ्याखाली जे चित्र रंगवले जात आहे, त्याला तथ्य आणि तर्काच्या कसोटीवर तपासणे आवश्यक आहे. कारण, अर्धसत्याचा प्रसार पूर्ण असत्यापेक्षा अधिक हानिकारक असतो.

हा तथाकथित घोटाळा बाहेरून उघडकीस आलेला नाही. न्यासाचे सदस्य कृष्ण मोहन यांनीच दि. २५ जून रोजी तक्रार दाखल केली. पुढे त्याच दिवशी राज्य सरकारने एसआयटी स्थापन केली आणि एफआयआर नोंदवून देणगी मोजणी करणाऱ्या आठ कर्मचाऱ्यांना अटकदेखील करण्यात आली. पोलिसांनी ८० लाख रुपये जप्त केले असून, उर्वरित रकमेचा तपास सुरू आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी झिरो टॉलरन्सची भूमिका घेतली आहे. ज्या संस्थेला सत्य दडपायचे असते, ती स्वतःच्या यंत्रणेविरुद्ध गुन्हा दाखल करत नाही. ज्या व्यवस्थेला काही लपवायचे असते, ती स्वतःहून पोलिसांना पाचारण करत नाही. त्यामुळे घोटाळा झाला या आरोपाआधी न्यासानेच संभाव्य अपहार उघडकीस आणला हे वास्तव नोंदवणे बौद्धिक प्रामाणिकपणाचे किमान लक्षण आहे.

एसआयटीची प्रक्रिया न्यासाच्या पुढाकारातूनच सुरू झाली, हे लपवून केवळ पैसे गायब असा एकांगी प्रचार करणे म्हणजे जनतेची दिशाभूल करणे होय. सार्वजनिक जीवनात वरिष्ठ पदावरील व्यक्तीने चौकशीच्या काळात नैतिक जबाबदारी स्वीकारून पद बाजूला ठेवणे, ही नैतिक परंपरा आहे. सरचिटणीस आणि विश्वस्त यांचे राजीनामे याच परंपरेचा भाग आहेत. त्याचा अर्थ, दोष कबूल करणे किंवा गुन्हा मान्य करणे असा होत नाही. तपास यंत्रणेला मोकळेपणाने काम करता यावे, कोणताही दबाव येऊ नये, यासाठी घेतलेला हा निर्णय आहे. राजीनामा म्हणजे कबुलीजबाब हा युक्तिवाद मान्य केला, तर संसदीय लोकशाहीतील अनेक संकेतच मोडून पडतील. त्यामुळे राजीनाम्याचे राजकीय भांडवल करण्यापेक्षा एसआयटीचा अंतिम अहवाल आणि न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होण्याची वाट पाहणे, हीच परिपक्वता आहे. ७ कोटी, ५ लाख हा आकडा अंतिम निष्कर्ष नसून, प्राथमिक अंदाज आहे.

मंदिरात दररोज हजारो भाविकांकडून रोकड, दागिने, धनादेश आणि ऑनलाईन माध्यमातून देणगी येते. ती मोजणे, नोंदवणे, वर्गीकरण करणे आणि बँकेत भरणे ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. अशा प्रचंड व्यापाच्या व्यवहारात मानवी त्रुटी, तांत्रिक चूक किंवा हेतुपुरस्सर अपहार या तिन्ही शक्यता असू शकतात. म्हणूनच, एफआयआरमध्ये चोरी, अपहार आणि फसवणूक या सर्व कलमांचा समावेश आहे. काही कर्मचार्यांनी अपहार केला असेल, तर त्यांना कायद्याने कठोर शिक्षा झालीच पाहिजे. पण, काही व्यक्तींच्या संभाव्य गुन्ह्यासाठी संपूर्ण न्यासालाच भ्रष्ट ठरवणे, हा तर्कदुष्ट युक्तिवाद आहे. एका बँकेच्या रोखपालाने पैसे चोरले म्हणून, रिझर्व्ह बँक बरखास्त करत नाहीत. एका शाळेत पेपर फुटला म्हणून, संपूर्ण शिक्षण मंडळ रद्द करत नाहीत. तोच सामान्य न्याय न्यासाला लागू झाला पाहिजे. विरोधी पक्षांनी प्रश्न उपस्थित करणे, हा लोकशाहीचा गाभा आहे; परंतु चौकशी व्हावी, या मागणीपासून ट्रस्ट बरखास्त करा आणि राम मंदिर घोटाळा या घोषणांपर्यंत जी मजल गेली आहे, त्या हेतूबद्दल शंका निर्माण करते. १३५ कोटींच्या देशात एकाही दंगलीशिवाय, एकाही वादाशिवाय २ हजार, ५०० कोटींचा निधी गोळा होणे, हे आधुनिक भारताचे यश आहे. मुस्लीम कारागिरांनीही नक्षीकामात योगदान देणे, हे सामाजिक सलोख्याचे उदाहरण आहे. २०२५ मध्ये पाच कोटींहून अधिक भाविकांनी अयोध्येत दर्शन घेतले, ज्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला आणि रोजगाराला अभूतपूर्व चालना मिळाली. या सर्व सकारात्मक बाबींना बाजूला सारून केवळ अपहाराच्या अपूर्ण आकड्यावरून संपूर्ण प्रकल्पालाच कलंकित करणे म्हणजे, ११ कोटी दात्यांच्या सद्भावनेचा अवमान आहे. ज्यांना निकालानंतरही मंदिर उभे राहिलेले पाहावत नाही, तेच आज पारदर्शकतेच्या नावाखाली पुन्हा एकदा जनमानसात संभ्रम पसरवत आहेत. पुढचा मार्ग कायद्याचा आहे, कलहाचा नाही. एसआयटीचा तपास पूर्ण होईल, न्यायालयीन प्रक्रिया तिच्या गतीने चालेल. निर्दोषत्वाचे गृहीतक हा घटनेने दिलेला मूलभूत अधिकार आहे. तोपर्यंत कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला दोषी ठरवणे घटनाबाह्य आहे. न्यासाने आधीच स्पष्ट केले आहे की, दोषी आढळणार्यांना शिक्षा होईल आणि भविष्यात अशी घटना घडू नये, यासाठी व्यवस्था अधिक सक्षम केली जाईल. माध्यमांनी ब्रेकिंग न्यूजच्या स्पर्धेत तथ्यांची मोडतोड करू नये. राम मंदिर हे केवळ दगड, विटा आणि कळसाचे नाही. ते पाच शतकांच्या संघर्षाचे, न्यायिक विजयाचे आणि कोट्यवधी लोकांच्या त्यागाचे मूर्त रूप आहे. व्यवस्थापनात त्रुटी असतील, तर त्या दूर केल्याच पाहिजेत. पण, त्रुटी दूर करण्याच्या नावाखाली संपूर्ण वास्तूच्या पायावरच घाव घालणे, हे न्याय्य नाही. तपास यंत्रणा तिचे काम करेल, दोषींना शासन होईल; पण, त्यासाठी संपूर्ण समाजाच्या श्रद्धेची अग्निपरीक्षा घेण्याचा कुणालाही अधिकार नाही.

सत्याला कुणाच्या प्रमाणपत्राची गरज नसते. आर्थिक गैरव्यवहार हा कायदेशीर विषय आहे, त्यावर सरकार योग्य कारवाई करेलच. मात्र, अर्धवट माहितीच्या आधारे संपूर्ण प्रकल्पाबद्दल अविश्वासाचे वातावरण निर्माण करणे टाळले पाहिजे. समाजाने संयम राखून तथ्यांची वाट पाहावी, हेच विवेकाला धरून आहे.

---

वेधक **माधवी मोहरील**

# डिंक (DINK) आधुनिक विचार की धोक्याची घंटा?



**बदलत्या शैक्षणिक, सांस्कृतिक, व्यावसायिक व कौटुंबिक संदर्भात डिक व सिंक या नव्या जीवन पद्धतीबाबतचा विचार एका कार्यशाळेत चर्चेला आला. डबल इन्कम नो किड्स डिक (DINK) सिंगल इन्कम नो किड्स सिंक (SINK). झेन झी (१९९७ ते २०१२ या काळात जन्मलेली पिढी; जी आता १४ ते १९ या वयोगटातील आहे) आणि त्या आधीची मिलेनियल्स (१९८१ ते १९९६ काळात जन्मलेली आता ३० ते ४५ या वयोगटातील आहे.) एका वेगळ्याच विचारव्यवस्थेचे स्वागत करीत आहे. नवीन विचारांचे थ्रिल कायमच नवीन पिढीला उत्सुकतेचे असते. परंतु काही संकल्पना आधुनिक वाटत असल्या, तरी त्यांच्या स्वीकारातून, काही वर्षांनंतर दिसणारे त्याचे परिणाम वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक आणि राष्ट्रीय पातळीवर गंभीर व दूरगामी परिणाम करतात....**

भारताच्या स्वातंत्र्यानंतर प्रगतीच्या वाटेवर अग्रेसर होताना सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अनेक अंगांनी अनेक सकारात्मक बदल भारतीय समाज स्वीकारत गेला. भारतीय समाजात ७५ वर्षांत दारिद्र्याच्या संकल्पना बदलल्या. गरिबाच्या झोपडीत टीव्ही-फोनच्या रूपात जग जवळ आले आणि सोशल मीडियाने अख्ख्या जगाशी कनेक्ट असूनही वैयक्तिक आयुष्याची चौकट आकुंचित केली. परिणामतः शिक्षण, कौशल्य असणाऱ्या तडफदार हुशार, तरुण पिढीला मोठ्याला पॅकेजच्या नोकऱ्या मोहात पडू लागल्या. आभासी जगातल्या आभासी आनंदाच्या आभासाने सुखसोयीयुक्त घर, गाडी, बँक बॅलन्स या प्राधान्यांमध्ये तरुण-तरुणींची वय वाढली. सारख्या पॅकेजचा सक्षम जोडीदार शोधून चारीही हातांनी भरपूर मेहनत करत जोडपी आर्थिक स्थैर्याच्या मागे धावू लागली. वेगाने धावताना आपला स्पीड कमी झाला तर नुकसान होईल, व्यावसायिक आर्थिक वेग कमी होईल या विचाराने घाबरलेल्या, असुरक्षित वाटणाऱ्या, भेदरलेल्या जोडप्यांनी स्वीकारलेला पर्याय म्हणजे डिंक- डबल इनकम नो किड्स!

नुकत्याच एका प्रतिष्ठित नियतकालिकामध्ये एका लेखाने मोठ्या वादाला तोंड फोडले, विषय डिंक गुरुग्राम येथे महागड्या वस्तीत राहणाऱ्या एका उच्चशिक्षित भारतीय जोडप्याचे, दोघांचे मिळून वार्षिक उत्पन्न ३६ लाख असणाऱ्या म्हणजेच वेतन जवळपास तीन लाख रुपये महिना असतानाही मूल नको हा पक्का निर्णय घेण्याचे कारण त्यांच्या कॅल्क्यूलेशन प्रमाणे जर ते या पगारात एक स्वतःचा फ्लॅटही घेऊ शकत नाहीत तर मुलाची जबाबदारी कशी पूर्ण करू शकणार? त्यांच्या विचारानुसार मूल झाल्यास प्रत्येक महिन्याला वाढणारा ३० ते ३५ हजार रुपये महिना खर्च ते पेलू शकणार नाहीत. पुढे वाढत जाणाऱ्या गरजांमुळे होणारा खर्च विचारात घेता डिंक हा पर्याय त्यांनी स्वीकारला.

सर्वेक्षणानुसार शहरी भागांमध्ये उशिरा मूल होऊ देणाऱ्या वा मूल नको म्हणणाऱ्या विवाहित जोडप्यांचे प्रमाण ५० टक्क्यांपर्यंत पोचले आहे. वर्तविलेल्या अंदाजानुसार जागतिक स्तरावर २०५० पर्यंत अनेक विकसित देशांमध्ये ४५ टक्के जोडपी मूल जन्माला न घालण्याच्या निर्णयाची राहतील. असे झाल्यास डिंक हा विचार भारतात एक शांत, गंभीर व खोल परिणाम करणारा शास्त्रीय लोकसंख्या बदल ठरेल. मध्यम वर्गात हा विचार येतोय हे नुकत्याच पाहिलेल्या हे काय नवीन? या मराठी चित्रपटाने अधोरेखित केले.

या विचारांमागची कारणं शोधण्याचा प्रयत्न केल्यावर कारणे कळली; ती अशी- लग्न झालेल्या तरुण जोडप्यांना आर्थिक साठवणूक हवी आहे. भरपूर इन्व्हेस्टमेंट, जगभर प्रवास करायचा आहे, छान घर बांधायचं आहे, आपल्या आवडी जपायच्या आहेत. या सगळ्यात मुलांची जबाबदारी घेणे हा त्यांना सगळ्यात मोठा अडथळा वाटतो आहे.

घराच्या जबाबदाऱ्या पेलत त्यांना आपल्या कम्फर्ट झोनमध्ये मूल हा मोठा व्यत्यय वाटतो. स्वतःला वेळ द्यायचा आहे. जोडीदाराला प्राधान्य देताना पालक म्हणून भूमिका स्वीकारायची नाही. सृजनाची सुंदर निर्मिती करण्यासाठी निसर्गाने स्त्रीची निवड केली. मूल जन्माच्या प्रक्रियेत केंद्रबिंदू ठरते ती आई. स्त्री ही आई. म्हणून मोठी होताना आपसुकच तिच्यात निर्णयक्षमता, समस्या निवारण कौशल्य, संयम, भावनिक बुद्धिमत्ता, काळजी घेण्याचे कौशल्य, संरक्षण कौशल्य विकसित होत जातात. आई- बाळासोबत जन्म घेतो तो बाबा. घरी येणारं बाळ बाबाला जबाबदार बनवते. घरात बांधून ठेवते, त्याच्यातला ओलावा अधिक घट्ट करते, काळजी शिकवते. इतकंच काय, आजी- आजोबा लहान होतात, मुलांचे लहानपण पुन्हा नव्या रूपात अनुभवतात. मुलामुलींच्या पिढीतले मतभेद नातवांच्या आगमनाने लोप पावतात. आत्या, काका, मावशी, मामा, दादा, ताई कितीतरी सुंदर नाती मुले आपल्या सोबत घेऊन येतात. कुटुंबातील टवटवीतपणा जिवंत ठेवतात. बाळाच्या आगमनाच्या चाहुलीनेच आयुष्यातील मरगळ, रटाळपणा, तोचतोपणा नष्ट होऊन उत्स्फूर्तपणे जगण्याला कारण मिळते.

डिंक संकल्पनेचा विचार येताच समाजाला पुनरुज्जीवित करणारी, सृजनाचे सातत्य टिकवणारी प्रक्रिया थांबू शकते आणि त्याचे भयावह परिणाम फक्त जोडप्यांपुरते मर्यादित न राहता कुटुंबव्यवस्था, समाजव्यवस्था आणि पर्यायाने राष्ट्रव्यवस्था उद्ध्वस्त करू शकते.

युरोपियन देशांनी अनेक वर्षांपूर्वी व्यक्ति स्वातंत्र्याच्या पुरस्काराला सुरुवात केली. कुटुंब व्यवस्था नाकारली. १९९५ ला प्रकाशित झालेल्या डेव्हिड ब्लॅकेनहॉर्न यांच्या फादरलेस अमेरिका या पुस्तकाने कुटुंब व्यवस्था नाकारल्याचे गंभीर परिणाम जगासमोर आणले. मुलांची जबाबदारी एकट्या आईने स्वीकारल्याने त्यांचा संपूर्ण भावनिक विकास न होता समाजात असुरक्षितता, अपराध आणि वाढत्या मानसिक समस्यांचा सुकाळ झाला. या पुढचे धोकादायक पाऊल म्हणजे संपूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य जेथे मूल नको हा पर्याय व्यवस्थेने निवडला. या निर्णयाचे स्वागत करताना याच प्रगत म्हणविल्या जाणाऱ्या अमेरिकेतील २० टक्के महिला आता वयाच्या अशा टप्प्यावर पोचल्या आहेत की, जेथे आई होण्याचा पर्याय त्यांच्यासाठी संपून गेलाय.

जर्मनी आणि इटलीसारख्या देशातही हेच चित्र समोर येतंय. जपानमध्ये २५ टक्के विवाहित जोडपी डिंकचा पर्याय स्वीकारताना दिसतात. आज सर्वाधिक लोकसंख्येचा म्हणून ओळखीचा असणारा चीन याच समस्येचा सामना करताना उद्या वेगळ्याच समस्यांना तोंड देईल.

आजची मोठ्या लोकसंख्येची पिढी उद्या म्हातारी होताना त्यांना पर्याय असणारी नवी पिढी अर्ध्या लोकसंख्येची असली तर देशाचे कौटुंबिक, भावनिक, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक स्वरूप कसे राहील? आज संपूर्ण जगात सगळ्यात तरुण असणारा भारत आणखी ३० वर्षांनी वृद्धत्वाकडे वाटचाल करेल, तेव्हा भारताचे चित्र कसे राहील? भारतामध्येही आज मोठ्या शहरांमध्ये लाखोंची पॅकेजेस असणारी, सुशिक्षित म्हणवली जाणारी अनेक जोडपी या विचाराला बळी पडत असलेली दिसत आहे. ज्या शिकलेल्या पिढीने आर्थिकदृष्ट्या संपन्न होऊन राष्ट्रकार्यात हातभार लावावा; ती सुशिक्षित पिढी कुटुंबधर्म मान्य करण्यास तयार नाही. आज कुटुंबव्यवस्था टिकावी, मोठी व्हावी ही जबाबदारी घेणे प्रत्येक भारतीयाची गरज आहे. कुटुंब टिकले तर समाज टिकेल आणि समाज टिकला तरच राष्ट्र सक्षम होईल. डबल इन्कम नो किड्स, सिंगल इन्कम नो किड्स सारखे विचार नवीन पिढीवर हावी होण्याआधी पंच परिवर्तनातील कुटुंब प्रबोधन हा विषय समजणे आहे. मुख्य म्हणजे जाणीवपूर्वक विचारात रुजवली जाणारी डिंक/ सिंक सारखी विचार पद्धती, इस्रायल- मुस्लिम समुदायात स्वीकार्य नाही.

इस्रायलमधील ज्यू उच्चशिक्षित उच्च उत्पन्नाचे असूनही त्यांचा जन्मदर जगाच्या सरासरीच्या वर आहे. कारण त्यांची त्यांच्या देशाप्रति असणारी कटिबद्धता व सांस्कृतिक ठेवण. मुस्लिम कुठेही असोत, त्यांचा उत्पन्न व शिक्षण गट कसाही असो त्यांचा जन्मदर सरासरीच्या वर असलेला दिसतो. या संदर्भात, भारतात सुशिक्षित अशा व्यावसायिक क्षेत्रात यशस्वी कार्य करणाऱ्या पिढीत डिंकचा विचार रुजतो आहे, हा विचार करायला लावणारा मुद्दा आहे. हा विचार आपोआप रुजतो आहे का अजाणतेपणी नवीन पिढीला स्वातंत्र्य, व्यक्तिवाद यांचा गोड मुलामा देऊन विचित्र विचारांच्या पाशात अडकवले आहेत? आज आर्थिक सुरक्षितता, व्यावसायिक प्रगती, जगभराचा प्रवास यांना प्राधान्य देत, मूल नको हा विचार स्वीकारल्यास किती नवे प्रश्न जेन झी उद्यासाठी तयार करेल?

जगात अनेक देश कमी जन्मदराच्या संकटाचा सामना करायला लागलेत. अमेरिकेच्या आर्थिक सत्तेला मागे टाकण्याचा प्रयत्न करणारा चीन लग्न नको मूल नको प्रगती भरपूर साधली, परंतु राष्ट्राला राष्ट्र म्हणून टिकवून ठेवणारी जनसंख्या मात्र हळूहळू कमी होत चालली आहे. लोकसंख्येच्या वाढीने जगावर राज्य करण्याची स्वप्ने बघणाऱ्या वर्गाचे हिंदू समाजातील डिंक वा सिंकसारख्या विचारांच्या अंमलबजावणीने आयतेच साधणार आहे. भारताचा एकूण जन्मदर काही दशकात सातत्याने कमी होत असला तरी विकसित देशांच्या तुलनेत जास्त आहे. नजीकच्या भविष्यात ही चिंता भारतीय समाजाला सतावू शकते. उच्च वर्गात आणि उच्च मध्यम वर्गात या विचाराचे आगमन झाले आहे. प्रेम करणे, जीव लावणे, काळजी घेणे ह्या नैसर्गिक अभिव्यक्तींच्या गरजा कौटुंबिक जीवनात माणूस सहजतेने पूर्ण करतो. मूल नको म्हणणाऱ्या दोघांच्या घरात या नैसर्गिक अभिव्यक्तींचा पर्याय पेट पेरेंटिंग पूर्ण करतंय. महागडी कुत्र्याची, मांजरींची पिल्लं घरी आणून त्यांची काळजी घेऊन काळजी, प्रेमाची गरज भागविणारी जोडी वाढत चालली आहे. पितृऋण संकल्पना मानणाऱ्या आपल्या देशातील या विचारवाढीचा वेग सध्याजरी कमी असला, तरी देशाचे नेतृत्व करणाऱ्या उच्चशिक्षित पिढीने याबाबत सजगतेने विचार करायला हवा. डिंक- सिंकसारखे विचार नवीन पिढीत रुजण्याआधी व त्यांच्या स्वीकाराआधी सजग होणे आहे. कुटुंब म्हणून, समाज म्हणून भक्कमपणे त्यांच्या पाठीशी उभे राहावे लागेल. कुटुंबवृद्धी केवळ कुटुंबापुरती मर्यादित न राहता राष्ट्रवृद्धी या दृष्टीने विचार केल्यास उद्याचे चित्र वेगळे असेल. राष्ट्रप्रगतीचा प्रवाह पुढे चालत राहण्यास सामाजिकदृष्ट्या डिंकचा स्वीकार मोठा धोका आहे.